शनिवार **अकोला**

**३०** ऑगस्ट २०२५

पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : १७८
स्वागत मूल्य ३ रुपये

www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग

# अजिंक्य भारत

गणपती बाप्पा मोरया


## महत्त्वाचे

### अंतराळवीर शुभांशू शुक्ला घरी परतले



**लखनऊ :** आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचलेले पहिले भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला शुक्रवारी लखनऊ येथील त्यांच्या घरी पोहोचले. त्यांच्या मुलाला घरी पाहून पालकांना खूप आनंद झाला. ते म्हणाले, आम्ही मुलाला येण्यास सांगितले होते आणि व्यस्त असूनही, त्याने वेळ काढला, आमचे ऐकले आणि आमचा आदर वाढवला. यादरम्यान, कुटुंब आणि इतर हितचिंतकांनी वेढलेले शुभांशू देखील खूप भावनिक दिसत होते. घरी आल्यानंतर सुरक्षेच्या कारणास्तव त्यांना त्यांच्या घरी राहण्याची परवानगी देण्यात आली नाही, म्हणून ते गेस्ट हाऊसमध्ये राहिले, अशी माहिती आहे. आज शुभांशू काही काळासाठी घरी गेले आणि कुटुंबासोबत वेळ घालवला.

### बीसीसीआय अध्यक्ष बिन्नी यांचा राजीनामा



**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) अध्यक्ष रॉजर बिन्नी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे, असे एका मीडिया अहवालात म्हटले आहे. नवीन अध्यक्ष निवडले जाईपर्यंत उपाध्यक्ष असलेले राजीव शुक्ला बीसीसीआयचे हंगामी प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत. बुधवारी बीसीसीआयच्या शिखर परिषदेची बैठक झाली. या बैठकीत प्रायोजकत्व हा मुख्य मुद्दा होता. यात ड्रीम११ सोबतचा करार संपुष्टात आला असून, पुढील दोन ते अडीच वर्षांसाठी नवीन प्रायोजक शोधण्यावर चर्चा झाली. अहवालानुसार, आशिया चषकाला दोन आठवड्यांपेक्षा कमी कालावधी शिल्लक असल्याने तात्पुरता प्रायोजक मिळणे कठीण आहे.

### शाह यांचे शीर कापून टेबलवर ठेवले पाहिजे



**कोलकाता :** तृणमूल काँग्रेसच्या (टीएमसी) खासदार महुआ मोइत्रा यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याबाबत अत्यंत आक्षेपार्ह वक्तव्य केले आहे. पश्चिम बंगालमधील नदिया जिल्ह्यात शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना त्यांनी बेकायदा घुसखोरीच्या मुद्द्यावरून हे वादग्रस्त वक्तव्य केले.

महुआ मोइत्रा म्हणाल्या, जर भारताच्या सीमांचे रक्षण करणारा कोणीच नसेल, जर दुसऱ्या देशातील लोक रोज शेकडो, हजारो आणि लाखोंच्या संख्येने घुसखोरी करत असतील, आमच्या माता-भगिनींवर नजर ठेवत असतील, आमची जमीन हिसकावत असतील, तर सर्वप्रथम अमित शाह यांचे शीर कापून टेबलवर ठेवले पाहिजे. जर गृहमंत्री आणि गृह मंत्रालय भारताच्या सीमांचे रक्षण करू शकत नसेल आणि पंतप्रधान स्वतः म्हणत असतील की बाहेरून येणारे लोक आमच्या माता-भगिनींवर नजर ठेवत आहेत आणि आमची जमीन हिसकावत आहेत, तर यात चूक कुणाची आहे?

# मराठा आरक्षण : डोक्यावर गुलाल पडल्याशिवाय आता मुंबई सोडायची नाही!

## मनोज जरांगे यांचा निर्धार

मुंबई, दि. २९ वृत्तसंस्था

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदानात उतरलेल्या मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या आंदोलनास पोलिसांनी दिलेली परवानगी संपली असून, आता उद्यासाठी त्यांना परवानगी देण्यात आली आहे. मात्र, मराठा आंदोलकांकडून आज दिवसभर झालेला घटनाक्रम पाहता आणखी काही कडक नियम व अटी पोलिसांकडून लावण्यात आल्या आहेत. त्यातच, जरांगे यांच्या आंदोलनाच्या परवानगीबाबत मुंबई पोलीस दलातील वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांनी चर्चा करुन १ दिवसाच्या मुदतवाढीचा निर्णय घेण्यात आला. यावेळी बोलताना मनोज जरांगे म्हणाले की, सरकारने आता असले डाव खेळू नये आरक्षण द्यावे. आम्ही गोरगरीब मराठ्यांना आरक्षण मिळाले तर आम्ही तुम्हाला विसरणार नाही. तुम्ही एक एक दिवस मुदतवाढ दिली तरी उपोषण मागण्या पूर्ण होईपर्यंत सुरूच राहील. मला गोळी मारण्याचे, लोक अडवायचे सगळे सरकारच्या हातात आहे. आमच्या टॉयलेट्सला लॉक लावले आहे बाहेरचे चहाचे हॉटेल्स ही बंद आहेत. प्यायला पाणी नाही, जेवायला नाही, तुम्ही तर इंग्रजापेक्षा बेकार झालेत. असं ते म्हणाले. मला सरकारने काय केलं हे माहिती नाही. त्यांनी काल मला आंदोनलाची परवानगी दिली होती.**



आज पुन्हा एकदा परवानगी दिली आहे. माझं एक मत आहे की असले भंगार खेळ खेळण्यापेक्षा खरा डाव खेळावा. त्यांनी मराठा समाजाला आरक्षण देऊन टाकावे. त्यांनी मराठा समाजाचे मन जिंकणे गरजेचे आहे. मराठा समाजाचे मन जिंकण्याची हीच योग्य वेळ आहे. गोरगरिबांच्या लेकरांना आरक्षण दिले तर मरेपर्यंत मराठा समाज या सरकारला विसरणार नाही. एक-एक दिवस मुदतवाढ देण्यापेक्षा थेट आरक्षण देऊन टाकावे, असे मत जरांगे यांनी व्यक्त केले. डोक्यावर गुलाल पडल्याशिवाय आता मुंबई सोडायची नाही. सरकारने आपल्याला सहकार्य केले आहे. जेव्हा सरकार सहकार्य करणार नव्हते असे वातावरण होते, तेव्हा आपण मुंबईत येऊन मुंबई जाम करणार होतो. मात्र आपल्याला सरकारने परवानगी दिली आहे. सरकारने सहकार्य केले. आता आपल्यालाही सरकारला सहकार्य करायचे आहे. आरक्षणाची जबाबदारी माझ्यावर आहे, तुम्ही सहकार्य करायचे आहे, असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले. आझाद मैदानात पोहोचल्या बरोबर हजारोच्या संख्येने जमलेल्या भगव्या वादळाला मनोज जरांगे यांनी संबोधित केले. ते म्हणाले, आपण समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी येथे आलो आहोत. शांततेत रहा, गडबड गोंधळ करून नुकसान करून घेऊ नका, असे त्यांनी सांगितले. सरकारला आपल्याला सहकार्य करायचे नव्हते म्हणून मराठ्यांना मुंबईत यावे लागले. आपल्या सर्व मागण्या पूर्ण झाल्याशिवाय मी मागे हटणार नाही. सरकारने गोळ्या घातल्या तरी मागे हटणार नाही, असा पुनरुच्चार त्यांनी केला. डोक्यावर गुलाल पडल्याशिवाय आता हटणार नाही. सरकारने बेमुदत उपोषण करू द्यावे, मराठ्यांची नाराजी अंगावर घेऊ नका, असेही त्यांनी यावेळी म्हटले. हजारोंच्या संख्येने मराठा आंदोलन मुंबईत दाखल झाले आहेत. यामुळे मुंबईतील वाहतूक व्यवस्थेचे तीन तेरा वाजले आहेत. तसेच आझाद मैदानावर मराठा आंदोलक बांधवांची तोबा गर्दी झाली आहे. आंदोलनास पोलिसांनी दिलेली परवानगी संपली असून आता उद्यासाठी त्यांना परवानगी देण्यात आली आहे.

### कुणाचेही आरक्षण कमी करून मराठा आरक्षण नाही - एकनाथ शिंदे



मराठा समाजाला दिलेले १०% आरक्षण आजही टिकून आहे. यापुढेही ते टिकवण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. त्याचबरोबर मराठा आरक्षण कुणाचेही कमी करुन देणार नाही, असे स्पष्टीकरण देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षणावरुन राजकारण करणाऱ्या विरोधकांवर जोरदार टीका केली आहे. विरोधकांनी केवळ मतांसाठी मराठा समाजाचा वापर केला आणि सरकारला अपयशी ठरवण्याचा प्रयत्न केला, असा आरोपही त्यांनी केला. एकनाथ शिंदे म्हणाले, मी मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला १०% आरक्षण दिले. आजही त्या आरक्षणाचा लाभ समाजाला मिळत आहे. फडणवीस सरकारच्या काळात मिळालेले मराठा आरक्षण उच्च न्यायालयात टिकले होते, पण सर्वोच्च न्यायालयात महाविकास आघाडी सरकारला ते टिकवता आले नाही. त्या काळात आरक्षणासाठी लक्ष द्यायला हवे होते. दुर्दैवाने ते झाले नाही, असे म्हणत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला. मराठा समाजाला आरक्षण देत असताना सरकार कोणत्याही समाजावर अन्याय करणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. ओबीसी समाजाचे आरक्षण कमी करून मराठ्यांना मिळावे, अशी मराठा समाजाची भूमिका नाही. कुणाचेही आरक्षण कमी करून देणे हे करता येणार नाही. कायद्याच्या चौकटीत राहून मराठा समाजाला न्याय देण्याची सरकारची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट सांगितले.

## राजकीय पोळी भाजू नका; तोंड भाजेल : मुख्यमंत्री



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत सरकारची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी यावेळी विरोधीपक्ष याबाबत राजकारण करत असल्याचा आरोप केला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सरकारची भूमिका पहिल्यापासूनच सकारात्मक आहे. लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्यांना आम्ही नेहमीच सहकार्य करत आहोत. मुंबई पोलिसांच्या मदतीने सर्व आंदोलकांना मदत केली जात आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व गोष्टी नियमानुसार होत आहेत. काही तुरळक घटनांमध्ये आंदोलकांनी रास्ता रोको केला, पण पोलिसांनी चर्चा केल्यानंतर त्यांनी तो लगेच मोकळा केला. मात्र, काही लोक जाणीवपूर्वक आंदोलनाला गालबोट लावण्याचा प्रयत्न करत आहेत. मी सर्व आंदोलकांना आवाहन करतो की, कुणीही गैरलोकशाही पद्धतीने वागू नये, असे आवाहन त्यांनी केले. राज्यातील काही राजकीय पक्षांवरही फडणवीसांनी यावेळी निशाणा साधला. समाजात वाद निर्माण करून काही लोक राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करत आहेत. पण, त्यांनी हे थांबवले नाही, तर त्यांचे तोंड भाजेल. ओबीसी आणि मराठा समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक सुरू आहे, पण आम्ही असे होऊ देणार नाही. महाराष्ट्रामध्ये कोणत्याही परिस्थितीत दोन समाज एकमेकांसमोर उभे राहणार नाहीत. आम्हाला ओबीसी समाजालाही सांभाळावे लागेल आणि मराठा समाजालाही न्याय द्यावा लागेल. गेल्या १० वर्षांत आमच्या सरकारनेच मराठा समाजाला न्याय देण्याचे काम केले आहे. इतर कोणत्याही सरकारमध्ये ते झालेले नाही. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सरकारने मंत्रिमंडळाची उपसमिती तयार केली आहे. केवळ आश्वासनं देऊन चालणार नाही, आम्हाला कायदेशीर मार्ग काढावे लागतील. या प्रश्नावर आम्ही प्रयत्नपूर्वक तोडगा काढू. प्यादे लढवणे किंवा लोकांना एकमेकांसमोर झुंजवणे हे आमच्या सरकारचे धोरण नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### जरांगेंच्या आंदोलनाविरोधात सदावर्तेंची थेट पोलिसांत तक्रार



मराठा आरक्षणासाठी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी ऐन गणेशोत्सवात आंदोलन पुकारले आहे. मुंबई येथे त्यांचा मोर्चा पोहचला असून मुंबईत प्रंचड गर्दी झाली आहे. त्यामुळे वकील गुणरत्न सदावर्ते यांनी या मोर्चाच्या विरोधात पोलीस महासंचालकांकडे तक्रार दाखल केली असून. या आंदोलनात कोर्टाच्या विरोधात जाऊन रास्ता रोको केला जातोय असा आरोप केला आहे. तसेच या मोर्चामध्ये कोणत्याही प्रकारच्या नियमांचे पालन केले जात नाही असेही म्हटले आहे. गुणरत्न सदावर्ते यांनी आंदोलकांवर त्वरित कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी पोलीस महासंचालक, मुंबई पोलीस आयुक्त, व आझाद मैदान पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली आहे. पुढे सदावर्ते यांनी आंदोलनावर गंभीर आरोप करत त्यांनी दाखल केलेल्या तक्रारीत मोर्चामध्ये कोर्टाच्या आदेशांचे उल्लंघन करून रास्ता रोको करण्यात आल्याचे नमूद केले आहे.

## उत्तराखंडमध्ये निसर्गाचे भयानक रूप!

### अलकनंदा नदी : धोक्याच्या पातळीपेक्षा फक्त एक इंच खाली

डेहराडून, दि. २९ वृत्तसंस्था

उत्तराखंडमध्ये अलकनंदा नदीमुळे संपूर्ण वातावरणात भीती निर्माण झाली आहे. नदीचे प्रलयानंतरचे महाभयंकर रूप आपल्याला २०१३ ची आठवण करून देत आहे. श्रीनगरच्या जवळ बद्रीनाथ महामार्ग पाण्यात बुडाला आहे. उत्तराखंडच्या रक्षक धारी देवीचे दृश्य असे आहे की, जणू अलकनंदा नदी धारी देवीला भेटण्यासाठी उत्सुक आहे.



धारी मातेच्या मंदिराच्या व्यासपीठाला अलकनंदेचे पाणी स्पर्श करत आहे. अलकनंदा नदीची पाण्याची पातळी सतत वेगाने वाढत आहे. सिरोबागडजवळील मिनी गोवा समुद्रकिनाऱ्यावर अलकनंदा नदीचे पाणी रस्त्यावर आले आहे. गेल्या काही दिवसांपासून पर्वतीय राज्यांमध्ये होत असलेल्या मुसळधार पावसामुळे अलकनंदा नदीची पाण्याची पातळी सतत वेगाने वाढत आहे. त्याचा थेट परिणाम श्रीनगर आणि आसपासच्या भागात दिसून येत आहे. नदीकाठचे घाट संपूर्णपणे पाण्याखाली गेले आहेत. तसेच, नदीचे पाणी आता प्रसिद्ध धार्मिक स्थळ धारी देवीकडे जाणाऱ्या लिंक रोडवर पोहोचले आहे. त्यामुळे वाहतुकीत मोठ्या अडचणी येत आहेत. धारी देवी मंदिराचा इतिहास पौराणिक कथांवर आधारित आहे. त्यामध्ये असे म्हटले जाते की, द्वापर काळातील देवीची मूर्ती अलकनंदा नदीतील पुरामुळे वाहून गेली आणि धारी गावाजवळ एका दगडाला धडकल्यानंतर थांबली, त्यानंतर स्थानिक (पान २ वर)

## महिलांसाठी देशात मुंबई सर्वाधिक सुरक्षित!

### अन्य शहरी भागांबाबत धक्कादायक आकडेवारी



नवी दिल्ली, दि. २९ वृत्तसंस्था

देशात दररोज महिलांवरील हिंसाचार, गुन्हे आणि हत्येच्या बातम्या समोर येतात. दरम्यान, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी नुकताच महिला सुरक्षेवरील राष्ट्रीय वार्षिक अहवाल जाहीर केला आहे. यातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. अहवालानुसार, देशाच्या शहरी भागातील ४० टक्के महिलांना असुरक्षितेता वाटते. या अहवालासाठी ३१ शहरांमधील १२,७७० महिलांचे सर्वेक्षण करण्यात आले.

गेल्या काही दिवसांत अशा अनेक हृदयद्रावक घटना समोर आल्या आहेत, ज्यामुळे पालकांची चिंता आणखी वाढली आहे. कोणत्याही देशात महिलांची सुरक्षितता हा एक मोठा मुद्दा आहे. (पान २ वर)

### सर्वाधिक सुरक्षित आणि असुरक्षित शहरे

सर्वेक्षणानुसार, मुंबई, कोहिमा, विशाखापट्टणम, भुवनेश्वर, ऐझॉल, गंगटोक आणि इटानगर ही शहरे महिलांसाठी सर्वात सुरक्षित ठरली आहेत. याउलट, पाटणा, जयपूर, फरिदाबाद, दिल्ली, कोलकाता, श्रीनगर आणि रांची ही शहरे सर्वात कमी सुरक्षित असल्याचे दिसून आले आहे. दिल्ली आणि फरीदाबाद हे पहिल्या पाच असुरक्षित शहरांमध्ये आहेत, जिथे जवळजवळ ४२% महिलांनी असुरक्षित असल्याचे मत नोंदवले. रांचीमध्ये हा आकडा आणखी जास्त आहे तिथे ४४% महिलांनी असुरक्षित असल्याचे सांगितले. इशान्य भारतातील कोहिमा शहरात ८०% पेक्षा जास्त महिलांनी सुरक्षितेची भावना बोलून दाखवली. विशाखापट्टणम, भुवनेश्वर, ऐझॉल, गंगटोक, इटानगर आणि मुंबई येथे जवळजवळ ७०% महिलांनी सुरक्षित असल्याचा अनुभव व्यक्त केला.

**हाळ मिळवणी** पंतप्रधान मोदी जपानच्या दौऱ्यावर

## भारत आणि जपानमध्ये झाले १३ करार!

टोकियो, दि. २९ वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे पंतप्रधान शिगेरु इशिबा यांच्यात १५व्या भारत-जापान शिखर परिषदेत व्यापार, गुंतवणूक आणि नव्या तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्य वृद्धिंगत करण्यावर सविस्तर चर्चा झाली. या बैठकीत दोन्ही देशांनी पुढील दशकासाठी एक महत्त्वाकांक्षी रोडमॅप तयार केला असून, यात चंद्रयान-५ मिशनसाठी इस्रो आणि जॅक्सा यांच्यातील सहकार्य आणि जपानकडून भारतात १० ट्रिलियन येन गुंतवणुकीचा संकल्प यांचा समावेश आहे.



पंतप्रधान मोदी यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितले की, भारत आणि जपान हे दोन मोठ्या अर्थव्यवस्था आणि जीवंत लोकशाही असलेले देश वैश्विक शांती आणि सुरक्षेसाठी महत्त्वाचे भागीदार आहेत. जपानी तंत्रज्ञान आणि भारतीय प्रतिभा यांचा संगम हा विजयी संयोजन आहे, असे मोदी म्हणाले. त्यांनी 'मेक इन इंडिया, मेक फॉर वर्ल्ड'चा नारा देत जपानी कंपन्यांना भारतात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले. याशिवाय, डिजिटल पार्टनरशिप २.०, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सेमीकंडक्टर आणि रेअर अर्थ मिनरल्स यासारख्या क्षेत्रांत सहकार्याला प्राधान्य देण्याचे ठरले. भारताच्या चंद्रयान-५ मोहिमेत जपानच्या जॅक्सा सोबत सहकार्याचा करार झाला आहे. हे सहकार्य पृथ्वीच्या सीमेपलीकडे जाऊन मानवतेच्या प्रगतीचे प्रतीक ठरेल, असे मोदी म्हणाले. याशिवाय, हाय-स्पीड रेल्वे, बंदरे, विमानन आणि जहाजबांधणी यासारख्या क्षेत्रांत 'नेक्स्ट जनरेशन मोबिलिटी पार्टनरशिप' अंतर्गत प्रगती साधण्याचे उद्दिष्ट आहे. पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की, पुढील १० वर्षांत जपानकडून भारतात १० ट्रिलियन येन गुंतवणुकीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. यात लघु आणि (पान २ वर)

### भारत आणि जपान यांच्यात झालेले १३ करार

१. पुढील दशकासाठी भारत-जपान संयुक्त दृष्टिकोन. २. सुरक्षा सहकार्यासाठी संयुक्त घोषणापत्र. ३. भारत-जपान यांच्यातील मानव संसाधनांच्या देवाणघेवाणीसाठी कृती योजना. ४. संयुक्त कर्ज व्यवस्थेसाठी सहकार्य करारपत्र. ५. भारत-जपान डिजिटल भागीदारी २.० साठी करारपत्र. ६. खनिज संसाधन क्षेत्रातील सहकार्यासाठी करारपत्र. ७. चांद्रयान-५ मोहिमेसाठी भारत आणि जपानी अंतराळ संस्थांमधील सहकार्य. ८. स्वच्छ हायड्रोजन आणि अमोनियासाठी संयुक्त हेतुपत्र. ९. सांस्कृतिक देवाणघेवाणीसाठी सहकार्य करारपत्र. १०. विकेंद्रित घरगुती सांडपाणी व्यवस्थापनासाठी करारपत्र. ११. पर्यावरण सहकार्यासाठी करारपत्र. १२. भारताच्या सुषमा स्वराज परराष्ट्र सेवा संस्थान आणि जपानच्या परराष्ट्र मंत्रालयामधील करारपत्र. १३. भारत आणि जपानच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय आणि शिक्षण, संस्कृती, क्रीडा, विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयामधील संयुक्त हेतुपत्र.

## राजुरा-गडचांदूर मार्गावर भीषण अपघात; ६ जणांचा मृत्यू तर १ गंभीर

चंद्रपूर, दि. २९ वृत्तसंस्था

राजुरा - गडचांदूर मार्गावरील कापनगाव जवळ राजुरा येथून पाचगाव कडे जाणा-या एका ॲटोला विरूध्द दिशेने येणा-या हायवा ट्रक ने जबर धडक दिली. या घटनेत ३ प्रवाशी जागीच ठार झाले एका महिलेचा राजुरा येथील उपजिल्हा रुग्णालयात तर दोन महिलांचा रस्त्यात मृत्यू झाल्याची माहिती प्राप्त झाली असून एका गंभीर प्रवाश्याला चंद्रपूर जिल्हा रूग्णालयात रेफर करण्यात आले आहे. तर एकावर राजुरा उपजिल्हा रूग्णालयात उपचार सुरू आहेत. दिनांक २८ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ४ वाजता ही दुर्देवी दुर्घटना घडली. या दुर्घटनेत रवींद्र हरी बोबडे, वय ४८, राहणार पाचगाव, शंकर कारू पिपरे, वय ५०, राहणार कोची, सौ. वर्षा बंडू मांदळे, वय ४१, राहणार खामोना, तनु सुभाष पिंपळकर, वय १८, राहणार पाचगाव,




ताराबाई नानाजी पापुलवार, वय ६० वर्ष, राहणार पाचगाव आणि ऑटो चालक प्रकाश मेश्राम, वय ५० वर्ष, राहणार पाचगाव (पान २ वर)

# पान 1 वरून...

## उत्तराखंडमध्ये निसर्गाचे भयानक रूप...

लोकांनी तेथे एक मंदिर बांधले. ती उत्तराखंडची संरक्षक देवी मानली जाते. दिवसातून तीन वेळा तिचे रूप बदलते. २०१३ च्या पुरानंतर, मंदिर क्रेनने वर उचलण्यात आले आणि पुन्हा बांधण्यात आले. आज सकाळी ८ वाजता पाटबंधारे विभागाने जाहीर केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, अलकनंदा नदीची पाण्याची पातळी ५३५.८० मीटरवर पोहोचली आहे. ही पातळी धोक्याच्या पातळीपेक्षा फक्त एक इंच खाली आहे. जर पावसाची तीव्रता अशीच राहिली तर पाण्याची पातळी आणखी वाढू शकते आणि मग येणारा पूर विक्राळळासू शकतो.

## महिलांसाठी देशात मुंबई...

जेव्हा जेव्हा एखादी महिला घराबाहेर पडते तेव्हा तिच्या सुरक्षिततेचा विचार नक्कीच येतो. विशेषतः जेव्हा एखादी मुलगी नोकरीसाठी किंवा शिक्षणासाठी दुसऱ्या शहरात जाते तेव्हा कुटुंब नेहमीच तिच्या सुरक्षिततेबद्दल चिंतेत असते. रस्ता असो, बस असो, मेट्रो असो किंवा बाजारपेठ असो, या ठिकाणी महिलांना अनेकदा विविध त्रासदायक घटनांना सामोरे जावे लागते. काही जणी अशा छळाविरुद्ध निषेधही करतात, पण अनेक महिला-मुली हा छळ निमुटपणे सहन करून गप्प राहतात. अहवालानुसार, २०२४ मध्ये ७ टक्के महिलांनी सांगितले की त्यांचा छळ झाला. त्याच वेळी, १८ ते २४ वर्षे वयोगटातील तरुणींनी आपण असुरक्षित असल्याचे व्यक्त केले. ही आकडेवारी राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो () च्या २०२२ च्या ताज्या आकडेवारीनुसार, महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांच्या नोंद झालेल्या संख्येच्या १०० पट जास्त आहे. अहवालात भारतीय शहरांमधील महिलांच्या सुरक्षेचे चिंताजनक वास्तव उघडकीस आले आहे. या अहवालासाठी ३१ शहरांमधील १२,७७० महिलांचे सर्वेक्षण करण्यात आले. देशाचा एकूण सुरक्षा निर्देशांक ६५ टक्के इतका नोंदला गेला असून, शहरांचे मूल्यमापन 'अत्यंत चांगले', 'चांगले', 'कमी', 'अत्यंत कमी' अशा श्रेणींमध्ये करण्यात आले. एकूण १० पैकी ६ महिलांनी आपल्या शहरात सुरक्षित वाटत असल्याचे सांगितले, तर ४० टक्के महिलांनी स्वतःला असुरक्षित मानले आहे.

## राजुरा–गडचांदूर मार्गावर भिषण...

या सहा प्रवाशांचा मृत्यू झाला. याव्यतिरिक्त चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात निर्मला रावजी झाडे, वय ५० वर्षे, पाचगाव यांना चंद्रपूर जिल्हा रूग्णालयात रेफर करण्यात आले असून भोजराज महादेव कोडापे, वय ४० वर्षे, भुरकुंडा यांचे वर राजुरा उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. राजुरा पोलिसांनी याची दखल घेऊन तातडीने घटनास्थळी पोहोचून सर्व जखमींना रुग्णालयात दाखल केले आणि ट्रक चालकावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. ट्रकचालक अद्याप फरार आहे. पोलिसांनी ट्रक ताब्यात घेतला आहे रुग्णालयात आमदार.देवराव भोंगळे यांनी भेट दिली असून ठाणेदार सुमित परतेकी, सहायक पोलिस निरीक्षक हेमंत पवार व सहकारी पुढील तपास करीत आहेत. राजुरा येथुन पाचगाव कडे ॲटो चालक व सात प्रवाशी ॲटो ने जात होते. राजुरा शहरापासून दोन किलोमीटर अंतरावर महामार्गाचे काम सुरू आहे. आज एकाएकी येथे काम करण्यासाठी रस्ता वाहतुकीत बदल करण्यात आला. मात्र याविषयी कसलेही फलक लावले नव्हते.

## भारत आणि जपानमध्ये झाले...

मध्यम उद्योग तसेच स्टार्टअप्स यांना जोडण्यावर विशेष भर दिला जाईल. सेमीकंडक्टर, रेअर अर्थ मिनरल्स, क्लीन हायड्रोजन आणि अमोनिया यासारख्या क्षेत्रांत सहकार्य वाढवण्यावरही भर देण्यात आला. या शिखर परिषदेत दोन्ही देशांदरम्यान १३ महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. यात भारत-जापान संयुक्त दृष्टिकोन, सुरक्षा सहकार्य, डिजिटल पार्टनरशिप २.०, खनिज संसाधन, सांस्कृतिक आदान-प्रदान, पर्यावरण सहकार्य, आणि चंद्रयान-५ साठी इस्रो-जॅक्सा सहकार्य यांचा समावेश आहे. याशिवाय, सुषमा स्वराज परराष्ट्र सेवा संस्थान आणि जपानच्या परराष्ट्र मंत्रालयातही करार झाला. जपानचे पंतप्रधान शिगेरु इशिबा यांनी २०१९ मधील वाराणसी भेटीचा उल्लेख करताना सांगितले की, भारतीय इतिहास आणि संस्कृतीने ते प्रभावित झाले होते. त्यांनी भारत-जापान संबंधांना विशेष रणनीतिक आणि वैश्विक साझेदारी म्हणून संबोधले. मोदी यांनी अधोरेखित केले की, भारत आणि जपान यांच्यातील साझेदारी केवळ दोन्ही देशांसाठीच नव्हे, तर वैश्विक शांती आणि सुरक्षेसाठीही आवश्यक आहे. मजबूत लोकशाही देश एक चांगली दुनिया घडवण्यासाठी स्वाभाविक भागीदार आहेत, असे ते म्हणाले. या शिखर परिषदेने दोन्ही देशांदरम्यानच्या संबंधांना नव्या उंचीवर नेण्याचा मार्ग मोकळा केला आहे.

# श्री गणेश विसर्जन मिरवणूकीनिमित्त वाहतूक मार्गात बदल

अकोला: श्री गणेश विसर्जन मिरवणूकीनिमित्त अकोला शहर व अकोला अकोट राज्य वाहतूक मार्गात बदल करण्यात आला आहे. तसा आदेश जिल्हा दंडाधिकारी वर्षा मीना यांनी जारी केला.

अकोला शहरातील श्री गणेश विसर्जन मिरवणूक मार्गावरील वाहतूक दि. ६ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि.७ सप्टेंबर २०२५ चे सकाळी ६ वाजेपर्यंत. अकोला-अकोट या राज्य मार्गावरील वाहतूक दि.०६ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि.७ सप्टेंबर २०२५ चे सकाळी १२ वाजेपर्यंत तसेच अकोला-पारस फाटा ते बाळापूर मार्गावरील वाहतूक दि.६ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि.७ सप्टेबर चे सकाळी १२ वाजेपर्यंत. अकोला शहर श्री विसर्जन मार्गावरील वाहतूक : डाबकी रोडकडून बसस्थानकाकडे जाणारी व मामा बेकरीकडे जाणारी वाहतूक पर्यायी मार्ग : भांडपूरा चौक, पोळा चौक, हरिहर पेठ, वाशीम बायपास, लक्झरी स्टँड, अशोक वाटिका मार्गे बसस्थानक अशी वळविण्यात येईल.

अकोला बसस्थानकाकडून हरिहरपेठेकडे जाणारी वाहतूक : निमवाडी पोलीस वसाहती समोरून वाशिम बायपास हरिहर पेठ अशी वळविण्यात येईल. रेल्वे उड्डाण पुलाकडून कोतवाली, लक्झरी बसस्टँडकडे जाणारी वाहतूक अग्रसेन चौक, जेल चौक मार्गे जाईल. लक्झरी बसस्थानकाकडून अकोट स्टँडकडे जाणारी वाहतूक अग्रसेन चौक मार्गे जाईल. सुभाष चौकाकडून गांधी चौकाकडे जाणारी वाहतूक दामले चौक, टॉवर चौक मार्गे जाईल.

अकोला अकोट राज्य मार्गावरील वाहतूक

अकोला ते अकोटकडे जाणारी वाहतूक व येणारी वाहतूक पर्यायी मार्गे : अकोला बसस्थानक, लक्झरी बसस्थानक, वाशिम बायपास, शेगांव टी पॉईंट, गायगाव, देवरी अकोट अशी जाईल. अकोला बसस्थानक ते म्हैसांग मार्गे दर्यापूर तसेच दर्यापूरकडे जाणारी व येणारी वाहतूक पर्यायी मार्गे : रेल्वे स्थानक चौक, सातव चौक, खरप टी पॉईंट, म्हैसांग या मार्गे जाईल व येईल.

अकोला पारस फाटा बाळापूर खामगांव मार्गावरील वाहतूक

अकोला ते बाळापूरकडे जाणारी व येणारी वाहतूक पर्यायी मार्गे : अकोला- पारस फाटा हायवे ट्रॅप कार्यालयाकडून जाईल व येईल. खामगांव ते पारस फाटा, पातूरकडे जाणारी व येणारी वाहतूक पर्यायी मार्गे : पारस फाटा, वाशिम बायपास चौक, मार्गे वळविण्यात येईल.अकोल्याहून खामगावकडे जाणारी वाहतूक पर्यायी मार्गे : अकोला-पारस फाट्याजवळील रोशन धाबा येथून तपे हनुमान मंदिराजवळील डिव्हायडर बॅरेकेटींग पॉईंट पर्यंत वळविण्यात येईल. हे आदेश सर्व वाहनांना लागू राहतील.

### नांदेड, लातूरसह बीडमध्ये मुसळधार; संपूर्ण जनजीवन विस्कळीत

# मराठवाडा, विदर्भात पावसाचे रौद्ररूप !

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**नांदेड, दि. २९ :** मागच्या काही दिवसापासून विदर्भ, मराठवाड्यात सतत सुरु असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन कोलमडले आहे. यामध्ये नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक पावसाची नोंद झाली असून, मन्याड नदीला पूर आला आहे. लिंबोटी धरण पूर्ण क्षमतेनं भरल्याने त्याचे दहा दरवाजे उघडण्यात आले आहेत. नायगाव परिसरात पाणी भरले असून, शेकडो एकर शेतजमीन पाण्याखाली गेली आहे. कंधार, नायगाव, बिलोली, देगलूर, धर्माबादमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. अनेक गावांचा संपर्क तुटला असून, नांदेडमध्ये सुरू असलेल्या पावसामुळे महाराष्ट्र आणि तेलंगणाचा संपर्क तुटला आहे.

लातूर जिल्ह्यात बुधवारी रात्रीपासून सुरू झालेला पाऊस गुरुवारी दिवसभर कायम राहिला. मध्यरात्रीनंतरही पावसाचा जोर कायम होता. या पावसाने शेतीसह जनजीवन विस्कळीत झाले आहे. अंतिम टप्प्यात आलेले शेती पीक या पावसाने अक्षरशः मातीमोल करून टाकले आहे. शेतात सर्वत्र पाणीच पाणी असल्याने पिके आता सडायला लागली आहेत. सतत सुरू असलेल्या पावसामुळे अरुंद छोटे आणि कमी उंचीच्या पुलावरून पाणी जात असल्याने हे पूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत.

दरम्यान या पावसाचा फटका जिल्हाभरात ४२ ठिकाणी पाहायला मिळाला असून पावसामुळे सर्वत्र हाहाकार झाल्याचे चित्र आहे. तर मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या २४ तासांत जिल्ह्यात सरासरी ६२.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. जळकोट तालुक्यात सर्वाधिक ७७.७ मिमी, तर उदगीरमध्ये सर्वात कमी ५० मिमी पावसाची नोंद करण्यात आली आहे.

दुसरीकडे जिल्ह्यातील ४१ ठिकाणी रस्त्यांवरून पाणी वाहत असल्याने वाहतूक बंद करण्यात आली आहे. नद्या, नाले, ओढे दुथडी भरून वाहत आहेत.

# बांगलादेशी घुसखोरांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी ग्रामसभांवर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नाशिक , दि. २९ :** मालेगाव शहरात बांगलादेशी नागरिकांना खोटे आधारकार्ड दिल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर राज्य शासनाने घुसखोरीवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी गावपातळीवरील ग्रामसभांवर सोपविली आहे.

ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र देत सूचना केल्या आहेत. त्यानुसार गावात जन्म प्रमाणपत्र नोंदविताना ग्रामसभेने काटेकोर पडताळणी करावी. तसेच गावात बांगलादेशी नागरिक आढळल्यास पोलिसपाटलांनी तत्काळ पोलिस ठाण्यास माहिती द्यावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.रोजगाराच्या निमित्ताने बांगलादेशी नागरिक राज्यात स्थलांतर करतात. वास्तव्यासाठी बनावट कागदपत्रे तयार करून ते शासकीय योजनांचा लाभ घेतात. यामुळे राज्याच्या योजनांवर होणारा खर्च वाढत असून, सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर गृह विभागाने विशेष परिपत्रक काढून ग्रामीण भागातील यंत्रणांना दक्षता घेण्याचे आदेश दिले आहेत.

ग्रामीण भागात शेती, मजुरी किंवा मासेमारीच्या कामासाठी उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशातून मजूर येतात. त्यांची भाषा हिंदी असल्याने बांगलादेशी नागरिकांची ओळख पटविणे कठीण ठरते. अशा परिस्थितीत संशयास्पद व्यक्तींची ओळख करून पोलिसांना माहिती देणे ही जबाबदारी आता अधिक प्रमाणात पोलिसपाटलांवर आली आहे.

# मुंबई-अमरावती विमानसेवा १ सप्टेंबरपासून पूर्ववत होणार?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अमरावती , दि. २९ :** गेल्या आठ दिवसांपासून बंद असलेली अलायन्स एअरची मुंबई-अमरावती-मुंबई विमानसेवा येत्या १ सप्टेंबरपासून पूर्ववत होण्याची चिन्हे आहेत. गेल्या २२ ऑगस्टपासून ही सेवा बंद होती. चार विमान उड्डाणे रद्द करण्यासंदर्भात अलायन्स एअर कंपनीने विमानतळ व्यवस्थापनाला कळवले होते. विमानतळाच्या लोकार्पणापासून आतापर्यंत अनेकवेळा अचानकपणे विमान उड्डाणे रद्द झाल्याने प्रवाशांमध्ये नाराजीचा सूर आहे.१६ एप्रिल २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अमरावती विमानतळाचे लोकार्पण करण्यात आले आणि गेल्या अनेक वर्षांची अमरावतीकरांची प्रतीक्षा पूर्ण झाली. आठवड्यातून तीन दिवस मुंबई-अमरावती-मुंबई ही विमानसेवा सुरू झाली. दर सोमवारी, बुधवारी आणि शुक्रवारी ७२ आसनी विमान मुंबईच्या दिशेने आकाशात झेपावते. पण, गेल्या चार महिन्यात अनेक वेळा विमान उड्डाण रद्द करण्यात आले आहे. काही दिवसांपुर्वी प्रतिकूल हवामानामुळे विमान उड्डाणे रद्द करण्यात आली. २२, २५, २७ आणि २९ ऑगस्ट रोजी विमानसेवा बंद राहील, अशी माहिती अलायन्स एअर कंपनीने विमानतळ व्यवस्थापनाला दिली होती.

# दिल्ली येथे आयोजित बुद्धिबळ स्पर्धेत संस्कृती वानखडे प्रथम

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २९ :** नवी. दिल्ली येथे दि. २४ ते २८ ऑगस्ट २०२५ दरम्यान श्री. धनपत राय सचदेवा मेमोरीयल ओपन इंटरनॅशनल फिडे क्लासिकल चेस टूर्नामेंट पार पडली. या स्पर्धेत अकोल्याची ** म्हणजेच वूमन कॅण्डीडेट मास्टर संस्कृती वानखडे हिने १९०० रेटींग खालील प्रकारात प्रथम येऊन आकर्षक ट्रॉफीसह एक लाखाचे रोख पारितोषिक पटकावले.

या स्पर्धेत एकूण ३९२ खेळाडू सहभागी झाले असून त्यापैकी ३१८ खेळाडू हे आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त खेळाडू होते. या स्पर्धेत एकूण नऊ डाव खेळवण्यात आलेत. पहिल्या डावात महाराष्ट्राच्याच अहान कटारूका याला संस्कृतीने सहज मात दिली. दुसऱ्या व तिसऱ्या डावात संस्कृतीने तमिळनाडूच्या श्रीनंधन ए. व मारीमुथ्थू के. ह्यांना अनुक्रमे पराभूत केले. चौथ्या डावात हरिसालच्या वितास्ता कौल याला धूळ चारली. पाचव्या डावात उत्तरप्रदेशच्या संचय दुबे याला हरविले. सहाव्या डावात पश्चिम बंगालच्या शाओन चौधरीला नेस्तनाबूत केले. मात्र सातव्या डावात सदर स्पर्धेचा टॉप सिटर असलेल्या पश्चिम बंगालच्या इंटरनॅशल मास्टर असलेल्या कौस्तुव कुंडू याच्याकडून संस्कृतीला पराभव पत्करावा लागला. तसेच आठव्या डावातही बिहारच्या पियुष कुमारकडून संस्कृतीचा पराभव झाला. शेवटच्या व अंतिम डावात संस्कृतीने जिद्दीने मुसंडी मारत चंडीगढच्या एकाक्षा प्रतापसिंह नेगी ह्याला अटीतटीच्या झालेल्या नवव्या सामन्यात पराभूत केले. या स्पर्धेत संस्कृतीने नऊपैकी सात डाव जिंकत आपली रेटींग पन्नास गुणांनी वाढवली असून १९०० रेटींग खालील प्रकारात प्रथम येऊन आकर्षक ट्रॉफीसह एक लाखाचे रोख पारितोषिक पटकावले. संस्कृतीच्या या नेत्रदीपक कार्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील २२३ गावांना पुराचा धोका

### जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सज्ज, धरणांमधून विसर्ग सुरू

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अहिल्यानगर, दि.२९ ;**
जिल्ह्यातील सर्व धरणसाठे नियंत्रणात ठेवण्यासाठी धरणातून विसर्ग सुरू करण्यात आले आहेत. पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर वाढल्याने पुराचा धोका निर्माण झाला आहे. अतिवृष्टी, धरणातील विसर्ग आणि नदीपात्रातील अतिक्रमणामुळे जिल्ह्यातील आठ प्रमुख नद्यांवरील २२३ गावे पूरप्रवण होत आहेत. तालुकास्तरावर आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करण्यात आले आहेत.

इन्फ्लॅटेबल रबर बोट, लाइफ जॅकेट, रोप, एलईडी टॉर्च आदी मदतीसाठी आवश्यक साधने पुरेशा प्रमाणात आहेत. आपत्तीकालीन परिस्थिती उदभवल्यास मदतीसाठी पाचशे आपदा मित्र साधन सामग्रीसह प्रशिक्षणाने सज्ज आहेत.

प्रवरा आणि मुळा या दोन नद्यांचा उगम अकोले तालुक्यात आहे. अकोले तालुक्यात जास्त पाऊस झाल्यावर या दोन्ही नद्यांना पूर येतो. प्रवरा काठावरील १००, तर मुळा काठावरील २४ गावांमध्ये पूरपरिस्थितीचा परिणाम होत आहे. गोदावरीचा उगम नाशिक जिल्ह्यात असला, तरी कोपरगाव, श्रीरामपूर, नेवासे, शेवगाव तालुक्यांतील ४० गावे पूरप्रवण होतात. नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यातून विसर्ग सोडल्यानंतर पुराचा धोका निर्माण होतो. अकोले तालुक्यात प्रवरा नदीचा उगम आहे. जिल्ह्यातील सर्वाधिक १०० पूरप्रवण गावे या नदी काठावर आहेत.

अकोले तालुक्यातील अतिवृष्टी हे पुराचे मुख्य कारण ठरत आहे. २००८ मध्ये ३८ हजार ९१३ क्यूसेकचा उच्चांक आहे. मुळा नदीचा उगमही अकोले तालुक्यातील आहे. अतिवृष्टीमुळे पारनेर-संगमनेर तालुक्याच्या हद्दीतील गावांचा संपर्क तुटत असतो. मुळा धरणाची क्षमता २६ टीएमसी असल्याने पुराचे नियंत्रण होत आहे. हे धरणातील पाणीसाठा नियंत्रणात ठेवण्यासाठी नदीपात्रातील विसर्ग वाढवावा लागतो. धरणाच्या खालील गावे पूरप्रवण होतात. संपूर्ण नदी काठावरील २४ गावे हे पूरप्रवण आहेत. भीमा नदीचा उगम पुणे जिल्ह्यातील असून श्रीगोंदे आणि कर्जत तालुक्यातील नदी काठावरील २० गावे पूरप्रवण आहेत.

## जळगावमध्ये सततच्या पावसाचा उडीद पिकाला फटका

**जळगाव:** - लोकसत्ता टीम)
जळगाव पावसाचा मोठा खंड पडल्याने आधीच उडीद पिकापासून फार उत्पादन मिळण्याची आशा संपुष्टात आली आहे. त्यात ऐन पीक काढणीवर आले असताना पाऊस थांबायचे नाव घेत नसल्याचे दिसून येत आहे. सततच्या पावसामुळे परिपक्व अवस्थेतील उडीद पीक हातचे वाया चालल्याने संबंधित सर्व शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.जळगाव जिल्ह्यात उडीद, मूग, तूर आणि चवळी या कडधान्य वर्गीय पिकांचे सर्वसाधारण क्षेत्र सुमारे ४६ हजार ४१० हेक्टर आहे. प्रत्यक्षात यंदाच्या खरिपात कडधान्य पिकांची पेरणी सात टक्क्यांनी घटून ४३ हजार १२० हेक्टरपर्यंत घसरली आहे. एकमेव तुरीचे क्षेत्र ३६ टक्क्यांनी वाढल्याचे दिसून आले आहे. जिल्ह्यात उडीद पिकाचे सर्वसाधारण क्षेत्र १६ हजार १८१ हेक्टर इतके आहे. प्रत्यक्षात, यंदा १४ टक्क्यांनी पेरणी घटल्याने उडदाचे क्षेत्र १३ हजार ८९० हेक्टपर्यंत घसरले आहे.

# सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी काढणार; हिवाळी अधिवेशनात विधान भवनावर मोर्चा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**सोलापूर, दि. २९ :** ग्रंथालय कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळावे, यासाठी विधान भवनावर मोर्चाचे आयोजन करण्याचा निर्णय कै. शांताबाई मुद्धेबिहाळ सार्वजनिक वाचनालय, मंत्री चंडक नगर, सोलापूर येथे झालेल्या सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

प्रारंभी मल्लिनाथ पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी धनंजय पवार यांच्या हस्ते डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजी नगर विभागीय उपाध्यक्ष विद्यासागर हणमंते होते. बैठकीसाठी महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे केंद्रीय अध्यक्ष सदाशिव बेडगे, सूर्यकांत जाधव उपस्थित होते. यावेळी राज्य शासनाचा उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार धनंजय पवार व उत्कृष्ट ग्रंथालय कर्मचारी पुरस्कार सूर्यकांत जाधव यांना मिळाल्याबद्दल सदाशिव बेडगे यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी विद्यासागर हणमंते, लातूर जिल्हा सचिव संतोष करमले, बाहुबली वाचनालयाचे सचिव पी. सी. भांबरे, सिद्राम मुद्देबिहाळ, सिद्धाराम हालकुडे, नरसिंह मिसालोलू, अरिहंत रत्नपारखे आदी उपस्थित होते. नरसिंह मिसालोलू यांनी आभार मानले.

ग्रंथालय कायदा होऊन ५८ वर्षे झाली, पण ग्रंथालय कर्मचारी हा किमान वेतनापासून वंचित राहिला आहे. आज महाराष्ट्रात ११ हजार १५० ग्रंथालयांत २० हजार ३२१ कर्मचारी काम करीत आहेत. ग्रंथालयाचे अ, ब, क, ड असे चार वर्ग असून, ड वर्गात काम करणाऱ्या ग्रंथपालास दरमहा २२२३ रुपये वेतन व जिल्हा अ वर्ग ग्रंथपालास १६ हजार ८०० रुपये वेतन मिळते. शासन नियमानुसार 'ड' वर्गाचा ग्रंथपाल तीन तास काम करतो. जिल्हा 'अ' वर्ग ग्रंथपाल सहा तास काम करतो.

**बडगा** अमेरिकेकडून भारतीय वस्त्र निर्यातीवर तब्बल ५० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क

# कापूस उत्पादकांना धास्ती; आयात शुल्क सवलतीमुळे भाव कोसळण्याची चिन्हे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मुंबई , दि. २९ :** वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी कापसाची उपलब्धता वाढविण्याकरिता केंद्र सरकारने ३० सप्टेंबरपर्यंत आयात शुल्कात तात्पुरती सवलत दिली होती. ही सवलत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आल्याने देशांतर्गत कापसाचे भाव कोसळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अमेरिकेने भारतीय वस्त्र निर्यातीवर तब्बल ५० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क लादण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे भारतातील वस्त्रोद्योगांवर दबाव वाढला असून, निर्यातदारांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. फक्त वस्त्रोद्योगांवरच नाही तर कापूस उत्पादक शेतकरी आणि कापूस निर्यातदार यांनाही त्याचा थेट आर्थिक फटका बसण्याची चिन्हे आहेत. सध्या कापसाला मिळणारा हमीभाव हा शेतकऱ्यांच्या खर्चाची योग्य भरपाई करतो किंवा त्यांना नफा मिळवून देतो, अशी स्थिती नाही. केंद्र सरकारने २०२५-२६ च्या खरीप हंगामासाठी मध्यम धाग्याच्या कापसाचा हमीभाव ७,७१० रुपये, तर लांब धाग्याच्या कापसाचा हमीभाव ८,११० रुपये प्रति क्विंटल इतका जाहीर केला आहे.

मात्र, उत्पादन खर्च सातत्याने वाढत असल्याने हा दर शेतकऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपुरा पडत आहे. त्यामुळे अमेरिकेच्या शुल्कवाढीबरोबरच हमीभावातील मर्यादेमुळे विशेषतः कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दुहेरी संकटाचा सामना करावा लागणार आहे. दरम्यान, केंद्र सरकारने तातडीची उपाययोजना म्हणून ३० सप्टेंबरपर्यंत कापसावरील आयात शुल्क माफ करण्याचा निर्णय नुकताच घेतला होता. वस्त्रोद्योगाला स्वस्तात कापूस गाठी उपलब्ध करून देणे आणि निर्यात क्षेत्राला चालना देणे, हा त्या निर्णयामागील उद्देश असल्याचे सांगितले जात होते. प्रत्यक्षात तेवढ्यावरच न थांबता पुन्हा नवीन निर्णय घेऊन केंद्र सरकारने कापसावरील आयात शुल्क सवलत ३० सप्टेंबरपासून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्र सरकारने कापूस आयातीवरील शुल्क पुढील चार महिन्यांच्या कालावधीसाठी काढून टाकल्याने देशात कापसाची विक्रमी आयात होण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. परिणामी, देशात कापसाचा साठाही वाढणार आहे. ज्याचा सर्वाधिक फटका कापूस उत्पादक शेतकऱ्यांना बसण्याची शक्यता वाढली आहे. वस्त्रोद्योगांनी कापूस आयातीवरील शुल्क हटविण्याची आणि निर्यात अनुदान देण्याची मागणी सरकारकडे केली होती.

## खारघरमध्ये पुन्हा महिलेची रस्त्यात लूट

**पनवेल :** चार दिवसांपूर्वी खारघर वसाहतीमधील सेक्टर ३५ येथील घरकाम करणारी महिला पायी चालत असताना तीच्या गळ्यातून ७५ हजार रुपयांचे दागीने दुचाकीस्वारांनी चोरण्याची घटना ताजी असताना दोन दिवसांपूर्वी २७ ऑगस्टला रात्री साडेनऊ वाजता खारघर येथील सेक्टर १२ येथे घरकाम करणा-या ५७ वर्षीय महिलेला याच प्रकारे लुटण्यात आले आहे. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात संबंधित महिलेला लुटीबाबत अनोळखी चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदवला आहे. सणासुदीच्या दिवसांमध्ये सामान्य घरकाम करणा-या महिलांना लक्ष्य केले जात असल्याने पोलिसांनी या चोरट्यांना तातडीने पकडण्याची मागणी रहिवाशांकडून होत आहे.

**महत्त्वाचे**

## कांदा धोरण समितीचा खेळखंडोबा



**मुंबई :** भाजप नेते पाशा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या कांदा धोरण समितीचा दुसऱ्यांदा विस्तार करण्यात आला आहे. समितीतील सदस्यांची संख्या २३ वर गेली आहे. समितीच्या कार्यकक्षेत आणि अहवाल सादर करण्याच्या मुदतीबाबत बदल केल्यामुळे आणि वाढत्या सदस्य संख्येमुळे समितीत संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. राज्य सरकारने १२ जून २०२५ रोजी पहिल्यांदा शासन निर्णय काढून पाशा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली कांदा धोरण समितीची स्थापना केली. या समितीने पहिला अंतरिम अहवाल पहिल्या महिन्यात, तर त्यानंतर दर दोन महिन्यांनी सुधारीत आणि सहा महिन्यांत अंतिम अहवाल सादर करणे अपेक्षित होते. त्यानंतर १८ जुलै पुन्हा शासन निर्णय काढण्यात आला. त्यात पणन मंत्र्यांना योग्य वाटतील असे या क्षेत्रातील चार तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला.

## अमेरिकेत रस्त्यावर ‘गतका’ सादर करत असलेल्या शीख व्यक्तीला पोलिसांनी घातल्या गोळ्या

**नवी दिल्ली :** अमेरिकेतील लॉस एंजेलिसमध्ये पोलिसांनी केलेल्या गोळीबारता एका ३५ वर्षीय शीख व्यक्ती ठार झाल्याचा धक्कादायक प्रकार कॅमेऱ्यामध्ये कैद झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा मृत व्यक्ती ‘क्रिप्टो डॉट कॉम’ अरेनाजवळ हातात तलवार घेऊन उभा होता. दरम्यान ही घटना जुलै महिन्यात घडली असून नुकतेच पोलिसांनी या घटनेचा व्हिडीओ जारी केला आहे.
ही घटना १३ जुलै रोजी सकाळी घडली होती. या दिवशी ९११ या अमेरिकेतील आपत्कालीन क्रमांकावर अनेकांनी फोन करून स्ट्रीट आणि ऑलिंपिक या वर्दळीचा भाग असलेल्या चौकात एक व्यक्ती हातात तलवार घेऊन उभा असल्याचे कळवले होते. पोलिसांनी या घटनेतील मृत व्यक्तीची ओळख गुरप्रीत सिंग अशी पटवली आहे.
एलएपीडीने काल त्यांच्या युट्यूब चॅनलवर या घटनेचा व्हिडीओ प्रसिद्ध केला आहे. या व्हिडीओमध्ये तो व्यक्ती रस्त्यावर ‘गतका’ म्हणजे शिख धर्मीयांचा एक पारंपरिक युद्धकला प्रकार सादर करताना पाहायला मिळत आहे.

## हवाई दलातील निवृत्त अधिकाऱ्याच्या घरात चोरी करणारी महिला गजाआड

**पुणे :** हवाई दलातून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्याच्या घरी घरफोडी करणाऱ्या महिलेला वानवडी पोलिसांनी अटक केली. पोलिसांनी २४ तासाच्या आत गुन्हा उघडकीस आणला. तिच्याकडून पाच लाख ८७ हजारांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले. सुधा राजेश चौगुले (३५, रा. बोराटे वस्ती, बी. टी. कवडे रोड, घोरपडी गाव) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत हवाई दलातील निवृत्त अधिकाऱ्याने वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. तक्रारदार ७८ वर्षीय निवृत्त अधिकारी आणि त्यांची पत्नी घोरपडीतील सोपानबाग परिसरात राहायला आहेत. त्यांच्या घरी आरोपी चौगुले ही घरकाम करायची. त्यांचे लक्ष नसल्याची संधी साधून तिने कपाटातील पाच लाख ८७ हजारांचे सोन्याचे हिरेजडीत दागिने चोरून नेले होते. २७ ऑगस्ट रोजी कपाटातून दागिने चोरीला गेल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली.

## इस्रायल-हमास यांच्यात रक्तरंजित संघर्ष

# गाझामध्ये बॉम्बहल्ल्यात ७१ पॅलेस्टिनी ठार; आतापर्यंत ६२ हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू

**जेरुसलेम : दि.२९ वृत्तसंस्था**

गाझा पट्टीतील सर्वात मोठे शहर गाझा सिटी इस्रायली सैन्याच्या लक्ष्यावर असून तिथे सतत हवाई हल्ले व जमिनीवरील कारवाया सुरू आहेत. गुरुवारी रात्री झालेल्या बॉम्बहल्ल्यात १६ पॅलेस्टिनी ठार झाले, तर डझनभर नागरिक जखमी झाले. आतापर्यंतच्या कारवाईत एकूण ७१ पॅलेस्टिनींचा मृत्यू झाला आहे.
गाझाच्या दक्षिण भागातील मदत वितरण केंद्रावर अन्न घेण्यासाठी जमलेल्या नागरिकांवर इस्रायली सैन्याने गोळीबार केला. या कारवाईत चार जण ठार झाले, तर २७ जण जखमी झाले आहेत.
गाझामध्ये मोठ्या प्रमाणात जीवितहानी ऑक्टोबर २०२३ पासून गाझा पट्टीत



सुरू असलेल्या इस्रायली कारवाईत आतापर्यंत ६२ हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये महिला व मुलांचे प्रमाण अधिक आहे. तसेच अन्न व औषधांच्या टंचाईमुळे उपासमारीशी संबंधित आजारांनी ३१७ जणांचा बळी गेला आहे, ज्यामध्ये १२१ मुले आहेत.
गाझा शहर ताब्यात घेण्यासाठी इस्रायलने मोहीम सुरू केली आहे. मंगळवार-बुधवारी रात्री इस्रायली टँकांनी गाझा शहराच्या सीमेत प्रवेश करून गोळीबार केला, ज्यामुळे पॅलेस्टिनींची अनेक रिकामी घरे उद्ध्वस्त झाली. अनेक भागांत इस्रायली सैन्य आणि हमास यांच्यात थेट चकमक सुरू आहे.
एएनआयच्या वृत्तानुसार, इस्रायली सैन्याच्या गिवती ब्रिगेड आणि हमास लढवय्यांमध्ये तीव्र संघर्ष झाला. इस्रायली हल्ल्यांत हमासचे शस्त्रागार उद्ध्वस्त झाले असून त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. कारवाईदरम्यान हमासचा कमांडर महमूद अल-असौद हवाई हल्ल्यात ठार झाला.२२ महिन्यांपासून सुरू असलेल्या युद्धात इस्रायली सैन्याला अजून गाझा शहर पूर्णपणे ताब्यात घेता आलेले नाही. इस्रायली सरकारने या महिन्याच्या सुरुवातीला गाझा शहरावर जमिनीवरून कारवाई करून त्यावर कायमस्वरूपी ताबा मिळवण्याची घोषणा केली होती.

# ओबीसींना २७ टक्के आरक्षण देण्यावर सर्व पक्षांचे एकमत

## मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय

**भोपाळ : दि.२९ वृत्तसंस्था**




मध्य प्रदेशात ओबीसी समाजाला २७ टक्के आरक्षण देण्याच्या प्रश्नावर भाजप, काँग्रेससह सर्वच राजकीय पक्ष एकत्र आले आहेत. गुरुवारी भोपाळ येथील मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत या संदर्भात संयुक्त ठराव मंजूर करण्यात आला.
बैठकीत सर्व पक्षांनी ओबीसींना २७ टक्के आरक्षण देण्याबाबतची वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली. यासाठी विधिमंडळ, कार्यकारी व न्यायपालिका या सर्व स्तरांवर एकत्रित प्रयत्न करण्याचा निर्णय घेण्यात आला. ओबीसी आरक्षणावरील नियमित सुनावणी २३ सप्टेंबरपासून सर्वोच्च न्यायालयात सुरू होणार आहे. त्यासाठी सर्व पक्षांचे वकील १० सप्टेंबरपूर्वी एकत्र येऊन रणनीती आखतील, असे बैठकीत ठरले.
मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव म्हणाले, ‘‘२७ पैकी १३ टक्के पदे अजूनही प्रलंबित आहेत. या पदांवर ओबीसी समाजाला आरक्षणाचा लाभ मिळावा, अशी आमची इच्छा आहे.’’दरम्यान, माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांनी वरुन टीका केलीये. ते म्हणाले, ‘‘सर्वपक्षीय बैठक बोलावणे म्हणजे जनतेची दिशाभूल करण्याचे षडयंत्र आहे.

## उत्तराखंडमध्ये निसर्गाचा प्रकोप; रूद्रप्रयागमध्ये ढगफुटी, दोन नागरिक बेपत्ता



**चमोली : दि.२९ वृत्तसंस्था**

उत्तराखंडमध्ये गेले काही दिवस मुसळधार पाऊस सुरू आहे. ढगफूटीमुळे नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. चमोली येथून दोन नागरिक बेपत्ता झाल्याचे देखील समजते आहे. अनेक जनावरे देखील ढीगाऱ्याखाली अडकली असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.
समोर आलेल्या माहितीनुसार, ढगफुटीमुळे खूळ मोठ्या प्रमाणात चिखल आणि डोंगराचा भाग खाली वाहून आला आहे. त्यामध्ये अनेक जनावरे माणसे अडकली असण्याची शक्यता आहे. एक गोशाळा देखील या ढीगाऱ्याखाली आल्याची शक्यता आहे. ज्यात १५ ते २० जनावरे अडकली असण्याचा अंदाज आहे. याबाबत उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी सोशल मिडियावर याबाबत माहिती दिली आहे. उतरराखंडच्या रुद्रप्रयाग जिल्ह्यातील बासुकेदार भागात आणि चमोली जिल्ह्यात ढगफुटीमुळे ढिगारा वाहून आला आहे. त्यात काही कुटुंबे अडकली असल्याची माहिती मिळाली. स्थानिक प्रशासन मदत आणि बचावकार्य युद्धपातळीवर करत आहे. मी संबंधित यंत्रणेच्या संपर्कात आहे. त्यांना आवश्यक त्या सूचना मी दिल्या आहेत. मी सर्वांच्या सुरक्षिततेसाठी बाबा केदार यांच्याकडे प्रार्थना करतो.
गेल्या काही दिवसांपासून अनेक राज्यांत मुसळधार पाऊस होत आहे. त्यात जम्मू-काश्मीरमध्येही मुसळधार पाऊस सुरु आहे. या मुसळधार पावसाने कहर केला. या पावसाचा फटका श्री माता वैष्णोदेवी यात्रा मार्गाला बसला आहे.

## ‘फार्मर कप’चा राज्यभर विस्तार

**मुंबई : दि.२९ वृत्तसंस्था**

अभिनेते अमीर खान यांच्या पुढाकाराने सुरू असलेला सत्यमेव जयते फार्मर कप, हा उपक्रम आता राज्यभरात राबविला जाणार आहे. या बाबतचा शासन निर्णय नुकताच प्रसिद्ध झाला आहे. मंत्रालयात गुरुवारी अमीर खान यांच्या उपस्थितीत झालेल्या पहिल्या बैठकीत या उपक्रमाची रुपरेषा निश्चित करण्यात आली. प्रशिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतीमालाचा उत्पादन खर्च कमी करून उत्पादनात वाढ करणे, हा फार्मर कपचा मुख्य उद्देश आहे.राज्यात २०२२ पासून अमीर खान यांच्या पुढाकारने पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून सत्यमेव जयते फार्मर कप उपक्रम सुरू आहे.

# वाघा सीमेवर जवानांना गुडघ्यापर्यंत पाण्यात करावी लागली परेड

## भारतावर भडकला पाकिस्तान, केले गंभीर आरोप

**नवी दिल्ली : दि.२९ वृत्तसंस्था**

वाघा सीमेवर होणाऱ्या दररोज भारत आणि पाकिस्तानच्या लष्काराची परेड होत असते, दरम्यान दैनंदिन परेडपूर्वी पाकिस्तानच्या बाजूला गुडघ्यापर्यंत पाण्यात साचले. त्यामुळे पाकिस्तानी जवानांना पाण्यातच परेड करावी लागली. याचा व्हिडिओ व्हायरल होताच पाकिस्तान भारतावर संतापला आहे. भारताच्या बाजून ग्रँड ट्रंक हायवेची उंची वाढविल्यानेच हे पाणी साचल्याचा आरोप पाकिस्तानने केला आहे.
भारताने वाघा-अटारी सीमेवर आधीच पावसाचे पाणी साठवण्याची आणि चांगली ड्रेनेज व्यवस्थापन प्रणाली लागू केली आहे. यामुळे, मुसळधार पाऊस असूनही, भारतीय बाजू स्वच्छ आणि जवळजवळ पाणीविरहित दिसत होती, तर पाकिस्तानी बाजूने, रेंजर्स गुडघ्यापर्यंत घाणेरड्या पाण्यात उभे असल्याचे दिसून आले.सततच्या मुसळधार पावसामुळे पाकिस्तान सध्या भीषण पुराचा सामना करत आहे. वाघा सीमेवर परेड परिसरही चिखल आणि पाणी साचले आहे. समारंभापूर्वी पाकिस्तानी भागात अनेक ठिकाणी वाळूच्या पिशव्या ठेवण्यात आल्या होत्या. याउलट, भारतीय बाजूने, सीमा प्रवेशद्वाराजवळील फक्त एक छोटासा भाग पाण्याने बाधित झाला होता. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारताच्या तक्रारींनंतर, पाकिस्तानने घाईघाईने काही तात्पुरते नाले बांधले आणि रस्त्याचा भाग उंचावला जेणेकरून पाणी बाहेर पडू शकेल.



# महिला वीरेंद्र पप्पी यांना पुन्हा ६ दिवसांची ईडी कोठडी

**बेंगळूर : दि.२९वृत्तसंस्था**

कमजोर बेटींगशी संबंधित मनी लँडिंग सामना चित्रदुर्गचे बेद्री सैनिक वीरेंद्र पप्पी यांच्या ईडी कोठडीत ६ दिवसांनी वाढ झाला आहे. वीरेंद्र पप्पी यांना ईडीच्या प्रामाणिक सिक्कीममध्ये अटक केली होती. त्यांना ५ दिवसांसाठी ईडीचे दिले होते. संपूर्ण ही संपुष्टात त्यांच्या कोठडीत पुन्हा ६ दिवसांनी वाढ करण्यात आली आहे. गुरु उत्सव उत्सव ईडीच्या वकिलांना फटकारले. वीरेंद्र पप्पी यांना झोपेसाठी वेळ द्या, शुद्ध पिण्याचे पाणी, अशी औषधे, अशी इतर सुविधा पुरवितात. तसेच



३० मिनिट वकिल भेटी मुभा द्यावी, असे निर्देश दिले. विरोध करताना विरोधी कोणते नोंदवले? २०११ चा खटला रद्द झाला आहे. २०१६ चा सीबीआयचा खटलाही बंद झाला आहे. तरीही खटल्यांचा उल्लेख केला आहे. कोणत्या प्रकरणाच्या आधारे ईसीआयआर तुम्ही आहात?, तुम्ही न्यायालयाची दिशाभूल करत आहात? आपल्याला ईडीच्याकडून वेळ दिली जात नाही. औषधाची व्यवस्था करण्यात आली नाही. सतत आपल्या मूळ पुरेशी झोप होत नाही, अशी तक्रार महिला वीरेंद्र यांनी केली आहे. अनेकांसाठी ईडीच्या वकिलांना फटकारले.

# ‘नागरिकत्व सिद्ध करा अन्यथा यादीतून नाव काढा’; निवडणूक आयोगाचे बिहारच्या ३ लाख मतदारांना आदेश

**नवी दिल्ली : दि.२९ वृत्तसंस्था**

बिहारमध्ये स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन अंतर्गत मतदार यादीची तपासणी करण्याचे काम अंतिम टप्प्यात पोहचले आहे. निवडणूक आयोगाच्या म्हणण्यानुसार, बिहारमधील अंतिम मतदार यादी ३० सप्टेंबर रोजी प्रकाशित केली जाणार आहे. त्यापूर्वी, ३ लाखांहून अधिक ‘संदिग्ध’ मतदारांची नावे वगळली जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आयोगाला या मतदारांनी त्यांच्या मतमोजणी फॉर्मसह सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये




गंभीर त्रुटी आढळल्या आहेत. निवडणूक आयोगाने अशा सर्व मतदारांना नोटिसा पाठवण्यास सुरुवात केली आहे. संबंधित भागातील एसडीएमच्या चौकशी अहवालाच्या आधारे, किशनगंज, पूर्णिया, पश्चिम चंपारण, पूर्व चंपारण, अररिया, सहरसा, मधुबनी आणि सुपौल जिल्ह्यातील मतदारांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. म्हणजेच, नेपाळ आणि बांगलादेशच्या सीमेला लागून असलेल्या सीमांचलमध्ये अशी अनेक प्रकरणे आहेत.दरम्यान संदिग्ध असणारे हे ३ लाख लोक असे असू शकतात जे बांगलादेश, नेपाळ, म्यानमार आणि अफगाणिस्तानमधून बेकायदेशीर घुसखोरी करून भारतात आले आहेत. बनावट कागदपत्रांच्या आधारे मतदार ओळखपत्रे मिळवली आहेत. त्यांनी त्यांचे आधार आणि इतर कागदपत्रे कशी बनवली याचीही चौकशी आता केली जाणार आहे. या मतदारांनी अद्याप त्यांची ओळख पडताळण्यासाठी निवडणूक आयोगाकडे कोणतेही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्यामुळे आयोग त्यांना नोटिसा पाठवत आहे.बिहारमध्ये एसआयआर प्रक्रियेअंतर्गत, अशा ६५ लाख लोकांची आधीच ओळख पटवण्यात आली आहे, ज्यांची नावे अंतिम मतदार यादीतून वगळण्यात येणार आहेत.



# काँग्रेस-भाजपचे कार्यकर्ते भिडले

**नवी दिल्ली : दि.२९ वृत्तसंस्था**

बिहारमध्ये काँग्रेस खासदार राहुल गांधी आणि आरजेडी नेते तेजस्वी यादव यांची सध्या मत अधिकार यात्रा सुरू आहे. निवडणूक आयोगावरील मतचोरीचे आरोप आणि बिहार निवडणुकीपूर्वी सुरू असलेली विशेष सघन पुर्नपडताळणी यांविरोधात ही यात्रा काढली जात आहे. अशातच बिहारची राजधानी पटना येथून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. राजधानी पटना मध्ये भाजप आणि काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाल्याची माहिती आहे.
दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी अशी होती की ज्याच्या हातात जे काही होते ते त्यानेच हाणामारी करत होते. दोन्ही बाजूंच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांना काठ्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. विटा आणि दगडफेक करण्यास सुरुवात केली. काही भाजप कार्यकर्ते हे काँग्रेस कार्यालयाच्या बाहेर काँग्रेसविरुद्धच्या निदर्शन करण्यासाठी जमले होते. त्यावेळी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाले.पंतप्रधान मोदींविरुद्ध वापरण्यात आलेल्या आक्षेपार्ह शब्दांमुळे भाजप कार्यकर्ते संतप्त झाले होते. या संदर्भात ते सदकत आश्रम (काँग्रेस कार्यालय) बाहेर काँग्रेसविरुद्ध निदर्शने करण्यासाठी जमले होते. भाजप कार्यकर्त्यांच्या हातात फलक होते ज्यावर ‘‘मां का अपमान, कांग्रेस की पहचान’’, ‘‘मां का अपमान नहीं सहेगा बिहार’’ असे घोषणा लिहिलेल्या होत्या. लाठीचार्ज दरम्यान, घटनास्थळी उपस्थित असलेल्या पोलिसांनी हस्तक्षेप केला. दोन्ही बाजू माघार घेण्यास तयार नव्हत्या. यामध्ये दोन्ही पक्षांचे अनेक कार्यकर्ते जखमी झाले आहेत. याच हाणामारीत काही भाजपचे कार्यकर्ते काँग्रेस कार्यालयात घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला. पण काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्यांना हाकलून लावले आणि त्यानंतर हाणामारीची परिस्थिती निर्माण झाली. मारहाण वाढत गेली आणि गोंधळबी वाढत गेला.

**चिंताजनक** — आयुर्मान तबब्ल ३.५ वर्षांनी घटल्याचा अहवाल समोर

# हवेतील धुलिकणांनी वाढलेल्या प्रदूषणाचा भारतीयांना फटका

**शिकागो, दि.२९ वृत्तसंस्था**

शिकागो विद्यापीठातील ‘एनर्जी पॉलिसी इन्स्टिट्यूट’ने तयार केलेल्या अहवालामध्ये भारतात हवेतील ‘पीएम-२.५’ या सुक्ष्म धुलिकणांचे प्रमाण हे २०२२ च्या तुलनेत २०२३ मध्ये खूप अधिक असल्याचे दिसून आले आहे.
‘डब्लूएचओ’च्या मानकानुसार हे प्रमाण आठपटीपेक्षाही अधिक आहे. हे प्रमाण जागतिक मानकांच्या पातळीवर आले तरीसुद्धा भारतीयांच्या सरासरी आयुर्मानामध्ये केवळ ३.५ वर्षांचीच भर पडू शकते.
जागतिक आरोग्य संघटनेच्या २०२१ सालच्या हवा गुणवत्तेसंबंधीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ‘पीएम-२.५’ या कणांसाठी वार्षिक सरासरी मर्यादा ही




प्रति क्युबिक मीटर पाच मायक्रोग्रॅम एवढी निश्चित करण्यात आली आहे तर ‘पीएम-१०’ या कणांसाठी हे प्रमाण प्रति क्युबिक मीटर पंधरा मायक्रोग्रॅम एवढे आहे.
भारत सरकारने तयार केलेल्या नियमांशी याची तुलना केली असता ही मर्यादा अधिक काटेकोर असल्याचे दिसून येते. भारताने ‘पीएम-२.५’ या धुलिकणांसाठी ही मर्यादा ४० मायक्रोग्रॅम एवढी निश्चित केली असून ‘पीएम-१०’ या कणांसाठी हे प्रमाण ६० मायक्रोग्रॅम एवढे आहे.
देशातील ४६ टक्के लोकसंख्या ही अशा प्रदेशात वास्तव्यास आहे ज्या ठिकाणी ‘पीएम-२.५’ या धुलिकणांचे प्रमाण राष्ट्रीय मानकान्वये (चाळीस मायक्रोग्रॅम प्रति क्युबिक मीटर) निश्चित करण्यात आलेल्या प्रमाणापेक्षा कित्येकपटीने अधिक आहे. याबाबतीत आपण राष्ट्रीय मानकांनी निश्चित केलेली पातळी गाठू शकलो तरीसुद्धा या प्रदेशातील नागरिकांच्या आयुर्मानामध्ये दीड वर्षांची भर पडू शकते.
उत्तर भारतातील मैदानी प्रदेशात प्रदूषणाचे प्रमाण हे सर्वाधिक असून या भागामध्ये आरोग्य संघटनेने निश्चित केलेल्या मानकांचे पालन करण्यात आल्यास ३८.९ टक्के भारतीय नागरिकांच्या आयुर्मानामध्ये सरासरी पाच टक्क्यांची वाढ होऊ शकते. याच नियमाला अनुसरून देशभरातील सुक्ष्म धुलिकणांचे प्रमाण हे कमी केल्यास भारतीयांचे सरासरी आयुर्मान हे ८.२ वर्षांनी वाढू शकते.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

## संपादकीय...

# पुराचा तडाखा

सध्या हवामान विभागाचा यंदाच्या वषी मुसळधार पावसाचा इशारा खरा ठरला आहे. देशाच्या विविध भागांमध्ये अतिवृष्टी आणि ढगफुटीमुळे सध्या भीषण पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. उत्तर प्रदेश, उत्तराखंड, अरुणाचल प्रदेश, बिहार, हिमाचल प्रदेश या राज्यांना पावसाने मोठा तडाखा दिला असून, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये तर गेले अनेक आठवडे ही भीषण स्थिती कायम आहे. उत्तर प्रदेशच्या मैदानी भागात गंगा, यमुना आणि अन्य नद्यांच्या पाण्यामुळे अनेक ठिकाणचा सखल भूप्रदेशही पाण्याखाली आला आहे. वाराणसीत भीषण स्थिती निर्माण झाली असून निम्मे प्रयागराज पाण्याखाली गेल्याचे चित्र पाहायला मिळते आहे. उत्तर प्रदेशातील बुंदेलखंड, फतेहपूर, चंदोली अशा अनेक भागात मोठी आव्हानात्मक स्थिती निर्माण झाली आहे. बिहारमध्येही अनेक ठिकाणी अशीच स्थिती असून, खुद्द राजधानी पाटणा शहरालाही पुराचा तडाखा बसला आहे. याखेरीज गुजरातचा काही भाग, पश्चिम बंगालचा काही भाग पावसाच्या तडाख्यात सापडला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले असून, शेती आणि पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी घरांचीही मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. उत्तर प्रदेशात प्रयागराजसारख्या ठिकाणी 'एनडीआरएफ'ची पथके तैनात केली गेली आहेत; पण जवळपास निम्मे शहर पाण्याखाली गेल्याने सरकारी मदत सामग्री आणि यंत्रणा अपुरी पडत आहे. या सगळ्या परिस्थितीचा सामना करणाऱ्या राज्य सरकारांना अशा संकटकाळात केंद्राकडून मदत मिळणे अपेक्षित असते. किंबहुना केंद्रीय पातळीवरून या स्थितीकडे बारकाईने लक्ष ठेवले जाते आणि आवश्यक तिथे तातडीची मदत पाठविली जाते, पण गेले दोन-चार दिवस या ज्या पुराच्या सततच्या बातम्या येत आहेत त्यात कोठेही केंद्र सरकारकडून या आपत्तीची गांभीर्याने दखल घेतल्याचे जाणवत नाही. किंबहुना केंद्र सरकारला या नैसर्गिक आपत्तीची कल्पना आहे की नाही अशी शंका यावी अशीच स्थिती सध्या दिसते आहे. दुसरीकडे, अमेरिकेने भारतीय मालावर जो २५ टक्के ज्यादाचा कर लावला आहे त्यातून निर्माण झालेले आव्हानही मोठे आहे. रशियाकडून तेल आयात करायला अमेरिकेने भारताला बंदी केली आहे, या पार्श्वभूमीवर काही युरोपियन देशांनी भारताकडून रिफाइंड तेल घ्यायचे नाही असा निर्णय घेतला आहे. असे एका पाठोपाठ एक आव्हानात्मक विषय समोर असल्यामुळे सरकारला बहुधा देशांतर्गत पूरस्थितीकडे लक्ष द्यायला वेळ मिळाला नसावा. त्या त्या राज्यातील पूरस्थितीचा मुकाबला करण्याची जबाबदारी त्या त्या राज्यांवरच सोपवून केंद्र सरकार स्वस्थ बसलेले दिसत आहे. तथापि, उत्तराखंड, हिमाचल प्रदेशसारख्या राज्यांचा विचार केला तर त्या राज्यांना गेल्या अनेक महिन्यांपासून गंभीर नैसर्गिक आपत्तीचा सातत्याने सामना करावा लागत आहे. या आपत्तीचा सामना करताना हिमाचल प्रदेशसारख्या छोट्या राज्याचे आर्थिक कंबरडे साफ मोडून गेल्याचेही दिसते आहे. त्यामुळे हिमाचल प्रदेशने केंद्राकडे मदतीसाठी वारंवार याचना केली असली, तरी केंद्र सरकारने त्यांच्याकडेही लक्ष दिलेले नाही. मुळात विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांकडे लक्षच द्यायचे नाही असा केंद्रातील सरकारचा खाक्या असला, तरी अनेक भाजपशासित प्रदेशातही आता पूरस्थितीचे आव्हान निर्माण झाले आहे. भाजपचे सरकार असलेल्या उत्तराखंडलाही या स्थितीचा सामना करताना मोठीच आर्थिक टंचाई निर्माण झाली आहे; पण त्या राज्याकडे तरी केंद्राचे लक्ष आहे असे पाहायला मिळत नाही. केंद्र सरकार स्वतःच आर्थिक अडचणीत असेल, तर अशा परिस्थितीत आपदग्रस्त राज्यांना मदत करताना केंद्राला दहा वेळा विचार करावा लागतो ही गोष्ट खरी आहे. पण सरकारचा दावा तर आर्थिक परिस्थिती उत्तम असल्याचा आहे, मग अशा परिस्थितीत सरकार मदतीचा हात का आखडता घेत आहे असा स्वाभाविकच प्रश्न निर्माण होतो. निदान आपद्ग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी केंद्रीय पातळीवरून तातडीचा संपर्क साधून समन्वय प्रस्थापित करणे आणि त्यांच्या नेमक्या गरजा लक्षात घेणे सहज शक्य आहे. पंतप्रधान आणि गृहमंत्री वेगवेगळ्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी व्यस्त असले तरी केंद्रातील काही ज्येष्ठ मंत्र्यांकडे विशेषतः अर्थमंत्र्यांकडे स्वतंत्र जबाबदारी सोपवून या राज्यांना मदतीचा हात देण्याची खबरदारी सरकारने पार पाडायला हवी. परंतु तशीही कोणती हालचाल सध्या सुरू असल्याचे पाहायला मिळत नाही. महाराष्ट्रातही कोल्हापूर, सांगली सारख्या भागात पूरजन्य स्थिती आहे. मात्र, तेथे देशातल्या अन्य राज्यांप्रमाणे फार नुकसान झालेले नाही. सध्याचे हवामानाचे चित्र पाहता आणखी काही दिवस देशाच्या विविध भागाला पावसाचा मोठा तडाखा बसण्याची शक्यता आहे त्यामुळे केंद्र सरकारने आता बाकीच्या विषयातून थोडा वेळ काढून पूरग्रस्त राज्यात जे लाखो लोक बाधित झाले आहेत त्यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे आणि संबंधित राज्यांना आर्थिक मदतीचाही हात दिला पाहिजे.

# बौद्धांनो जागे व्हा पुन्हा महार बनू नका..!



## विचारमंथन

डॉ. एम.आर.इंगळे
मो. 9423429060



आजही आमच्या अशिक्षित लोकांसोबतच शिक्षित व उच्च शिक्षित लोकांमध्ये जनगणनेच्या फॉर्म मध्ये धर्म आणि जात काय लिहावी असा संभ्रम कायम आहे. यावरून समाज खरंच प्रज्ञावंत झाला का? हा प्रश्न निर्माण होतो.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा संदेश : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर, १९५६ रोजी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यापूर्वी १९३५ पासून त्यांनी त्याकाळातील समस्त अस्पृश्य वर्गाला आपल्या उन्नतीसाठी धर्मांतराची आवश्यकता पटवून देण्यासाठी अनेक जातीच्या सभा घेऊन मार्गदर्शन केले. पण फक्त महार जातींनी त्यांचं ऐकलं आणि १४ ऑक्टोबर, १९५६ रोजी धम्म दीक्षा सोहळ्यात सहभाग घेऊन बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या दीक्षा समारंभाच्या दुसऱ्या दिवशी दिनांक १५ ऑक्टोबर, १९५६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जमलेल्या समुदायासमोर तब्बल दोन तास भाषण करून फार मोलाचे मार्गदर्शन केले आणि अनमोल संदेश दिला. ते म्हणाले होते की, ''आता केवळ राखीव जागा आणि सवलतीसाठी आम्ही महार म्हणवून घेणार नाही.'' कारण महार ही जात हिंदू धर्मात होती. आता आम्ही बौद्ध धर्मीय झालो. त्यामुळे ''आम्हाला इज्जत प्यारी आहे, लाभ प्यारा नाही.'' तसेच ते म्हणाले होते की, ''आम्ही बौद्ध धर्मीय झालो तरी राजकीय हक्क मी मिळवीन याची मला बालंबाल खात्री आहे. मी मेल्यावर काय होईल हे सांगता येणार नाही. पण ''माझ्या पोतडीत सर्व काही भरलेले आहे....हे जे हक्क मिळविले ते मीच माझ्या लोकांच्यासाठी मिळविले. ज्याने हे हक्क मिळविले ते तो पुन्हा मिळवून देईलच.'' याची खात्री बाळगा. परंतु धम्म दीक्षेनंतर अवघ्या पावणेदोन महिन्यातच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. त्यामुळे बौद्धांना राखीव जागा व सवलती देण्याचा प्रश्न प्रलंबित राहिला.

पंतप्रधान दिवंगत व्हि.पी.सिंग यांचा निर्णय: दिवंगत व्ही.पी.सिंग भारताचे प्रधानमंत्री झाल्यानंतर त्यांनी १९९० मध्ये बौद्ध धर्मियांना अनुसूचित जातींच्या सवलती व आरक्षण लागू करण्याचा शासन निर्णय काढला आणि बौद्धांना अनुसूचित जाती म्हणून आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. त्या निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र सरकारने ८ नोव्हेंबर, १९९० रोजी शासन निर्णय काढला. त्यात असे नमूद आहे की, ''भारतीय घटनेच्या अनुच्छेद ३४१ नुसार अनुसूचित जातीसंबंधी घटना आदेश १९५० च्या परिच्छेद ३ नुसार केवळ हिंदू किंवा शीख धर्मियांना अनुसूचित जातीचे समजले जावू शकत होते. तथापि, अनुसूचित जातीमधून बौद्ध धर्मात धर्मांतरितांना अनुसूचित जातीचा दर्जा मिळावा या हेतूने केंद्र शासनाने घटना (अनुसूचित जाती) आदेश (सुधारणा) कायदा १९९० दिनांक ३ जून, १९९० अन्वये घटना (अनुसूचित जाती) आदेश १९५० मध्ये सुधारणा करून अनुसूचित जातीसंबंधी घटना आदेश बौद्ध धर्मियांनाही लागू करण्यात आल्याचे घोषित केले आहे.'' त्यानुसार अनुसूचित जातीची यादी हिंदू, शीख आणि बौद्ध धर्मियांनाही आता लागू झालेली आहे.'' म्हणजे दिनांक ३ जून, १९९० पासून बौद्ध धर्मियांना राज्य तथा केंद्र शासनाच्या घटनात्मक तथा सर्व प्रकारच्या सवलती व आरक्षणाचा फायदा घेता येईल. तसेच ते अस्पृश्यता निवारणार्थ असलेल्या योजनांचाही लाभ मिळण्यास पात्र असतील.'' याचा अर्थ बौद्ध धर्मियांना १९९० पासून राज्यात आणि केंद्रात अनुसूचित जातीच्या सवलती व आरक्षण लागू आहे. त्यामुळे बौद्धांनी पुन्हा आपली जात महार नोंदविणे म्हणजे अज्ञानीपणाच म्हणावा लागेल.

संभ्रम व वास्तव आणि सन्मान : महाराष्ट्र राज्यात बौद्धांना अनुसूचित जातीच्या सवलती मिळतात पण केंद्रात त्या मिळत नाहीत असा गोंधळ व गैरसमज हेतूत: बऱ्याच वर्षांपासून समाजात पसरविला जाऊन घट्ट केला आहे. त्यामुळे आता पुन्हा जातीनिहाय जनगणना होणार असल्याने या जनगणनेत धर्म बौद्ध पण जातीच्या रकान्यात काय लिहावे असा प्रश्न निर्माण करून समाजाला संभ्रमित व गोंधळात टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. या पार्श्वभूमीवर माझे समस्त बौद्ध धर्मियांना नम्र आवाहन आहे की, आपण धर्माच्या रकान्यात बौद्ध आणि जातीचा रकाना निरंक ठेवावा कारण बौद्ध धर्मात जाती व्यवस्था नाही. मात्र जर प्रगणक जातीचा रकाना भरण्याचा आग्रह करत असेल तर जातीच्या रकान्यात अनुसूचित जाती असा उल्लेख करावा. कोणत्याही परिस्थितीत जात महार लिहू नये. कारण भारतीय संविधानाने कोणत्याही जातीला नाही तर सामाजिक प्रवर्गाला आरक्षण व सवलती दिल्या आहेत. या प्रवर्गात कोणत्या जातींचा समावेश करावा यासाठी शासनाने जातींची यादी तयार केली आहे आणि हिंदू व शीख धर्मात जाती आहेत पण बौद्ध धर्मात जाती नाहीत. म्हणून १९९० पासून बौद्ध धर्मियांना बौद्ध म्हणूनच अनुसूचित जातीच्या सर्व सवलती व आरक्षण लागू झालेले आहे. त्यामुळे जात लिहिण्याचा प्रश्नच नाही. पण तरीही आपल्या समाधानासाठी जातीच्या रकान्यात अनुसूचित जाती असे नमूद केल्यास काहीही हरकत नाही. महाराष्ट्र शासनाचा दिनांक ८ नोव्हेंबर, १९९० चा शासन निर्णय आहे. त्याचे अवलोकन करावे म्हणजे सर्व गैरसमज दूर होतील. म्हणून जनजागृती करणे आणि १९९० च्या शासन निर्णयाच्या माहितीचा समाजात प्रचार करणे आवश्यक आहे. '' सन्मान हवा की लाचारी'' याचा विचार व्हावा हीच सदिच्छा. जयभीम, जय भारत, जय संविधान...!

# अन्नदात्याची निष्ठा का हरविली?

## कृषी जगत



अशोक वानखेडे
यवतमाळ



ज्या देशाचा आत्माच कृषी संस्कृतीत वसलेला आहे, तिथे आज मातीचा खरा पुत्र, शेतकरी, आपल्याच शेतीपासून दुरावला आहे. त्याची मातीवरची निष्ठा का हरवली, हा प्रश्न आज प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा. सत्तेच्या सारीपाटावर खेळल्या जाणाऱ्या राजकारणाने आणि मतांच्या गणितासाठी आखलेल्या धोरणांनी, शेतीची जीवनवाहिनी असलेली सहायक श्रमशक्ती पद्धतशीरपणे संपवली आहे. यामुळे अन्नदाता आज स्वतःच निराधार झाला आहे. हा लेख याच विदारक वास्तवाला एका शेतकऱ्याच्या अनुभवातून भिडतो. तो केवळ समस्या मांडत नाही, तर व्यवस्थेतील प्रत्येक घटकाला आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडून, हक्कासोबत कर्तव्याची जाणीव देणाऱ्या एका नव्या सामाजिक कराराची दिशा दाखवणारा हा एक प्रामाणिक जागर आहे.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, तशीच ती कष्टकऱ्यांची आणि शेतकऱ्यांची कर्मभूमी आहे. या मातीने अनेक संकटे झेलली, अनेक दुष्काळ पाहिले, पण इथल्या शेतकऱ्याने कधी आपली मातीशी असलेली नाळ तुटू दिली नाही. त्याची शेतीवरची निष्ठा हीच या राज्याच्या विकासाचा आणि समृद्धीचा खरा आधार राहिली आहे. पण आज, स्वातंत्र्याच्या अमृतकाळात, तोच शेतकरी आपल्या अस्तित्वाच्या लढाईत एकाकी पडला आहे. त्याची शेतीवरची निष्ठा हरवत चालली आहे, आणि यामागे केवळ निसर्गाचा लहरीपणा नाही, तर आपल्या राजकीय आणि सामाजिक धोरणांनी निर्माण केलेला एक अदृश्य चक्रव्यूह आहे. एखाद्या जिवंत नदीला निरंतर वाहण्यासाठी जसे जमिनीतले पाझर सतत ओले असावे लागतात, त्याचप्रमाणे शेतकऱ्याला शेती करण्यासाठी सहायक श्रमिकांची आणि शासनाच्या आश्वासक धोरणांची साथ मिळणे आवश्यक असते. पण आज हे दोन्ही पाझर आटत चालले आहेत आणि शेती संस्कृती नावाचा प्रवाहच कोरडा पडण्याच्या मार्गावर आहे. ही परिस्थिती का निर्माण झाली, याचा शोध घेतला असता, आपल्या राजकीय व्यवस्थेचे अपयश प्रकर्षाने समोर येते. सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष, हे दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू बनून, केवळ सत्ता मिळवण्याच्या आणि टिकवण्याच्या खेळात मग्न आहेत. त्यांच्या धोरणांचा केंद्रबिंदू हा समाजाचा शाश्वत विकास नसून, तात्पुरत्या लोकप्रियतेसाठी आखलेल्या योजना बनल्या आहेत. या राजकारणाचा सर्वांत मोठा बळी ठरला आहे तो शेतकरी आणि शेतीसाठी आवश्यक असलेली सहायक श्रमशक्ती. संविधानाने या कृषिप्रधान देशातील शेतकरी आणि सहायक कृषी श्रमिक या दोघांनाही समान जीवनमान जगण्याचा अधिकार दिला आहे. पण योजनांच्या वाटणीच्या तराजूत, भूमिहीन श्रमिकाला झुकते माप दिले जात आहे, असा एक सूर शेतकऱ्यांमध्ये आहे. यामुळे शेती आणि शेतकरी यांच्यातील एक नैसर्गिक आणि परंपरेने चालत आलेले नाते तुटत आहे. या धोरणांमुळे श्रमिकांना तात्पुरता आधार मिळत असेलही, पण शेतीसाठी आवश्यक असलेली श्रमशक्ती कायमची नाहीशी होत आहे, ज्याचा अंतिम फटका संपूर्ण कृषी अर्थव्यवस्थेला बसत आहे. राजकीय धोरणांनी निर्माण केलेली ही समस्या म्हणजे आपणच मुद्दाम उभे केलेले संकट आहे. कोणतेही नैसर्गिक संकट आले, तर त्यावर मात करण्याचे सामर्थ्य आपल्या संस्कृतीत आणि आत्मविश्वासात आहे. पण जेव्हा संकट मानवनिर्मित असते, तेव्हा ते अधिक घातक ठरते. कारण, ते निर्माण करणाऱ्यांना ते संकट आहे, हेच मान्य नसते. शेतीसाठी लागणाऱ्या श्रमशक्तीचा पद्धतशीरपणे नाश होत असताना, याची जाणीव सत्ताधारी आणि विरोधक दोघांनाही आहे. तरीही हे का घडवले जात आहे? कुणाच्या फायद्यासाठी शेती संस्कृतीचा गळा घोटला जात आहे? या प्रश्नांची उत्तरे आता शेतकऱ्यानेच शोधायला हवीत. निव्वळ श्रमशक्तीचा नाश करणाऱ्या राजकीय व्यवस्थेवर राज्य चालवणे, म्हणजे पाया पोखरून कळस सांभाळण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे. या गंभीर परिस्थितीत, शासकीय योजनांची अंमलबजावणी हा एक चिंतेचा विषय आहे. कोणत्याही पायाभूत विकासात्मक योजनेला भ्रष्टाचार नावाचा कर्करोगापेक्षाही भयानक रोग स्पर्श करत आहे. हा स्पर्श जाणीवपूर्वक होतो की आपोआप, हा भाग वेगळा, पण यामुळे योजनांचा मूळ उद्देशच नष्ट होतो. यावर उपाय म्हणून एका नव्या सामाजिक कराराची गरज आहे. शासकीय स्तरातून कोणतीही योजना सुरू करताना, लाभार्थ्यांवर एक जबाबदारी निश्चित केली पाहिजे. त्यांनी एका हाताने योजनेचा लाभ घ्यावा आणि दुसऱ्या हाताने, मिळालेल्या लाभाचा काही वाटा राज्याच्या सामाजिक विकासासाठी परत करावा. यासाठी एक योग्य नियम आणि बांधिलकी तयार केली पाहिजे. यामुळे 'हक्क' आणि 'कर्तव्य' यांची सांगड घातली जाईल आणि केवळ लाभाची अपेक्षा करण्याच्या वृत्तीला आळा बसेल. हे विचार मांडत असताना, याची जाणीव आहे की, विकासाचा धोरणात्मक आराखडा तयार करणाऱ्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांइतकी ही विचारसरणी अभ्यासू नसेल. पण या विचारांमागे 'शेतीनिष्ठ संस्कृती'चा, म्हणजेच मातीत प्रत्यक्ष घाम गाळण्याचा अनुभव आहे. अनेक अडचणींना तोंड देऊन, स्वबळावर शेती पुढे नेण्याचा अनुभव आहे. हाच प्रयत्न आहे की, या अनुभवातून निघालेले विचार सत्ताधारी, विरोधक, शेतकरी आणि शेतीसाठीची सहायक श्रमशक्ती या सर्वांना विचार करण्यास भाग पाडतील. 'अजिंक्य भारत' या दैनिक वृत्तपत्र परिवाराने या विचारांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे, त्याबद्दल त्यांचे आभार. या विचारांना समजून घेणे आणि ते अमलात आणणे, ही जबाबदारी आता संपूर्ण समाजाची आणि विशेषतः राजकीय नेतृत्वाची आहे. कारण, शेतकऱ्याची हरवलेली निष्ठा परत मिळवल्याशिवाय, 'कृषिप्रधान' या शब्दाला खरा अर्थ प्राप्त होणार नाही. (क्रमशः)



# आदिवासी मुलींशी भावनिक संवाद

## उपक्रम



मुकेश चौधरी
पुणे

मेळघाटातील आदिवासी मुलींना शिक्षित करण्यासाठी पद्मश्री डॉ.सौ. सिंधुताई सपकाळ यांनी १९८० च्या काळात पुढाकार घेतला. आज एवढ्या वर्षात हजारो मुली शिक्षण घेऊन बाहेर पडल्या आहेत. आज तुम्ही मुलींनी खूप खूप शिक्षण घेऊन सिंधुताईंचे स्वप्न पुर्ण केले पाहिजे, असे आवाहन भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या मातोश्री तथा माजी लेडी गव्हर्नर आचार्य डॉ. कमलताई गवई यांनी केले.

वनवासी गोपालकृष्ण बहुउद्देशीय मंडळ शहापूर (चिखलदरा) द्वारा संचलित सावित्रीबाई फुले मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह चिखलदरा येथे मुलींना मार्गदर्शन करतांना मुख्य अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. आदिवासी मुलींशी संवाद साधताना त्यांनी शिक्षण, आत्मविश्वास आणि चिकाटीचे महत्त्व अधोरेखित केले. आत्मविश्वास, शिक्षण आणि जिद्दीचे महत्व त्यांच्या अनुभवातून सांगितले.''परिस्थिती कितीही कठीण असली तरी स्वप्नांच्या दिशेने वाटचाल केली पाहिजे,'' ''स्वप्ने लहान नसतात, ती पूर्ण करण्याची ताकद आपल्यातच असते. परिस्थिती कठीण असली तरी प्रयत्न कधीच थांबवू नका,'' असा प्रेरणादायी, आश्वासक व मायेचा संदेश त्यांनी दिला. ''मुलींनो तुम्ही शिकलात तर आपल्या मेळघाटला लागलेला कुपोषणाचा कलंक दूर होण्यासाठी तुमचे शिक्षण उपयोगी पडेल, तसेच आदिवासिंचा स्तर उंचावण्यास मैलाचा दगड ठरेल'', असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माईंच्या अथक परिश्रमातून स्थापन झालेल्या सावित्रीबाई फुले मागासवर्गीय मुलींच्या वस्तीगृहात आचार्य डॉ. कमलताई गवई यांच्या रूपाने एक हृदयस्पर्शी क्षण अवतरला, अशी भावना संस्थेचे अध्यक्ष दिपक गायकवाड यांनी व्यक्त केली. संस्थेचे सचिव अरूणभाऊ सपकाळ यांनी माजी राज्यपाल स्व. दादासाहेब गवई यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत कमलताई यांनी संस्थेला भेट दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

संस्थेत कमलताईंचे आगमन होताच निरागस चेहऱ्यांवर आनंद ओसंडून वाहू लागला. लहान मुलींनी फुलांच्या गंधासह आपली निरागसता अर्पण करत पुष्पगुच्छ देऊन मातेसमान स्वागत केले. कमलताईंनीही त्यांना प्रेमळ स्पर्श देत आईची ऊब अनुभवायला लावली. त्यानंतर त्यांनी समाजमाता पद्मश्री सिंधुताई सपकाळ यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या कार्याला नम्र अभिवादन केले. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष दिपक गायकवाड, सचिव अरूणभाऊ सपकाळ, अधिक्षिका सरीता सपकाळ, प्रसाद सपकाळ, जान्हवी सपकाळ, गोपाल गायकवाड, प्रसन्न गायकवाड, जनसंपर्क अधिकारी मुकेश चौधरी यांच्यासह संस्थेतील मुली, कर्मचारी वृंद यांनी यशस्वी केले.



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### मराठा आंदोलन




राजधानीत सुरू झाले
ह्या पाटलांचे उपोषण
रस्ते सर्व जाम झाले
असे मराठा आंदोलन

जातीसाठी आरक्षण
मिळण्यासाठी जमले
खरोखरच ते रणांगण
त्या मराठ्यांनी जिंकले

लाखोंच्या त्या संख्येतही
दिसतेच मराठा शिस्त
ह्या राज्य सरकारनेही
ठेवावी त्यांची बडदास्त

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

अहं नष्ट होण्या
सहवास हवा ।
सोबतीला हवा
गुरू मित्रा।।

पुरासम आहे
अहंकार मित्रा ।
क्षणातच मित्रा
नष्ट करी ।।

अहांकार मिटे
नम्रतेने मित्रा ।
चल आणू मित्रा
आचरण।।

अमीर फकीर
स्मशानात जाती ।
शेवटाला होती
अहं शुन्य ।।

## मागोवा



विजय लिमये
9326040204




जगात कॅरेट या शब्दाला अनन्य साधारण महत्व आहे कारण, मौल्यवान धातू आणि वस्तूंचे वस्तुमान (Density) मोजण्यासाठी एकक (unit) म्हणून याचा वापर केला जातो. खरंतर हा मूळ शब्दाचा अपभ्रंश आहे. खरा शब्द कॅरोब असा आहे, जे एक झाडाचे नाव आहे, ज्याच्या बिया एक समान वस्तुमानाच्या असतात असा समज असल्याने, शेकडो वर्षापासून लोक सोने आणि हिरे यांचे वजन करण्यासाठी या बिया वापरत होते.

कॅरोब्स, वाटाणा कुटुंबातील, भूमध्यसागरीय प्रदेश आणि मध्य पूर्वेमध्ये आढळणारे स्थानिक झाड आहे. या झाडांच्या बियांचे ''कॅरोब'' नाव आहे. २४ कॅरट, मधील २४ या अंकाला तिसऱ्या शतकातील रोमन सम्राट कॉन्स्टंटिन याने पहिल्यांदा शुद्धता ठराविण्यासाठी वापरात आणले. २४ हा अंक सहज विभागला जातो जसे १, २, ३, ४, ६, ८ व १२ या अंकांनी २४ ला पूर्ण भाग जातो. याच कारणास्तव घडाळ्यात सुद्धा २४ अंकाचा वापर तास मोजण्यासाठी करण्यात आलेला आहे. आजच्या काळात विज्ञानाच्या प्रगतीमुळे, बिया वापरल्या जात नाहीत परंतु ''कॅरेट'' या शब्दाने मात्र आपले स्थान ''अढळ'' केले आहे.

एक कॅरेट म्हणजे २०० मिलिग्रॅम वस्तुमान आहे. बाजारात २४ कॅरेट सोने हे ९९.९९% पर्यंत शुद्ध मिळते, परंतु त्याच्यापासून दागिने बनत नाहीत कारण २४ कॅरेट अर्थात अति शुद्ध सोनं, मऊ असल्याने त्याचे दागिने बनविल्यास ते मोडतात अथवा त्यांचा आकार बदलतो. सोन्याचे दागिने बनवण्यासाठी सोन्यात इतर धातूंची भेसळ केली जाते त्यात प्रामुख्याने चांदी आणि तांबे यांचा वापर करून मगच त्यापासून दागिने बनवले जातात. १८ कॅरेट सोने, म्हणजे बनवलेल्या दागिन्यात ७५ टक्के शुद्ध सोने आहे असा अर्थ होतो, त्याचबरोबर २२ कॅरेट च्या बनवलेल्या दागिन्यात ९१.६% शुद्ध सोने असते. भारतात मात्र पूर्वी गुंजाच्या बिया मौल्यवान वस्तूंचे वजन मोजण्यासाठी वापरण्यात येत असत, म्हणून जुन्या जमान्यातील लोक आम्ही गुंज-गुंज सोनं साठवले, विकत घेतले असा शब्दप्रयोग करताना मी ऐकले आहे. गुंज, मासा आणि तोळा सोने, हिरे मोजण्यासाठी माप होते. (एक गुंज=तोळ्याचा ९६वा भाग). या शिवाय एक मासा म्हणजे ८ गुंज, आणि ९६ गुंज म्हणजे एक तोळा, मानले जात होते, अर्थात १२ मासे म्हणजे एक तोळा.

गुंज बी वापर करण्याचा उद्देश असा होता की, गुंज वनस्पतीचे प्रत्येक बीज एकसामान असते. तसेच या बियाणंला किड लागत नाही, आतून पोखरले जात नाही. थोडक्यात फसवणूक होतं नाही.

इथे मासा, म्हणजे पाण्यातील मासा नाही, तर उडदाच्या बियांना मासा म्हणून संबोधले आहे. याच शब्दांवरून एखाद्याची प्रकृती तोळा मासा झाली आहे असा वाक्यप्रचार प्रचलित झाला याचा अर्थ प्रकृती इतकी खालावली आहे की तोळ्याच रूपांतर माशात झाले आहे अशा अर्थाने घेतला जातो. तोळा शब्दाचा उगम तुळा आणि तोलणे यातून झालेला आहे. हे दोन्ही शब्द मोजण्यासाठी वापरण्यात येतात, म्हणून ज्या वजनाचा मोजण्यासाठी वापर होतो ते तोळा. खरं तर एक तोळा म्हणजे ११.६६३८ ग्रॅम असते, परंतू सामान्य लोकांशी व्यवहार करताना, हिशोब सोपा व्हावा या करिता भारतीय सोनारांनी दशमान पद्धतीचा अवलंब करून व्यवहारात १ तोळा = १० ग्रॅम प्रचलित केले आहे. एक तोळा सोने मिळवण्यासाठी जवळपास ८० हजार किलो खनिज साफ करावे लागते.

# 'परम- सुंदरी'ने घेतले लालबागच्या राजाचे दर्शन



सध्या बॉलीवूडमध्ये गणपती बाप्पाच्या आगमनाचा आनंद साजरा केला जात आहे. गुरुवारी जान्हवी कपूर आणि सिद्धार्थ मल्होत्राने त्यांच्या आगामी 'परम सुंदरी' चित्रपटाच्या यशासाठी बाप्पांचे आशीर्वाद घेतले. दोघेही लालबागच्या राजाला भेट देण्यासाठी गेले होते, तर अभिनेत्री नुश्रत भरुच्चा यांनीही लालबागच्या राजाला भेट देऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. तसेच या सगळ्यांचे फोटो आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. सिद्धार्थ आणि जान्हवीचे अनेक व्हिडिओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत ज्यामध्ये ते बाप्पाचे आशीर्वाद घेताना दिसत आहेत. यादरम्यान जान्हवीने लाल रंगाची साडी नेसली होती, ज्यामध्ये ती खूप सुंदर दिसत होती. दुसरीकडे, सिद्धार्थ गुलाबी रंगाच्या कुर्त्यात खूप छान दिसत आहे. यादरम्यान जान्हवी आणि सिद्धार्थ देखील गर्दीत खूपच नाराज दिसत होते. त्यांना पाहताच मोठी गर्दी जमली. कसे तरी दोघेही बाप्पाचे आशीर्वाद घेऊन बाहेर पडले.

याशिवाय, बॉलीवूड अभिनेत्री नुसरत भरूचानेही बाप्पाचे दर्शन घेतले. लालबागच्या राजाच्या दरबारात अभिनेत्रीला पाहून अनेकांना आश्चर्य वाटले. खरं तर, नुश्रत मुस्लिम असूनही हिंदू धर्माला तितकेच महत्त्व देते. यामुळे तिचे फोटो आणि व्हिडिओ पाहून अनेकांनी तिला ट्रोल करण्यास सुरुवात केली. नुश्रतने गुलाबी रंगाचा ड्रेस घेतला होता, तसेच ती देखील या ड्रेसमध्ये सुंदर दिसली.

# सकाळी नाश्ता टाळणे म्हणजे स्नायूंचे मोठे नुकसान!



सकाळचा नाश्ता म्हणजे केवळ पोट भरणं नाही, तर तो आपल्या शरीराला दिवसभर काम करण्यासाठी लागणारी ऊर्जा आणि संरक्षण देणारा पहिला आणि महत्त्वाचा आहार आहे. जर तुम्ही सकाळी चांगला नाश्ता केला नाही, तर शरीराला दिवसभर काम करण्यासाठी पुरेशी ऊर्जा मिळत नाही, ज्यामुळे अनेक समस्या उद्भवू शकतात.अनेकदा आपण सकाळी घाईघाईत फक्त चहा, ब्रेड, पोहे किंवा शिरा खातो. यामुळे सुरुवातीला थोडी ऊर्जा मिळते, पण ती फार काळ टिकत नाही. १-२ तासांत पुन्हा भूक लागते. या पदार्थांमध्ये कार्बोहायड्रेट्स जास्त असल्याने लगेचच भूक लागते आणि तुम्ही पुन्हा काहीतरी खाऊ लागता. यामुळे रक्तातील साखर वेगाने वाढते, आणि नंतर तितक्याच वेगाने खाली येते. यामुळे दिवसभर थकवा जाणवतो. रक्तातील साखरेच्या पातळीतील चढ-उतारामुळे दिवसभर चिडचिड आणि थकवा जाणवू शकतो. याउलट, जर तुम्ही नाश्त्यात प्रोटीनयुक्त पदार्थ घेतले, तर शरीर दिवसभर स्थिर आणि उत्साही राहतं.

१. स्नायूंचे संरक्षण: रात्रभर झोपेत असताना शरीर एक प्रकारे उपवासाच्या स्थितीत असतं. सकाळी उठल्यावर जर शरीराला प्रोटीन मिळालं नाही, तर ते स्नायूंमधील प्रोटीन तोडून ऊर्जा निर्माण करतं. या प्रक्रियेला म्हणतात. याचा परिणाम असा होतो की, तुमची चरबी कमी होण्याऐवजी स्नायू कमकुवत होतात.

२. भूक कमी होते: प्रोटीनमुळे पोट भरल्याची भावना लवकर येते. -१ आणि सारखे हार्मोन्स वाढतात, ज्यामुळे तुम्हाला दिवसभर कमी भूक लागते आणि तुम्ही अनावश्यक खाणं टाळू शकता.

## 'जटाधरा' चित्रपटातून शिल्पा शिरोडकरचे कमबॅक




सोनाक्षी सिन्हा सुधीर बाबू यांच्या प्रमुख भूमिका असलेला जटाधरा हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला लवकरच येतो आहे. चित्रपटाचा टिझर आल्यापासून चित्रपटाबाबत उत्सुकता ताणली गेली आहे. दरम्यान या चित्रपटाचं एक पोस्टर समोर आलं आहे ज्यातून एका अभिनेत्रीने कमबॅक केल्याचं दिसून येतं आहे. त्या अभिनेत्रीचा खतरनाक लूक या पोस्टरद्वारे समोर आला आहे.जटाधरा चित्रपटाच्या पोस्टरवर झळकलेली ही अभिनेत्री दुसरी तिसरी कुणीही नसून शिल्पा शिरोडकर आहे. शिल्पा शिरोडकरची भीती वाटेल असा तिचा हा लूक या पोस्टरवर दिसतो आहे. चित्रपटाच्या निर्मात्यांनी दिलेल्या माहितीनुसार जटाधरा सिनेमात शिल्पा शिरोडकर शोभा नावाच्या महिलेची भूमिका साकारते आहे. मोह आणि स्वार्थ काय असतो? त्यासाठी एखादी महिला कुठल्या थराला जाऊ शकते? असं या शोभाचं म्हणजेच शिल्पा शिरोडकरचं पात्र या सिनेमात आहे. शिल्पाने स्वतः हे पोस्टर पोस्ट करत चित्रपटात तिची भूमिका असल्याचं सांगितलं आहे. नव्या पोस्टरवर शिल्पा शिरोडकर काळ्या रंगाची साडी नेसली आहे. तिच्या बाजूला एक हवनकुंड आहे. हवनकुंड पेटलेलं असताना शिल्पा शिरोडकर जीभ बाहेर काढते आहे असं हे पोस्टर आहे. तिच्या आजबाजूला मानवी हाडं, सापळा, कवट हेदेखील दिसतं आहे आणि दिवेही लागलेले आहेत. कदाचित शिल्पा शिरोडकर यात मांत्रिकाच्या भूमिकेत आहे. तिच्या पात्राचं नाव शोभा असलं तरीही ती भूमिका नेमकी काय हे स्पष्ट नाही ते चित्रपट प्रदर्शित झाल्यावरच समजणार आहे. शिल्पा शिरोडकर ही नव्वदच्या दशकात गाजलेली अभिनेत्री आहे. त्यावेळी तिने गोविंदा, चंकी पांडे यांच्यास अनेक नायकांबरोबर काम केलं आहे. शिल्पा आता चित्रपटातून कमबॅक करते आहे. तिच्या या नव्या लूकची सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे.

## राशी-भविष्य

**मेष :** आज तुमच्यासाठी अनुकूल दिवस आहे. तुम्ही स्वतःला आनंदी ठेवण्याचा प्रयत्न कराल. तुम्हाला लग्नाचा प्रस्ताव मिळू शकतो.

**वृषभः** आज तुम्हाला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अस्वस्थ वाटेल. दिवस काळजीपूर्वक घालवा. नातेवाईक आणि कुटुंबातील सदस्यांशी वाद होऊ शकतो.

**मिथून :** आज तुम्ही मनोरंजन आणि मौजमजेत व्यस्त असाल. अविवाहित लोकांना योग्य जीवनसाथी मिळण्याची शक्यता आहे.

**कर्क :** आज तुमचे मन दुःख आणि चिंतेने वेढलेले असेल. कामाच्या ओझ्यामुळे तुम्ही हंगामी आजारांना बळी पडू शकता. कमी वेळेत तुम्हाला जास्त काम पूर्ण करावे लागू शकते.

**सिंह :** आज सावधगिरी बाळगा. तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा आणि वादविवादांपासून दूर रहा. तुमच्या आ-ईशी वाद होऊ शकतो.

**कन्या :** आज तुम्ही मानसिकदृष्ट्या आनंदी असाल आणि तुमचे मन शांत असेल. आध्यात्मिक विषयांशी संबंधित बाबींमध्ये तुम्हाला यश मिळू शकते.

**तुळ :** आज कोणतेही काम काळजीपूर्वक करा, अन्यथा नुकसान होऊ शकते. आज तुमच्या कामात अडथळे येऊ शकतात.

**वृश्चिक :** वैयक्तिक संबंध सुधारू शकतात. तुम्ही प्रवास देखील करू शकता. आज, गोड बोलून तुम्ही तुमचे काम पूर्ण करू शकता.

**धनु :** नोकरी मिळण्याची शक्यता आहे. बौद्धिक काम यशस्वी होईल. व्यवसाय फायदेशीर होईल. प्रवास आनंददायी होईल.

**मकर :** गुंतवणूक इत्यादींमुळे फायदा होईल. तुम्हाला रोजगार मिळेल. बौद्धिक काम यशस्वी होईल. तुमच्या जोडीदाराच्या वागण्यात सुसंगतता असेल.

**कुंभ :** जबाबदारी आणि स्पर्धेत घाईघाईमुळे नुकसान होऊ शकते. तुम्हाला मित्र आणि भावांकडून कमी पाठिंबा मिळेल. शारीरिक आरोग्य बिघडू शकते.

**मीन :** व्यवसायात योग्य नियोजन केल्यास व्यवसाय वाढेल. जोखीम किंवा हमी देणारे काम करू नका. मौल्यवान वस्तू गमावल्या जाऊ शकतात.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 145




संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द :–** पिता, सौर, नादार, हलका

**दोन अक्षरी**
अट, उद्या, कट्टी, खाल, गय, गुंजा, गुंता, घण, टक, तड, तवा, नर, पाप, पाना, प्रभू, फण, बेट, बेल, मत, रजा, रीम, वड, वन, विष, शल्य, शाखा, शाप, शुष्क, षष्ठी

**तीन अक्षरी**
अमर, इलाज, ईशान्य, उद्यान, उधार, कजाग, कलम, कायम, कैवल्य, कोमल, जकार्ता, जाणता, तबला, नवल, परम, पुकार, प्रगट, भरत, मटका, यमन, यातना, लगट, वजन, वसंत, विरह, विषय, क्षत्रिय, सनई, सविता

**चार अक्षरी**
अचानक, आश्रयास, गर्भाशय, गोषवारा, ठाणेदार, तकलादू, नागमणी, परतावा, पुष्करणी, प्रशमन, वाटसरू, वारकरी, शाकाहार, संवत्सर

**पाच अक्षरी**
अनवधान, करपुष्कर, कलिपुरूष, कैलासवासी, तीरकमठा, रजतपट, शपथविधी, शुभचिंतक, समरांगण, हकालपट्टी

**सहा अक्षरी**
अनाथ आश्रम, कफ पित्त वात

**अन्य अक्षरी**
कनक नारायण, विषमभूज त्रिकोण

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | रा | म | | ह | व्या | स | | घ | ट | स | र्प | | सं | | घो |
| भा | ग | धा | र | क | | व | र | ण | | हा | | त | प | क्री | र |
| ळ | | ळ | | ना | रा | य | ण | | म | ण | | द् | | र्त | |
| | अ | | र | क | म | | | ता | न | | दै | नं | दि | न | |
| अ | नु | र | क्त | | रा | | शा | बा | स | की | | त | वा | | प्र |
| | रू | | रं | ग | म | हा | ल | | ब | ट | ल | र | | ब | ल |
| | प | र | जी | व | | | क | म | | क | व | | उ | द | य |
| दा | ता | | त | ळ | हा | त | | धु | नी | | | खं | द | क | |
| ख | | तू | | ण | | था | | म | त | म | तां | त | र | | भा |
| ला | | र | वि | | व | स्तू | स्थि | ती | | ध | ड | | भ | वि | ष्य |
| | रा | | लो | हा | र | | र | | भ | | व | जी | र | | |
| ल | ख | ला | भ | | च | ल | | सु | रा | | नृ | | ण | | स |
| व | ड | | नी | | ढ | क | ल | गा | डी | | त्य | | | सु | र |
| ची | | नि | य | म | | झ | | वा | | पा | | उ | भा | | ब |
| क | ड | वा | | ना | ग | पू | र | | के | न | मा | प | क | | रा |
| | | स | न | ई | | ल | त | के | ड | गा | | रा | | शा | ई |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 526




**आडवे संकेत :–** 1) विवाहसंबंधापासून न झालेले
5) मुख्य नायक, नेता
8) रसिक, रस घेणारा, आस्वाद घेणारा
9) चुलता, वडिलांचा भाऊ
10) नवऱ्याचा वडील बंधू
12) एक विदेशी मद्य प्रकार
13) काम, धंदा, कृत्य
14) एकरुप झालेला, मिसळून गेलेले
15) जाळणे, अग्निसंस्कार
17) विविध माध्यमांद्वारे करण्यात येणारी उत्पादनाची प्रसिद्धी
19) चक्षु, नेत्र
21) सद्वर्तनी, चारित्र्यवान
23) मंडलाकार भ्रमण पावणारा मोठा वारा, झंझावात
24) अंगठीत बसविलेला हिरा किंवा खडा
26) सेवक, चाकर
27) लाकूड तासण्याचे हत्यार, वाकस
29) धूळ, कण
31) विस्तार, फैलावणे
33) चैतन्य, अंतःकरणाची शुद्धी
35) जखमेतून निघणारा घाणेरडा द्रवांश
37) दुसऱ्यांवर अवलंबून राहणारा
40) घाण, विष्ठा
41) रुंद तोंडाची आखूड बंदूक, कडाबीन
43) पूर्वजांचा गद्यभाषेतील इतिहास
44) लिंबू, साखर व सुगंधी द्रव्यात पाण्यात घालून तयार केलेले पेय
45) उणीव, तोटा
47) रान, जंगल
48) दुर्दशा, अवस्था
49) फलाट किंवा बसस्थानकावर ओझी उचलणारा
51) महारोग, महाव्याधि
55) निर्भत्सना, धिक्कार (हिं)
57) ताक घुसळण्याचे काष्ठयंत्र
58) कलमांमधील गौण कलम
60) आनंदाचा विरस होणे, हिरमोड
62) कुळपरंपरा, पाया
64) तासून काढणे, छिलणे
65) कापड मोजण्याचे एक परिमाण
67) सगेसोयरे
69) तबल्याचा सोबती
70) चलाख, तरतरीत
72) भीतीने घाबरणे
75) व्याजाच्या हिशेबाचा एक प्रकार
77) अंदाधुंदीने चालविलेले राज्य, अराजकता
79) एक प्रकारचा पायघोळ अंगरखा
80) जिम्मा, जोखीम
82) वायू, हवा, वारा
84) संबंध जोडणे, विवाह जुळल्यावर होणारे नातेसंबंध
85) जमलेले लोक, समूह, समुदाय
86) नुकत्याच व्यालेल्या गाय, म्हैस इ. पशुंच्या स्तनांतील चिकट दूध

**उभे संकेत : –** 1) अयोग्य वेळी झालेले, अप्रासंगिक
2) नावेत बसून जलविहार करणे
3) विचारविनिमयासाठी सदस्यांनी एकत्र जमणे
4) डुक्कर
5) नेहमी, निरंतर
6) दरवाजाची फळी
7) मुसलमानी वर्षाचा नववा महिना
8) चंदेरी मुलामा
11) अनेक मजली इमारतीत असलेला फ्लॅट, अपार्टमेन्ट
13) तुरुंगवास
16) धातूचे चलनी नाणे
18) कितीही उगाळला तरी हा काळाच राहतो
20) लहान शहर
22) गंध, राहणे
25) अलंकारशास्त्रात शृंगाराचा एक प्रकार, नायक नायिकेचा विरह
27) गायनात निरनिराळ्या सुरांनी केलेला रागाचा विस्तार
28) स्वतंत्र भारताचे एक भूतपूर्व पंतप्रधान
30) देवाचे एकसारखे केलेले नामस्मरण
32) शाबूत, मजबूत, सिद्ध झालेले (हिं)
33) राजाजवळ उभा असलेला छडीदार सेवक
34) सारखे
36) खोल, खोलगट
38) रासक्रीडा
39) देवाने प्रसन्न होऊन दिलेली देणगी
40) माजलेल्या हत्तीच्या गंडस्थळातून स्त्रवणारा द्रव
42) कौतुक, प्रशंसा
46) पलंगासारखी मोठी लाकडी बैठक
50) युद्धात शत्रुपक्षाचे सैनिक कापून काढणे
52) मारणे, झोडपणे
53) असंख्य पायांचा एक जीवाणू
54) भंग न पावलेले
56) तपस्वी, ऋषी, सूर्य
59) एका बाजूस पडणे, आडवे होणे
61) हत्तीच्या चालीसारख्या संथ गतीने चालणारी स्त्री
63) जुन्या फाटक्या वस्त्राला लावलेला जोड
64) पिता, वडील
66) तळपायाचा फुगीर भाग
68) एकंदर बेरीज
71) गांव कुळकर्णी, तलाठी
72) दुजाभाव, भिन्नत्वाची भावना
73) हाल, दुर्दशा
74) इस्लाममध्ये अल्लाच्या नावांपैकी एक, दयाळू
75) हस्त, हात
76) टिंगल, थट्टा
78) पाप, अपराध
79) अंगावर पांघरण्याचे एक उंची वस्त्र
80) यश, विजय
81) बगळा
83) गोडी, पदार्थात असणारी चव, स्वाद

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हा | त | चा | म | ळ | | सा | र्व | ज | नि | क | | बा | य | ब | ल |
| त | | क | द | | दा | ब | | ल | त | | का | जू | | ट | |
| भा | ग | व | त | | स | र | ग | म | | गौ | ड | बं | गा | ल | |
| र | | त | | का | | म | | य | | री | | द | | र | ग |
| | वा | | अ | व | न | ती | | | स | ह | ल | | मो | | रा |
| अ | का | ल | | रा | ग | | उ | प | हा | र | | हं | ब | र | डा |
| ला | ट | | ता | बा | | | प | हा | रा | | आ | | द | वा | |
| हा | क | | र | व | | क | स | र | | मु | का | ब | ला | | ओ |
| बा | | रा | त | रा | नी | | भा | | गो | | श | र | | आ | स |
| द | र्प | | म्य | | | अ | प | शु | कु | न | | क | डो | स | री |
| | | को | | भा | ना | म | ती | | ळ | | ना | त | | न्न | |
| भू | पा | ळी | | ग | द | र | | म | | च | व | | ध | म | नी |
| ता | न | | रा | धा | | प | व | न | च | क्की | | चा | म | र | |
| न | गा | रा | | र | | ट्टा | | ध | र | | शि | र | का | ण | |
| | | ब | ळ | क | ट | | पा | र | खा | | स्त | | व | | सू |
| क | वि | ता | | | प | ट | रा | णी | | ड | | बा | णे | दा | र |

Uday Munde - 8446302691

# यापेक्षा वाईट काय अनुभवणार ? -चंद्रशेखर बावनकुळे

## 'धाडी'त अनागोंदी कारभार चव्हाट्यावर, पोलीस चौकशी सुरू

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. २९ :** 'यापेक्षा आणखी कोणता वाईट अनुभव लोकांनी दुय्यम निबंधक कार्यालयाकडून घ्यावा?' असा उद्विग्न सवाल राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. सावनेर येथील दुय्यम निबंधक कार्यालयाला अचानक भेट दिली असता, तेथील अनागोंदी कारभार पाहून ते प्रचंड संतापले. याप्रकरणी त्यांनी दोषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाईचे आदेश दिले आहेत.

महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी (दि. २८) धापेवाडा आणि कळमेश्वर दौऱ्यावर असताना, सकाळी १० वाजता सावनेर येथील दुय्यम निबंधक श्रेणी-१ कार्यालयाला अचानक भेट दिली. यावेळी, कार्यालयात केवळ एक कंत्राटी कर्मचारी हजर होता, तर काही अनधिकृत व्यक्ती कामकाज करत असल्याचे आढळून आले. हजेरीपटावर ऑगस्ट महिन्यातील कर्मचाऱ्यांची स्वाक्षरीच नसल्याचे पाहून, मंत्री अधिकच संतापले. त्यांनी तात्काळ राज्याचे नोंदणी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे यांना दूरध्वनी करून, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईचे निर्देश दिले. यावेळी उपस्थित असलेल्या उपविभागीय पोलिस अधिकारी सागर खर्डे यांना, अनधिकृत व्यक्तींचे जबाब घेऊन नियमानुसार कारवाई करण्याचे आदेशही त्यांनी दिले. या धाडसत्रामुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.



### नागरिकांच्या तक्रारींचा पाढाच

'पालकमंत्र्यांनी कार्यालयात उपस्थित असलेल्या नागरिकांशी संवाद साधला असता, त्यांनी तक्रारींचा पाढाच वाचला.' दुय्यम निबंधकांच्या कामकाजातील मनमानी, सेवांच्या गुणवत्तेचा अभाव आणि कर्मचाऱ्यांच्या वागणुकीबाबत नागरिकांनी गंभीर स्वरूपाच्या तक्रारी केल्या. त्यांची कैफियत ऐकून, पालकमंत्री बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सागर खर्डे यांना या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन, दोषींवर कारवाई करण्याचे आदेश दिले.

### सरकारचा पारदर्शकतेचा प्रयत्न, पण अधिकारी ऐकेनात

'जमिनीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार सुलभ व्हावेत, यासाठी महसूल विभाग अधिक पारदर्शी करण्याचे निर्देश वेळोवेळी दिले आहेत,' असे महसूल मंत्री म्हणाले. मात्र, सावनेरमधील प्रकार पाहता, अधिकारी सुधारणा करण्यास तयार नसल्याचे दिसून येते. 'ज्या व्यक्तींचा कार्यालयाशी कोणताही अधिकृत संबंध नाही, असे लोक येथे कामकाज करत आहेत, हे धक्कादायक आहे,' अशी संतप्त प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

## महत्त्वाचे

### दिग्रसच्या ज्युडोपटूंची राज्यस्तरीय स्पर्धेत सात पदके पटकाविली

**दिग्रस:** राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून, दिग्रसच्या ज्युडोपटूंनी लातूर येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत सात पदकांची कमाई करत, यवतमाळ जिल्ह्याला इतिहासात प्रथमच सर्वसाधारण विजेतेपद मिळवून दिले आहे. डॉ. कानो ज्युडो क्लबच्या या खेळाडूंनी मोठ्या शहरांतील आणि क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूंना मात देत मिळवलेले हे यश जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरले आहे.

लातूर येथे नुकत्याच पार पडलेल्या ५२ व्या राज्यस्तरीय सब-ज्युनिअर खुल्या ज्युडो स्पर्धेत, दिग्रसमधील दहा खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यात, वेदांत पारधी (३५ किलो गट) आणि पौर्णिमा सातपुते (२८ किलो गट) यांनी सुवर्णपदक पटकावून, पाटणा (बिहार) येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. तसेच, भाग्यश्री राठोड (४० किलो), अंजली चव्हाण (४४ किलो) आणि विशाखा खंडारे (५२ किलो) यांनी रौप्यपदक, तर अफ्फान वर्शानी (३९ किलो) आणि अर्श बाळापुरे (५० किलो) यांनी कांस्यपदक जिंकून इतिहास रचला. कोणत्याही अत्याधुनिक सोयी-सुविधा नसताना, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक आणि शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रा. डॉ. रविभूषण कदम यांच्या मार्गदर्शनाखाली या खेळाडूंनी मिळवलेले यश कौतुकास्पद आहे. या विजयामुळे पुणे आणि इतर मोठ्या शहरांची मक्तेदारी मोडून, यवतमाळ जिल्ह्याने प्रथमच विजेतेपदावर आपले नाव कोरले आहे. सर्व विजयी खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांनी आपल्या यशाचे श्रेय प्रशिक्षक डॉ. कदम आणि आई-वडिलांना दिले आहे.

# संग्रामपूर तालुक्यात भीषण अपघात, दोन दुचाकी धडकल्या, ३ ठार, ३ जखमी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बुलडाणा, दि. २९ :** जिल्ह्यातील सीमावर्ती भागातील आदिवासी बहुल संग्रामपूर तालुक्यात झालेल्या भीषण अपघातात तिघांचा मृत्यू झाला तर तिघेजण गंभीर जखमी झाले आहे. यापैकी दोघांचा घटनास्थळीच तर एका व्यक्तीचा उपचारासाठी नेत असताना वाटेतच मृत्यू झाला.मृतका मध्ये २ पुरुष व १ महिलेचा समावेश आहे तर तिघे जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहे.




संग्रामपूर तालुक्यातील एकलारा वरवट मार्गावर दोन दुचाकीची धडक होऊन हा भीषण अपघात झाला. गुरुवारी रात्री उशिरा ही दुर्दैवी दुर्घटना घडली.वरवट बकाल येथुन दुचाकीने दोघेजण बावनबीर कडे जातं होते. पाळोदी येथील रहिवासी दुचाकीने टूनकी येथे एका नातेवाईक महिलेच्या अंत्यसंस्कार विधीला उपस्थित राहून नंतर पाळोदी ( जिल्हा अकोला ) कडे जातं होत होते. दरम्यान एकलारा वरवट रसत्यावर भरवेगात जाणाऱ्या या दोन दुचाकीची आमनेसामने धडक झाली.अजय लहासे (राहणार बावनबीर तालुका संग्रामपूर जिल्हा बुलढाणा), गणेश ढोले , रुख्माबाइ विष्णु नवले (राहणार पाळोदी जिल्हा अकोला ) अशी अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या दुर्दैवी व्यक्तींची नावे आहे. या भीषण अपघातात शिवा पुंडलीक घुले , राहुल जवंजाळ , महादेव नांदोकार, हे तिघेजण गंभीर जखमी झाले. यापैकी शिवा पुंडलीक घुले याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला उपचार साठी अकोला येथे दाखल करण्यात आल्याचे पोलीस सूत्रांनी संगितले. या प्रकरणी संग्रामपूर तालुक्यातील तामगाव पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.घटनेचा तपास तामगांव पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे. या भीषण अपघाताने संग्रामपूर तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून गणेशउत्सव काळात शोकाकुल वातावरण निर्माण झाले आहे.

# शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी 'कृषी समृद्धी योजना' जिल्ह्यात लागू

## १४५ कोटींच्या निधीची तरतूद, जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी घेतला आढावा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**चंद्रपूर, दि. २९ :** शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी, राज्य शासनाने २०२५-२६ पासून सुरू केलेल्या 'कृषी समृद्धी योजने'ची जिल्ह्यात अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यासाठी एकूण १४५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, स्थानिक गरजांनुसार तालुकानिहाय योजना तयार करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिले आहेत.



जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत या योजनेच्या अंमलबजावणीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या योजनेसाठी जिल्ह्यात उपलब्ध झालेल्या १४५ कोटींपैकी, १२९.०७ कोटी रुपये प्रचलित योजनांसाठी, तर १६.१३ कोटी रुपये स्थानिक गरजांनुसार तयार होणाऱ्या योजनांसाठी वापरले जाणार आहेत. भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा उभारणे, उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादकता वाढवणे आणि हवामान अनुकूल शेतीला प्रोत्साहन देणे, ही या योजनेची प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत. सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून होणारी खर्चाची बचत या योजनेसाठी वापरली जाणार आहे. राज्यासाठी पुढील पाच वर्षांत एकूण २५ हजार कोटींची तरतूद करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील स्थानिक गरजा, संसाधने आणि प्राधान्यक्रम लक्षात घेऊन तालुकानिहाय योजना तयार करण्याचे निर्देश दिले. या बैठकीला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश धायगुडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकरराव तोटावार, कृषी उपसंचालक चंद्रकांत ठाकरे, कृषी विकास अधिकारी विरेंद्र राजपूत, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रमोद जल्लेवार, सहायक निबंधक एल. आर. वानखेडे, तंत्र अधिकारी मेघा ताटीकुंडलवार आणि कृषिभूषण पुरस्कारप्राप्त शेतकरी सुरेश गरमडे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

# जाचक निकष लावल्यामुळे सिंदखेडराजा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या आशा मावळल्या !

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**सिंदखेड राजा, दि. २९ :** यंदा पावसाने सिंदखेड राजा तालुक्यात अक्षरश: थैमानचघातले. संततधारपावसामुळेपिके वाहून गेली. जमिनीरखडून गेल्या, तर काहीठिकाणी ढगफुटीसदृश पावसानेशेतकऱ्यांच्या डोळ्यातील आशेचे अश्रू पावसाच्या धारांबरोबरमिसळले. हाती आलेला तोंडी घासही निसर्गाने हिसकावूनघेतला. त्यामुळे तालुक्यातसरसकट ओला दुष्काळ जाहीरहोईल, अशी शेतकऱ्यांची अपेक्षाहोती. मात्र प्रशासनाच्या निकषात तालुका बसत नसल्याने अखेरया अपेक्षांना तडा गेला. यामुळे सिंदखेड राजा तालुका सरसकट दुष्काळापासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

महसूल प्रशासनाने स्पष्टच केले की, तालुक्यात सतत दहा दिवसांचा पाऊस झालेलानाही. त्यामुळे पूर्ण तालुकाओल्या दुष्काळात घेता आला.नाही. परंतु ज्या मंडळांत ६५ मिमीपेक्षा जास्त पावसाची नोंदझाली, ती गावे मात्र दुष्काळग्रस्त यादीत आली आहेत. परिणामी तालुक्यातील काही शेतकऱ्यांना मदतीचा लाभ मिळणार असला तरी अनेक शेतकरी ज्यांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले, त्यांना केवळ निकषात बसत नसल्याने ओल्या दुष्काळाच्या मदतीपासून वंचित राहावे लागणार आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांच्याअडचणी मात्र प्रचंड वाढल्या आहेत. काहींची पिके पाण्याखालीगेली, तर काहींच्या शेतातील पिके वाहून गेली. जमीनच रुतून बसल्याने शेतकरीहवालदिल झाला आहे. यातील नुकसानग्रस्तांचे वैयक्तिक पंचनामे करून शासनाकडे पाठवले असून,पात्र शेतकऱ्यांना वैयक्तिक पातळीवर मदत मिळण्याचीशक्यता आहे.वास्तविक पाहता संपूर्ण तालुकाच पावसाने उद्ध्वस्त झाला आहे. त्यामुळे अनेकनेत्यांनी नुकसानग्रस्त भागांनाभेटी देऊन पाहणी केली आणिसरसकट ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली. मात्र शासनाच्या ठरवलेल्या निकषांमध्येसिंदखेडराजा तालुका न बसल्यानेसरसकट दुष्काळ जाहीर होण्याचामार्ग बंद झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा एकदा धुळीस मिळाल्या आहेत.

# दुसरबीड चौफुलीवरील खड्ड्यांनी नागरिक त्रस्त ; अपघातांची भीती

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**शेंदुर्जन, दि. २९ :** सिंदखेड राजा तालुक्याला जोडणाऱ्या आणि समृद्धी महामार्गाजवळ असलेल्या दुसरबीड चौफुलीवर मोठे खड्डे पडल्यामुळे वाहनचालक आणि स्थानिक रहिवासी चांगलेच त्रस्त झाले आहेत. या चौफुलीवर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा असल्याने येथे नेहमीच गर्दी असते. मात्र, सध्या या रस्त्याची इतकी दुरवस्था झाली आहे की रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ते अशी स्थिती निर्माण झाली आहे. प्रशासनाच्या या दुर्लक्षाबद्दल नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.



दुसरबीड हे सिंदखेड राजा तालुक्याकडे जाण्यासाठी एक महत्त्वाचे केंद्र आहे. या मार्गावरून दररोज मोठ्या संख्येने दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनांची ये-जा सुरू असते. याशिवाय, परिसरातील अनेक गावांचे नागरिक याच चौफुलीचा वापर करतात. गेल्या काही दिवसांपासून या रस्त्यावर जागोजागी खोल खड्डे पडले आहेत. यामुळे वाहन चालवणे अत्यंत धोकादायक बनले आहे.

या खड्ड्यांमुळे विशेषतः दुचाकीस्वारांना मोठा त्रास होत आहे. खड्ड्यांमध्ये पडून अनेक छोटे-मोठे अपघात झाले आहेत. पावसाळ्यात तर या खड्ड्यांमध्ये पाणी साचल्यामुळे त्यांची खोली आणि अंदाज घेणे आणखी कठीण होते. त्यामुळे वाहनचालकांना खड्डे टाळण्यासाठी मोठी कसरत करावी लागते, ज्यामुळे अपघातांचा धोका अधिकच वाढला आहे.

### तात्काळ दुरुस्तीची मागणी

स्थानिक ग्रामस्थ आणि वाहनचालकांनी अनेकदा प्रशासनाकडे या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केली आहे. या मार्गाची दुरवस्था आणि त्यामुळे होणारे अपघात पाहता, संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने दुसरबीड चौफुलीवरील खड्डे बुजवून रस्ता दुरुस्त करावा, अशी मागणी जोर धरत आहे. जर यावर त्वरित कारवाई झाली नाही, तर गंभीर अपघात होण्याची शक्यता नागरिक व्यक्त करत आहेत.

**पायी चालणाऱ्यांचीही परवड**

केवळ वाहनचालकच नव्हे, तर पायी चालणाऱ्या नागरिकांचीही मोठी गैरसोय होत आहे. पावसाळ्यात रस्त्यावर चिखल झाल्याने आणि खड्डे पाण्याने भरल्याने चालण्यासाठी सुरक्षित जागाच उरली नाही.

# अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या परदेश शिष्यवृत्ती अर्जाला मुदतवाढ

## १ सप्टेंबरपर्यंत करता येणार अर्ज, शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाचा निर्णय

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. २९ :** महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागातर्फे, राज्यातील अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. आता विद्यार्थी १ सप्टेंबरपर्यंत आपले अर्ज सादर करू शकणार आहेत, ज्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

अल्पसंख्याक विकास विभागातर्फे, समाज कल्याण आयुक्तालयामार्फत राबवण्यात येणाऱ्या या योजनेसाठी, २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख यापूर्वी १८ ऑगस्ट होती. मात्र, अनेक विद्यार्थ्यांना अर्ज सादर करण्यास अडचणी येत असल्याने, ही मुदत आता १ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६:१५ वाजेपर्यंत वाढवण्यात आली आहे. या शिष्यवृत्तीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर विहित नमुन्यातील अर्ज ऑनलाइन सादर करावा. त्यानंतर, अर्जाची सुस्पष्ट प्रिंट काढून, आवश्यक कागदपत्रांसह तो समाज कल्याण आयुक्तालय, पुणे येथे १ सप्टेंबरपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी अर्ज केले आहेत, त्यांना पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. या योजनेच्या अधिक माहितीसाठी आणि अटी व शर्तींसाठी, विद्यार्थ्यांनी शासनाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे ओझे म्हणून न पाहता एक आव्हान म्हणून बघायला हवे -डॉ अस्मिता बढे

**अकोला:** विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे ओझे म्हणुन न पाहता एक आव्हान म्हणून बघायला हवे, म्हणून चांगला अभ्यास करा आणी यशस्वी व्हा असे प्रतिपादन अध्यक्षीय भाषणात डॉ अस्मीता बढे यांनी केले.त्या श्री शिवाजी महाविद्यालयात गेस्ट लेक्चर कार्यक्रमात बोलत होत्या.

श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातर्फे प्राचार्य डॉ रामेश्वर भिसे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख वक्ते महाविद्यालयाचे वाणिज्य विभागाचे माजी विद्यार्थी मोहम्मद उझेर खान, उप-व्यवस्थापक, व्यापार वित्त आणि परकीय चलन विभाग, एस बँक, शाखा मुंबई यांच्या गेस्ट लेक्चरचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाच्या वाणिज्य विभाग प्रमुख डॉ अस्मीता बढे होत्या. याप्रसंगी विचारपिठावर वरिष्ठ महाविद्यालय वाणिज्य विभाग प्रमुख डॉ संजय तिडके, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख प्रा एस एच मळसने, विज्ञान विभाग प्रमुख प्रा एस डी तराळे उपस्थित होते. यावेळी उपस्थिताची समायोचीत भाषणे केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तथा संचालन प्रा सुनीता खेकाळे (भिसे) यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा नितीन नायसे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी तथा विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अभिमान

## महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानाची जागतिक दखल

# इंग्लंडच्या 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' पुरस्काराने सन्मान

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बुलडाणा, दि. २९ :** विद्युत अपघात जनजागृती अभियानातील विक्रमी लोकसहभागाची जागतिकस्तरावर नोंद घेत इंग्लंडमधील 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' पुरस्काराने महावितरणचा सन्मान करण्यात आला. या अभियानाचे मार्गदर्शक आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र तसेच अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनाही आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्राने गौरविण्यात आले.



मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स'चे आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह महावितरणच्या वतीने संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार आणि विशेष कार्य अधिकारी कोहाट यांनी स्वीकारले. यावेळी प्रख्यात मानसशास्त्रज्ञ डॉ. दिवाकर सुकुल (लंडन), प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. मधू कृष्णन (अमेरिका), ज्येष्ठ संपादक व माजी मंत्री राजेंद्र दर्डा यांची प्रमुख उपस्थिती होती. पुरस्काराच्या निवड समितीकडून महावितरणच्या विद्युत सुरक्षेच्या लोकाभिमुख अभियानाचे कौतुक करण्यात आले. यामध्ये वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे अध्यक्ष श्हेनरी आर (युरोप), प्रमुख पाब्लो (इंग्लंड), उपाध्यक्ष संजय पंजवानी, परीक्षक चंद्रशेखर शिंदे यांचा समावेश आहे.

महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानातील विक्रमी लोकसहभागाची दखल जागतिकस्तरावर घेण्यात आल्याबाबत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे छोटेखानी बैठकीत कौतुक केले. शून्य विद्युत अपघाताचे उद्दिष्ट हे महावितरणच्या कामाचा दैनंदिन भाग आहे. विविध उपक्रम व कार्यक्रमांद्वारे सातत्याने लोकसंवाद साधून विद्युत सुरक्षेची माहिती देत राहावी असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी संचालक पवार, परेश भागवत, भूषण कुलकर्णी, कोहाट यांची उपस्थिती होती.

'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्स' ही इंग्लंडमधील जागतिकस्तरावर मान्यताप्राप्त संस्था आहे. या संस्थेने महावितरणच्या विद्युत सुरक्षा अभियानातील लोकसहभाग आंतरराष्ट्रीय विक्रम असल्याची घोषणा केली व मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात पुरस्कार प्रदान केला. यावेळी युनायटेड किंग्डम, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, नेपाळ आणि भारतातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

महावितरणने यंदा २० व्या वर्धापन दिनानिमित्त दि. १ ते ६ जून दरम्यान विद्युत सुरक्षेच्या जनजागृतीसाठी राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये तब्बल २ लाख ११ हजारांवर नागरिक, शालेय विद्यार्थी, अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. यासह १ कोटी ९२ लाख ७९ हजार ग्राहकांना नोंदणीकृत मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे तर ३५ लाख ७३ हजारांवर ग्राहकांना नोंदणीकृत इमेलद्वारे विद्युत सुरक्षेचा संदेश देण्यात आला.

KARKHEDA AGRI PRODUCER COMPANY
REG.NO. : U01400MH2019PTC333626
PAN : AAHCK8995Q, TAN - NGPK05202B
At Post Karkheda TQ. Manora Dist.Washim
Cell : 7721961999, Office : 9545239183, www.goatbankofkarkh
E-mail - nareshgdeshmukh@gmail.com, morecn2018@gmail.cor
GOAT BANK OF KARKHEDA

जा.क्र KAPCL4 दिनांक २९/०८/२०२५

**सहावी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (सभासदासाठी)**

कारखेडा अग्री प्रोडुसर कंपनीच्या सर्व भागधारकांना कळविण्यात येते कि कंपनीची सन २०२४/२५ या आर्थिक वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत गोट बँक ऑफ कारखेडा, सांगवी मोहाडी, ता.जी. अकोला येथे खालील विषयावर चर्चा करण्याकरिता बोलविण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.

**सभेपुढील विषय**

१) दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षातील कामकाजाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक याला मान्यता देणे
२) अध्यक्षाचे परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे

दिनांक- २९ ऑगस्ट २०२५
स्थळ - कारखेडा
संचालक

**-सभासदांना सूचना-**

१) गणपूर्ती अभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व नमूद केल्याप्रमाणे सभेचे कामकाज होईल. त्या सभेला गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२) सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये काही प्रश्न सूचना करावयाच्या असल्यास त्या सभेच्या सात दिवसापूर्वी मुख्य कार्यालयाच्या वेळेत संचालक यांचा कडे लेखी स्वरुपात पाठविण्यात याव्यात त्यानंतर आलेल्या व वेळेवर आलेल्या सूचनांचा विचार करणे बंधनकारक नाही.
३) सभासदांनी आपले निवासी पत्ते बदलले असल्यास त्वरित कळवावे.
४) सभासदांकरिता दुपारी १ ते २ या वेळेत सभास्थळी भोजन व्यवस्था करण्यात आली आहे.

मणप्पुरम मर्यादित.
मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड पूर्वी
मनप्पुरम होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड
CIN : U65923KL2010PLC039179
नोंदणीकृत कार्यालय: IV/470A (जुने) W/638A (नवीन) मणप्पुरम हाऊस वलपद त्रिशूर, केरळ 680567
कॉर्पोरेशन ऑफिस: मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड, तिसरा मजला, युनिट क्रमांक ३०१ ते ३१५, ए विंग, 'कनकिया वॉल स्ट्रीट', अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई-४०००९३, महाराष्ट्र.
फोन नंबर: ०२२-६६२११०००, वेबसाइट: www.manappuramhomefin.com

**मागणी सुचना**

मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी, ज्याचे नोंदणीकृत कार्यालय IV/470A (जुने) w/638A (नवीन), मणप्पुरम हाऊस, वलपड, त्रिशूर, केरळ-680567 येथे आहे आणि भारतातील विविध ठिकाणी शाखा आहेत (यापुढे "MAHOFIN" म्हणून संदर्भित) ही कंपनी कायदा, 1956 अंतर्गत नोंदणीकृत कंपनी आहे आणि सरकारने जारी केलेल्या 18 डिसेंबर, 2015 रोजी जारी केलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट 2002 (यापुढे कायदा म्हणून संदर्भित) च्या कलम 2 च्या उप-कलम (1) च्या खंड (m) च्या उप-कलम (iv) च्या अर्थाने एक वित्तीय संस्था आहे. भारत सरकार, वित्तीय सेवा विभाग, वित्त मंत्रालय, नवी दिल्ली, इतर गोष्टींबरोबरच, बांधकाम आणि/किंवा निवासी युनिट्स खरेदी करण्यासाठी कर्जे अग्रिम करण्याचा व्यवसाय करत आहे आणि खाली नमूद केलेल्या चार्टच्या कॉलम क्रमांक २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/सह-कर्जदारांनी MAHOFIN कडून कर्ज घेतले आहे आणि MAHOFN हा SARFAESI कायद्यांतर्गत सुरक्षित कर्जदार असल्याने आणि सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम २ सह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या कर्जदार/सह-कर्जदारांना नोटिसमध्ये नमूद केलेली रक्कम पुढील व्याजासह परत करण्याचे आवाहन करणारी मागणी नोटिस जारी केली आहे. नोटिसच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, परंतु विविध कारणांमुळे त्यापैकी काहींना नोटिस बजावता आल्या नाहीत. त्याव्यतिरिक्त, खाली सूचीबद्ध केलेल्या कर्जदारांच्या माहितीच्या उद्देशाने, सदर कर्जदारांना या सार्वजनिक सूचनेद्वारे कळविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्जदाराचे/सह-कर्जदाराचे/LAN/शाखेचे नाव | ज्या सुरक्षित मालमत्तेसाठी व्याज तयार केले गेले आहे त्याचे वर्णन | NPA तारीख | सूचना पाठविण्याची तारीख आणि थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | सईदाबी शेख अहमद, शेखहेमद शेख इद्रिस, शेख जुबैर शेख अहमद/ **MHL00500032847** /Akola | घराची मालमत्ता क्रमांक ३२६, एकूण १६६० चौरस फूट, बांधकाम असलेले, ग्रामपंचायत कवठल तहसील संग्रामपूर जिल्हा अकोला, महाराष्ट्र - ४४४२०१ च्या हद्दीत. पूर्व-मार्ग, पश्चिम-श्री. शेख मुराद शेख सलीम, दक्षिण-श्री. शेख मुसा शेख इसा, उत्तर-मार्ग | ११-०७-२०२५ | १५-०७-२०२५ आणि रु.४१३४८२/- |

म्हणून, वर नमूद केल्याप्रमाणे कर्जदारांना/सह-कर्जदारांना सूचना देण्यात येत आहे, ज्यामध्ये त्यांना या सूचना प्रकाशित झाल्यापासून 60 दिवसांच्या आत संबंधित कर्जदार/सह-कर्जदाराविरुद्ध वर दर्शविल्याप्रमाणे एकूण थकबाकीची रक्कम भरण्याचे आवाहन केले आहे. संबंधित कर्जदार/सह-कर्जदाराने एकूण थकबाकीची रक्कम पुढील व्याजासह भरण्यात अयशस्वी झाल्यास, MAHOFIN वर वर्णन केल्याप्रमाणे मालमत्तेवर सुरक्षा व्याज लागू करण्यासाठी कलम 13(4) अंतर्गत कारवाई करण्यास भाग पाडले जाईल, तसेच कायद्यानुसार आणि येथे बनवलेल्या नियमांनुसार इतर पद्धतीने सूचना बजावण्यासाठी पावले उचलली जात आहेत. तुम्हाला सूचना देण्यात येते की, SARFAESI कायद्याच्या कलम 13(8) मध्ये तपशीलवार वर्णन केल्याप्रमाणे, सार्वजनिक लिलावासाठी किंवा विक्रीद्वारे हस्तांतरणासाठी खाजगी करारासाठी सूचना प्रकाशित होण्याच्या तारखेपूर्वी कधीही MAHOFIN ने केलेल्या खर्चासह संपूर्ण देय रक्कम, शुल्क आणि खर्च भरल्यानंतर सदर गहाणखत परत मिळवता येते.
लक्षात ठेवा की SARFAESI कायद्याच्या कलम १३ (१३) नुसार, तुम्हाला सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास आणि/किंवा व्यवहार करण्यास मनाई आहे.
तारीख: ३०/०८/२०२५ | ठिकाण: महाराष्ट्र
अधिकृत अधिकारी मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड

महत्त्वाचे

## प्रश्न राशीद खानला, चेहरा पडला पाकिस्तानच्या कप्तानाचा!



**नवी दिल्ली :** पाकिस्तान क्रिकेट टीम नेहमीच काही ना काही कारणांनी चर्चेत येत असते. पाकिस्तानच्या खेळाडूंची खूप वेळा नाचक्की झालेली दिसून आली आहे. अशातच आता आशिया कप २०२५ पूर्वी पाकिस्तान टी २० तिरंगी मालिका खेळणार आहे. या मालिकेत सलमान अली आगा पाकिस्तानची धुरा सांभाळणार आहे.ही मालिका २९ ऑगस्टपासून खेळवली जाणार आहे. मात्र त्याआधीच सलमान अली आगा आणि पाकिस्तानचा भर चालू पत्रकार परिषदेत चांगलाच अपमान सहन करावा लागला आहे. नेमकं काय घडलं. हे जाणून घेऊया.अफगाणिस्तान, यजमान यूएई आणि पाकिस्तान यांच्यात टी २० तिरंगी मालिका खेळवली जाणार आहे. या मालिकेच्या पूर्वसंध्येला पत्रकार परिषदेचं आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषेदमध्ये तिन्ही संघांचे कर्णधार हजर होते.

# ज्युलियन वेबरने जिंकले विजेतेपद

## झुरिच डायमंड लीगच्या अंतिम फेरीत नीरज चोप्रा दुसऱ्या स्थानावर

नवी दिल्ली : दि.२९ प्रतिनिधी

२९ ऑगस्ट रोजी झुरिच येथे डायमंड लीग फायनल स्पर्धा पार पडली.यामध्ये नीरज चोप्रा २०२२ च्या आपल्या कामगिरीची पुनरावृत्ती करू शकला नाही. जर्मनीच्या ज्युलियन वेबरने त्याला पराभूत करून जेतेपद पटकावले. वेबरने ९१.५१ मीटर भालाफेक करून एक नवीन वैयक्तिक सर्वोत्तम आणि जागतिक आघाडी निर्माण केली. यापूर्वी, वेबरने या वर्षातील सर्वात लांब भालाफेक ९१.०६ मीटर केली होतीझुरिच डायमंड लीगमध्ये वेबरने ९१.५१ मीटर फेकून पहिले स्थान पटकावले. नीरज चोप्रा ८५.०१ मीटर फेकून दुसऱ्या स्थानावर राहिला. नीरजने सलग तीन फेकून फाऊल केले. दरम्यान, केशॉर्न वॉलकॉट ८४.९५ मीटर फेकून तिसऱ्या स्थानावर राहिला. नीरज चोप्राची ही दुसरी डायमंड लीग फायनल स्पर्धा होती. त्याने २०२२ मध्ये झुरिचमध्ये ८८.४४ मीटर फेकून विजेतेपद जिंकले होते, तर २०२३ आणि २०२४ मध्येही तो अंतिम फेरीत पोहोचला होता परंतु विजेतेपदापासून वंचित राहिला.डायमंड लीग २०२४ मध्ये तो फक्त १ सेंटीमीटरने विजेतेपद जिंकण्यात कमी पडला. त्याला ग्रेनेडाच्या अँडरसन पीटर्सने ८७.८७ मीटर फेकून पराभूत केले.





## हॉकी आशिया कपमध्ये भारताची विजयी सलामी!



नवी दिल्ली : दि.२९ प्रतिनिधी

हॉकी आशिया कप २०२५ स्पर्धेला सुरुवात झाली आहे. हॉकी आशिया कपमध्ये भारतीय संघाने विजयी सलामी दिली आहे. या स्पर्धेत भारताने चीनचा ४-३ असा पराभव केला आहे. खेळाच्या मध्यंतराला भारतीय संघाची पकड थोडी कमकुवत असल्याची दिसून आली होती.

यावेळी संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंगने जोरदार मुसंडी मारली आणि भारताला सामना जिंकून दिला.हॉकी आशिया कप स्पर्धेत भारताने सलामी सामन्यात चीनविरूद्ध दमदार कामगिरी केली. या सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंगने हॅटट्रिक लगावात भारताच्या विजयात मोठी भूमिका बजावली. त्याने सामन्याच्या २०व्या, ३३व्या आणि ४७व्या मिनिटाला गोल केले. त्याच वेळी, भारताकडून जुगराज सिंगने पेनल्टीमध्ये गोल करून भारताचा विजय निश्चित केला. चीनच्या डू शिहाओने पहिला, चेन बेनहाईने दुसरा आणि गाओ जिशेंगने तिसरा गोल केला. या सामन्यातील सर्व मिळून ७ गोल पेनल्टी कॉर्नरवर झाले आहेत.

## नोवाक जोकोविकची दमदार मुसंडी!

**नवी दिल्ली :**सध्या यूएस ओपनचा थरार बघायला मिळत आहे. या स्पर्धेत नोवाक जोकोविने आपल्या खराब फॉर्मला मागे सारत तिसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. यूएस ओपनच्या सलग दुसऱ्या सामन्यात नोवाक जोकोवि थकलेला दिसून आला, या दरम्यान त्याने एक सेट देखील गमावला होता, परंतु २४ वेळा ग्रँड स्लॅम विजेत्या जोकोविने वेळेवर मुसंडी मारत तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. येथील फ्लशिंग मीडोज येथे जोकोविचचा पहिल्या आणि दुसऱ्या फेरीत विजयाचा विक्रम ३६-० झाला. त्याने १४५ व्या क्रमांकावर असलेल्या अमेरिकेच्या झाचेरी वाज्दाचा ६-७, ६-३, ६-१ असा पराभव करून विजय नोंदवला.११ जुलै रोजी खेळवण्यात आलेल्या विम्बल्डनच्या उपांत्य फेरीत यानिक सिन्नरकडून पराभव झाल्यानंतर जोकोविच त्याची पहिली स्पर्धा खेळत आहे.

## ऑस्ट्रेलिया दौऱ्यापूर्वी रोहित शर्माची मोठी परीक्षा

नवी दिल्ली : दि.२९ प्रतिनिधी



भारतीय एकदिवसीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा सध्या चर्चेत आला आहे. रोहित शर्मा ऑस्ट्रेलिया दौऱ्यातून एकदिवसीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्याची शक्यता आहे. रोहित शर्मा गेल्या ६ महिन्यांपासून कोणताही आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळलेला नाही. भारताच्या या स्टार खेळाडुने इंग्लंड दौऱ्यापूर्वीच कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती. आयपीएल २०२५ मध्ये रोहित शर्माने मुंबई इंडियन्ससाठी शेवटचा स्पर्धात्मक सामना खेळला होता. तर त्याने मार्चमध्ये झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात त्याचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये परतण्यापूर्वी, रोहित शर्मीला बेंगळुरूमधील बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्स येथे मोठी परीक्षा द्यावी लागणारआहे. येथे त्याला फिटनेस चाचणीतून जावे लागणार आहे. रोहित दोन-तीन दिवस सेंटर ऑफ एक्सलन्स येथे असणार आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेपूर्वी रोहित शर्माला तंदुरुस्त असल्याची टेस्ट द्यावी लागणार आहे. त्यासाठी त्याला ब्रोंको चाचणीव्यतिरिक्त अनेक चाचण्या द्याव्या लागणार आहे. या काळात तो सराव सत्रांमध्ये भाग घेणार आहे. रोहित शर्मा गेल्या तीन महिन्यांपासून कोणत्याही क्रिकेटपासून दूर आहे. अशा परिस्थितीत त्याला फिटनेस टेस्टचा सामना करावा लागणार आहे.रोहित शर्मा १३ सप्टेंबरपासून बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये फिटनेस टेस्टसाठी उपस्थित असणार आहे. तो येथे दोन-तीन दिवस राहणार आहे. तसेच तो नोव्हेंबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या एकदिवसीय मालिकेच्या तयारीसाठी येथे सराव देखील करणारअ आहे. दुलीप ट्रॉफीचा अंतिम सामना ११ ते १५ सप्टेंबर दरम्यान बेंगळुरूमधील सेंटर ऑफ एक्सलन्सच्या मुख्य मैदानावर (अ) खेळवण्यात येणार आहे.

## सिंधूचे पदकाचे स्वप्न भंगले; वर्दानीकडून पराभव

पॅरिस: दि.२९ प्रतिनिधी



दोन वेळची ऑलिम्पिक पदकविजेती पी. व्ही. सिंधूचे जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सहावे पदक जिंकण्याचे स्वप्न शुक्रवारी भंगले. अत्यंत चुरशीच्या झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या तीन गेमच्या थरारक लढतीत तिला इंडोनेशियाच्या पुत्री कुसुमा वर्दानीकडून पराभव पत्करावा लागला. या पराभवासह स्पर्धेतील भारताचे आव्हान संपुष्टात आले.२०१९ सालची विश्वविजेती आणि या स्पर्धेत एकूण पाच पदके नावावर असलेल्या सिंधूचे लक्ष्य विक्रमी सहाव्या पदकावर होते. मात्र, ६४ मिनिटे चाललेल्या या अटीतटीच्या सामन्यात नवव्या मानांकित वर्दानीने सिंधूचा १४-२१, २१-१३, १६-२१ असा पराभव केला.तत्पूर्वी, भारताच्या मिश्र दुहेरीतील ध्रुव कपिला आणि तनिशा क्रास्टो या जोडीचे आव्हानही संपुष्टात आले.

त्यांना मलेशियाच्या चेन तांग जी आणि तोह ई वेई या जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानी असलेल्या जोडीकडून १५-२१, १३-२१ असा सरळ गेममध्ये पराभव पत्करावा लागला. यामुळे भारताचे या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत मिश्र दुहेरीतील पहिले पदक मिळवण्याचे स्वप्न अधुरे राहिले.हैदराबादच्या ३० वर्षीय सिंधूने २०१३ मध्ये ग्वांगझू येथे आपले पहिले जागतिक पदक जिंकले होते. त्यानंतर तिने आपल्या कामगिरीत सातत्य राखत अनेक ऐतिहासिक टप्पे गाठले. ऑलिम्पिकमध्ये सलग दोन पदके (२०१६ रिओ रौप्य, २०20 टोकियो कांस्य) जिंकणारी सिंधू एकमेव भारतीय महिला खेळाडू आहे.

## गुरप्रीतला सुवर्ण; २५ मीटर स्टँडर्ड पिस्तुल प्रकारात सुवर्णपदक

कझाकिस्तान दि.२९ प्रतिनिधी

वृत्तसंस्था : येथे सुरू असलेल्या १६ व्या आशियाई नेमबाजी स्पर्धेत गुरुवारी भारताच्या गुरप्रीत सिंगने २५ मीटर स्टँडर्ड पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक पटकावले, तर अमनप्रीत सिंगने रौप्यपदकावर नाव कोरत भारताला दुहेरी यश मिळवून दिले. गुरप्रीत आणि अमनप्रीत यांच्या या सुवर्ण-रौप्यपदकांमुळे भारताच्या एकूण पदकांची संख्या ८२ वर पोहोचली आहे. यात ४४ सुवर्ण, २० रौप्य आणि १८ कांस्य पदकांचा समावेश आहे.या दोघांनी हर्ष गुप्ताच्या साथीने १७०९ गुणांच्या एकत्रित कामगिरीसह सांघिक सुवर्णपदकही जिंकले. याशिवाय, ५० मीटर रायफल प्रोन ज्युनियर संघ आणि २५ मीटर स्टँडर्ड पिस्तूल ज्युनियर संघानेही दिवसातील अन्य सुवर्णपदके पटकावली. ३७ वर्षीय गुरप्रीतने आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील आपले पहिले सुवर्णपदक जिंकले. याच स्पर्धेत १२ वर्षांपूर्वी तेहरानमध्ये मिळवलेल्या कांस्यपदकाच्या कामगिरीत त्याने सुधारणा केली.



## भारतीय शेअर बाजारात सलग तिसऱ्या दिवशी घसरण




**नवी दिल्ली :** भारतीय शेअर बाजार आज सलग तिसऱ्या दिवशी घसरणीसह बंद झाले. सेन्सेक्स आणि निफ्टी यांनी सुरुवातीच्या घसरणीनंतर बऱ्याच काळ सकारात्मक क्षेत्रात व्यवहार केला. मात्र, शेवटच्या तासात झालेल्या जोरदार विक्रीमुळे गुंतवणूकदारांच्या आशा धुळीस मिळाल्या आणि दोन्ही प्रमुख निर्देशांक दिवसाच्या नीचांकी पातळीवर बंद झाले. कारभाराच्या समाप्तीला, बीएसई सेन्सेक्स २७०.९२ अंकांनी म्हणजेच ०.३४% घसरून ७९,८०९.६५ वर बंद झाला. तर, एनएसई निफ्टी ७४.०५ अंकांनी म्हणजेच ०.३०% खाली येऊन २४,४२६.८५ वर स्थिरावला.मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्सवरही दबाव दिसून आला. बीएसई मिडकॅप निर्देशांक ०.४% घसरला, तर स्मॉलकॅप निर्देशांक ०.३% खाली बंद झाला. क्षेत्रीय निर्देशांकांवरही दबाव स्पष्ट दिसला. मेटल, आयटी, रियल्टी आणि ऑटो निर्देशांक ०.५% ते १% पर्यंत घसरले. याउलट, कॅपिटल गुड्स, कन्झ्युमर ड्युरेबल्स, मीडिया आणि एफएमसीजी निर्देशांकांमध्ये ०.२% ते १% ची वाढ नोंदवली गेली.संपूर्ण आठवड्याचा विचार करता, सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही १.८% घसरले.

# पहिल्या तिमाहीत जीडीपीत ७.८% वाढ

## कृषी आणि सेवा क्षेत्राचा मोठा वाटा

नवी दिल्ली : दि.२९ प्रतिनिधी

भारताच्या अर्थव्यवस्थेने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत (एप्रिल-जून २०२५) जबरदस्त कामगिरी केली आहे. केंद्रीय सांख्यिकी कार्यालयाने शुक्रवारी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, स्थिर मूल्यांवर देशाचा जीडीपी ४७.८९ लाख कोटी रुपये इतका नोंदवला गेला, जो मागील आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतील ४४.४२ लाख कोटी रुपयांच्या तुलनेत ७.८ टक्क्यांनी अधिक आहे. ही वाढ गेल्या आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीपेक्षा (२०२३-२४) सर्वाधिक आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या पहिल्या तिमाहीत जीडीपी वाढीचा दर ६.५ टक्के होता.चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत कृषी, पशुपालन, वनीकरण आणि मत्स्यपालन क्षेत्राचा वाढीचा दर ३.७ टक्के नोंदवला गेला, जो मागील वर्षी याच तिमाहीत १.५ टक्के होता. वित्तीय, रिअल इस्टेट आणि व्यावसायिक सेवा क्षेत्राची वाढ ६.६ टक्क्यांवरून ९.५ टक्क्यांवर पोहोचली. व्यापार, हॉटेल, वाहतूक, दळणवळण आणि प्रसारणाशी संबंधित सेवांचा वाढीचा दर गेल्या वर्षीच्या ५.४ टक्क्यांच्या तुलनेत ८.६ टक्क्यांवर गेला. याशिवाय, उत्पादन (मॅन्युफॅक्चरिंग) क्षेत्राची वाढ ७.७ टक्के नोंदली गेली, जी मागील वर्षी ७.६ टक्के होती. लोक प्रशासन, संरक्षण आणि इतर सेवांचा वाढीचा दर ९.० टक्क्यांवरून ९.८ टक्क्यांवर पोहोचला.सरकारी आकडेवारीनुसार, वीज, गॅस, पाणीपुरवठा आणि इतर उपयुक्तता सेवांच्या वाढीच्या दरात मोठी घट दिसून आली आहे. हा दर ०.५ टक्क्यांवर घसरला, जो मागील वर्षी याच तिमाहीत १०.२ टक्के होता. खाण क्षेत्राचा वाढीचा दर शून्यापेक्षा ३.१ टक्के खाली गेला, म्हणजेच या क्षेत्रात गतिविधींमध्ये घट नोंदवली गेली. मागील वर्षी याच तिमाहीत खाण क्षेत्राची वाढ ६.६ टक्के होती.दरम्यान, कृषी आणि सेवा क्षेत्राच्या जोरावर भारताची अर्थव्यवस्था स्थिर आणि सशक्त वाटचाल करत आहे.

तथापि, खाण आणि उपयुक्तता सेवांसारख्या क्षेत्रांतील आव्हानांवर लक्ष देण्याची गरज आहे. ही कामगिरी भारताच्या आर्थिक प्रगतीचा सकारात्मक संदेश देत आहे.




## केंद्र सरकारने कापूस आयात शुल्क माफी ३१ डिसेंबरपर्यंत वाढविली

नवी दिल्ली : दि.२९ प्रतिनिधी



भारतातील वस्त्रोद्योग, जो देशात दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक रोजगार देणारा उद्योग आहे, त्याला उच्च दर्जाच्या कापसाची नियमित उपलब्धता आवश्यक आहे.

यासाठी मागणी आणि पुरवठ्यातील तफावतीमुळे केंद्र सरकारने कापसावरील आयात शुल्क माफी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवली आहे. भारताच्या वस्त्र निर्यातीत सूती वस्त्रांचा ३३% वाटा आहे, ज्यामुळे कापसाची मागणी वाढते आणि शेतकऱ्यांना लाभ होतो. वस्त्र संघटनांनी कापसावरील ११% आयात शुल्क माफीच्या निर्णयाचे स्वागत केले आहे.वस्त्रोद्योग मंत्रालयाने गुरुवारी निवेदनात सांगितले की, या निर्णयामुळे सूत, कापड, परिधान आणि मेड-अप्सच्या खर्चात स्थिरता येईल, ज्यामुळे उत्पादक आणि ग्राहकांना दिलासा मिळेल. हा निर्णय वस्त्रोद्योगाला जागतिक स्तरावर स्पर्धात्मक ठेवेल आणि शेतकऱ्यांचे हित जपेल. आयात केलेला कापूस विशिष्ट औद्योगिक गरजा पूर्ण करतो, देशांतर्गत कापसाला पर्याय ठरत नाही.

वस्त्रोद्योग ४.५ कोटी लोकांना रोजगार देतो. कापसाचा स्थिर पुरवठा उद्योगाच्या वाढीसाठी आणि 'मेक इन इंडिया'ला चालना देण्यासाठी महत्त्वाचा आहे.

विकास | देशाच्या कारखानदारीच्या तब्येतीत सुधार

## औद्योगिक उत्पादन वाढ जुलैमध्ये ३.५ टक्क्यांवर

नवी दिल्ली : दि.२९ प्रतिनिधी



देशातील निर्मिती क्षेत्राच्या चांगल्या कामगिरीमुळे, सरलेल्या जुलैमध्ये भारताचा औद्योगिक उत्पादनांतील वाढ चार महिन्यांच्या उच्चांकी ३.५ टक्क्यांच्या पातळीवर पोहोचली आहे, असे गुरुवारी जाहीर झालेल्या अधिकृत आकडेवारीने स्पष्ट केले.

देशातील कारखानदारीचे आरोग्यमान दर्शविणाऱ्या औद्योगिक उत्पादन वाढीचा वेग आधीच्या जून महिन्यांत अवघा १.५ टक्क्यांवर होता, तर गतवर्षी म्हणजेच जुलै २०२४ मध्ये ते पाच टक्क्यांनी वाढले होते. यापूर्वी मार्च २०२५ मध्ये त्यात ३.९ टक्के वाढ नोंदवण्यात आली होती. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) प्रसिद्धीस दिलेल्या ताज्या आकडेवारीनुसार, जुलै २०२५ मध्ये निर्मिती/ उत्पादन क्षेत्रात ५.४ टक्क्यांची वाढ दिसून आली, जी गेल्या वर्षीच्या याच महिन्यात ४.७ टक्क्यांपेक्षा अधिक राहिली आहे. या उलट खाण उत्पादनात ७.२ टक्क्यांनी घट झाली, जे गेल्या वर्षी जुलैमध्ये ३.८ टक्क्यांनी वाढले होते. वीज उत्पादनातही केवळ ०.६ टक्क्यांनी वाढ झाली, जी गेल्या वर्षीच्या याच कालावधीत ७.९ टक्के होती.

आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या एप्रिल ते जुलै या चार महिन्यांच्या कालावधीत, देशाचे एकूण औद्योगिक उत्पादन गेल्या वर्षीच्या ५.४ टक्क्यांच्या तुलनेत यंदा केवळ २.३ टक्क्यांनी वाढले आहे.

आकडेवारीवर भाष्य करताना पतमानांकन संस्था 'इक्रा'च्या मुख्य अर्थतज्ज्ञ आदिती नायर म्हणाल्या की, निर्मिती क्षेत्राची वाढ ५.४ टक्के अशी सहा महिन्यांच्या उच्चांकावर पोहोचली हे उत्साहदायी आहे. यापूर्वी जानेवारी २०२५ मध्ये या क्षेत्रात ५.८ टक्क्यांची वाढ दिसून आली होती. बरोबरीने बांधकाम सामग्री आणि ग्राहकोपयोगी वस्तूंच्या क्षेत्रातील वाढीनेही मदतीचा हात दिला.

सर्व क्षेत्रांमध्ये व्यापक सुधारणा दिसत असली तरी, खाणकाम आणि वीज क्षेत्रांची कामगिरी कमकुवत राहिली. या महिन्यात झालेल्या मुसळधार पावसाचा परिणाम काहीसा कमी झाला, ज्याचा एकूण आयआयपी वाढीवरही सकारात्मक परिणाम दिसून आला, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

## महत्वाचे

### घरपोच गणेशमूर्ती विसर्जनाची सोय

**नागपूर :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर महानगरपालिका नागरिकांच्या सोयीसाठी पूर्णपणे सज्ज झाली आहे. यंदा पारंपरिक कृत्रिम विसर्जन तलावांसोबतच नागरिकांना घरबसल्या गणेश मूर्ती विसर्जित करता याव्यात, याकरिता मनपाने अनोखा उपक्रम सुरू केला आहे. मनपाद्वारे शहराच्या दहाही झोनमध्ये एकूण २२ फिरत्या विसर्जन वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

फिरते विसर्जन वाहन दारी बोलाविण्यासाठी नागरिकांना एक दिवसाआधी फोन करून गणेश मूर्ती विसर्जनाची तारीख, आपला संपूर्ण पत्ता, गूगल लोकेशन, मोबाईल क्रमांक आदी माहिती देणे गरजेचे आहे.

### ट्रकचालकाचा जागीच मृत्यू

**नागपूर :** टोलनाका वाचवण्यासाठी एका वाहनचालकाने मृत्यूला कवटाळल्याची घटना घडली. राजेशकुमार रामसुदर्शन यादव असे त्याचे नाव आहे. माहितीनुसार, राजेशकुमार (वय ३१, मध्य प्रदेश) सिंगल ट्रान्सपोर्ट कंपनीच्या कंटेनर ट्रकवर कार्यरत होता. मंगळवारी दुपारी सव्वा एकच्या सुमारास चौदामैल येथे उड्डाणपुलाच्या कामाचे साहित्य खाली करून परतीसाठी निघाला असता टोलनाका वाचवण्यासाठी मंगरुळ-गोंडखैरी पांदण रस्त्याने निघाला. गोंडखैरी शिवारात एका शेताजवळ ट्रकच्या वरील भागाचा ११ हजार व्होल्टच्या विद्युत तारांना स्पर्श झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. माहिती मिळताच कळमेश्वर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी कळमेश्वर ग्रामीण रुग्णालयात पाठविला. पुढील तपास ठाणेदार मनोज काळबांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक मन्नान नौरंगाबादे, पोलिस शिपाई राणा सिंह करत आहेत.

### प्रवाशांनी सतर्क राहावे

**नागपूर :** रेल्वेस्थानकातील गर्दीमुळे परिसरात सुरक्षा वाढविण्यात आली असून, प्रवाशांनीही सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. सध्याच्या गणपती उत्सवामुळे नागपूर रेल्वेस्थानकावर गर्दी वाढली आहे. रेल्वे पोलिस (जीआरपी) आणि रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) यांनी सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे. मध्यवर्ती रेल्वेस्थानक असल्याने प्रवाशांची गर्दी लक्षात घेत जीआरपी, आरपीएफने प्लॅटफॉर्म आणि प्रवेशद्वारांवर अतिरिक्त सुरक्षा कर्मचारी तैनात केले आहे. याशिवाय सामानांचीही तपासणी करण्यात येत असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

## निधन

### श्यामराव लाघवे

**नागपूर :** शिक्षण क्षेत्रातील



राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त श्यामराव गोविंदराव लाघवे यांचे वृद्धापकाळामुळे निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते त्यांचे हनुमाननगर येथे वास्तव्य होते. ते मनपा शिक्षण विभागातून शाळा निरीक्षक पदावरून निवृत्त झाले होते. श्यामराव लाघवे मागील काही दिवसांपासून आजारी होते अशातच बुधवारी त्यांनी अंतिम श्वास घेतला सहकार नगर स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार पार पडले त्यांच्या पश्चात पत्नी सेवानिवृत्त शिक्षिका सुमन श्यामराव लाघवे आणि आप्तपरिवार आहे.

# ‘मासूम’तर्फे मानसिक आरोग्याची जपणूक

## मुख्यमंत्र्यांच्या निर्णयामुळे बालसंगोपन संस्थांतील ३,३३७ मुलांना लाभ

नागपूर, दि. २९ प्रतिनिधी

**राज्यातील बालसंगोपन संस्थांमध्ये वास्तव्यास असलेल्या समस्याग्रस्त आणि विधिसंघर्षित मुलांना मानसिक आरोग्यसेवा व समुपदेशन करण्यासाठी महिला व बालविकास विभाग ‘एमपॉवर’ संस्थेच्या माध्यमातून ‘मासूम’ प्रकल्प राबवित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील निर्णयामुळे या प्रकल्पाचा आतापर्यंत सुमारे ३,३३७ मुलांना लाभ झाला असून, एकूण ९,५९३ वैयक्तिक समुपदेशन सत्रे पार पडली आहेत.**



संग्रहित

दरम्यान, हा प्रकल्प नागपूरसह मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक विभागांमध्ये राबवण्यात येत आहे.महाराष्ट्रातील महिला व बालविकास विभाग राज्यातील बालकल्याण व मानसिक आरोग्याच्या कार्याला बळकटी देण्यासाठी आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या ‘एमपॉवर’ या उपक्रमामार्फत ‘मासूम’ प्रकल्प राबवत आहे. याअंतर्गत अडचणीत असलेल्या व विधिसंघर्षित मुलांना (जे बाल संगोपन संस्थांमध्ये राहतात) मानसिक आरोग्य सेवा व समुपदेशन पुरवविण्यात येते. हा सार्वजनिक-खासगी भागीदारीचा उपक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आला आहे. सेवेची भावना या उद्देशाने व बांधिलकीने ‘एमपॉवर’ व आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापिका व अध्यक्षा नीरजा बिर्ला यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या प्रयत्नांतून १८० दशलक्षाहून अधिक लोकांपर्यंत पोहोचून, ‘एमपॉवर’ हे दक्षिण आशियातील मानसिक आरोग्य साक्षरता, क्षमता-वृद्धी आणि सामुदायिक संपर्कावर लक्ष केंद्रित करणारे सर्वांत मोठे खासगी व्यासपीठ ठरले आहे. महिला व बालविकास विभागसोबतच्या फेब्रुवारी २०२३ मधील सामंजस्य करारानंतर हा प्रकल्प नागपूरसह मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक या विभागांमध्ये राबवण्यात येत आहे. एकूण १९ बालसंगोपन संस्थांना पाच मानसशास्त्रज्ञाच्या टीमकडून सेवा दिल्या जात आहेत. या प्रकल्पांतर्गत मानसशास्त्रज्ञ रोटेशन पद्धतीने सीसीआयला भेट देतात, स्थितीपरत्वे समुपदेशन, मुलांचे मानसिक आरोग्य स्क्रिनिंग आणि गरजेनुसार थेरपी सेवा पुरवतात. याशिवाय गंभीर प्रकरणांमध्ये बालकल्याण समिती आणि किशोर न्याय मंडळाला तज्ज्ञांचे सहकार्य दिले जाते. थेरपिस्ट काही मुलांच्या आरोग्य आणि मानसिक परिस्थितीनुसार त्यांचे तणाव मापनपट्टी,आक्रमकता मापनपट्टी, स्थिती-गुणधर्म चिंतामापन चाचणी, मानसिक आरोग्य व कल्याण मापनपट्टी यांसारख्या साधनांद्वारे सखोल परीक्षण केले जाते.

### मोकळे वातावरण

**मुलांच्या कुटुंबियांनाही समुपदेशनाची सुविधा दिली जाते. पालकांचे समुपदेशन केल्याने मुले घरी परतल्यावर त्यांना पूर्वीप्रमाणे मोकळे वातावरण मिळेल हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. ‘मासूम’ हा प्रकल्प राज्यातील बालसंगोपन संस्थांमध्ये मानसिक आरोग्य सेवांना बळकटी देणारा ठरला असून, मुलांच्या पुनर्वसन प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत आहे.**

# पीडित कुटुंबियांचे पालकमंत्री बावनकुळेंकडून सांत्वन

## मृतांच्या कुटुंबियांना मिळणार आर्थिक सहाय्य

कळमेश्वर, दि. २९ प्रतिनिधी



तालुक्यातील धापेवाडा बु. येथील शेतामध्ये वीज पडून २७ ऑगस्ट रोजी वंदना प्रकाश पाटील, त्यांचा मुलगा ओम प्रकाश पाटील तसेच शेतात काम करणाऱ्या मदतनीस निर्मला रामचंद्र पराते यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पाटील व पराते कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. या घटनेतील मृतांना त्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

मी पाटील आणि पराते कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे. घडलेली घटना दुर्दैवी असून, दु:खाचा मोठा घाला कुटुंबीयावर झाला आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने २४ तासांच्या आत कुटुंबातील व्यक्तीला मदत देण्यात आली आहे. पराते कुटुंबीयांच्या खात्यावर तत्काळ निधी जमा करण्यात आला असून, पाटील कुटुंबीयांना मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला आहेत. मृत पावलेल्या कुटुंबीयांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे असल्याचे पालकमंत्री बावनकुळे यांनी म्हटले.शासनाच्या निकषानुसार मृत पाटील व पराते कुटुंबियांना आर्थिक मदतीचा मदतीसह शासनाच्या विविध योजनेअंतर्गत लाभ देण्यात आले. आ. आशीष देशमुख, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, उपविभागीय अधिकारी संपत खलाटे आदी उपस्थित होते.

# मोबाईल चोरट्यांकडून तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

नागपूर, दि. २९ प्रतिनिधी



बोरी पोलिसांनी मोबाईल चोरट्यांकडून तब्बल तीन लाखांचा मुद्देमाल जप्त केला असून, तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. पंकज मोहन बांगरे, गौरव नंदलाल श्रीवास्तव अशी आरोपींची नावे आहेत तर, अन्य एक विधिसंघर्ष बालक आहे.

माहितीनुसार, स्थानिक दीपक विठ्ठलराव पोले २३ ऑगस्टच्या रात्री साडेदहाच्या सुमारास मोबाईलवर बोलत चौधरी हॉस्पिटलकडे जात होते यावेळी दुचाकीवरून आलेल्या दोघांनी त्यांच्या हातातून मोबाईल हिसकावून पळ काढला होता. सदर घटनेबाबत त्यांनी बोरी पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली यानंतर नागपूर ग्रामीण जिल्हा पोलिस अधीक्षक, अपर पोलिस अधीक्षक, सहाय्यक पोलिस अधीक्षक तथा उपविभागीय पोलिस अधिकारी, दीपक अग्रवाल यांच्या सूचनेवरून बोरी पोलिसांनी गोपनिय आणि तांत्रिक माहितीच्या आधारे मोबाईल हिसकावून पळ काढणाऱ्या तीन आरोपींच्या टोळीला हुडकून काढले पंकज मोहन बांगरे रा. सुकळी बेलदार, गौरव नंदलाल श्रीवास्तव बुटीबोरी अशी आरोपींची नावे असून, एका विधिसंघर्ष बालकाचा समावेश आहे.

**१३ हॅन्डसेट**

कारवाईदरम्यान तपासपथकाने १ लाख ५२ हजार ५०० रुपये किमतीचे १३ मोबाईल हॅन्डसेट, गुन्ह्यात वापरलेल्या दोन दुचाकी असा एकूण ३ लाख २ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर कामगिरी पोलिस निरीक्षक प्रताप भोसले यांच्या मार्गदर्शनात सपोनि अजितसिंग देवरे, पोहवा आशीष टेकाम, पोहवा युनुस खान, पोहवा कुणाल पारधी, पोशि गोरख मोकडे, पोशि माधव गुट्टे, पोशि दशरथ घुगरे यांनी केली आहे. पुढील तपास पोहवा कुणाल पारधी करत आहे.

# ‘गीत गाता चल’ कार्यक्रम

**नागपूर, दि. २९ :** संगीतोपासक संस्थेच्या वतीने ‘गीत गाता चल’ या हिंदी चित्रपट गीतांचा सुश्राव्य कार्यक्रम सायंटिफिक सभागृहात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात पिया बिना पिया बिना, जीवन से भरी, रिमझिम के ये गीत, इन हवाओं में, किसलिए मैने प्यार किया, नैना तुम्हारे, जीवन के हर मोड पे, गोरे गोरे ओ बाँके छोरे, तेरे चेहरे से अशी तब्बल ३० हून अधिक एकल व द्वंद्व सुमधुर चित्रपट गीते सादर करण्यात आली. या गाण्यांना दिलीप रपाटे, विवेक सगदेव, संजय कुळकर्णी, मोहन पांडे, आबा भोगे, आर्या बनहट्टी, वंदना कडू, प्राजक्ता बाकरे, सुनिल दहिकर, जयंत व्यास, मनोज शेरकी, दीपा रपाटे, डॉ. वैशाली खंडाईत, मानसी बढे, रोहिणी पाटणकर, डॉ. कविता खोंड, मंजिरी बनहट्टी, संगीता गडवे यांनी स्वरसाज दिला शिरीष पाटणकर यांनी निवेदन केले.

# शासकीय जागांवर ‘मियावाकी’ पद्धतीने वृक्ष लागवड होणार : जिल्हाधिकारी

नागपूर, दि. २९ प्रतिनिधी



वृक्ष लागवडीच्या मोहिमेकडे केवळ शासकीय उपक्रम न पाहता प्रत्येक विभाग प्रमुखाने आपल्या राष्ट्रीय कर्तव्याची भावना मनात ठेवून आपल्याला दिलेल्या वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करावे जिल्ह्यात विविध विभागांतर्गत ज्या-ज्या ठिकाणी शासकीय जमिनी व कार्यालय आहेत, अशा सुमारे एक हजारापेक्षा अधिक ठिकाणी ‘मियावाकी’पद्धतीने वृक्ष लागवड करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज वृक्ष लागवड मोहिमेसंबंधी आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, नागपूर वन विभागाच्या उपवनसंरक्षक डॉ. विनिता व्यास व संबंधित सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. नागपूर जिल्ह्यासाठी आपण सुमारे एक कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. महामार्गाच्या बाजूला, टोलनाका परिसर यासोबतच जिल्हा परिषदेसह नगर विकास विभाग व इतर सर्व विभागप्रमुखांनी आपल्या कार्यालय परिसरात कल्पक पद्धतीने वृक्ष लागवडीकडे पाहणे आवश्यक आहे. यात नगर पंचायतीने आपल्या कार्यालयाच्या परिसरात भर देण्यासह लोकसहभागाला चालना द्यावी हेच उत्तरदायित्व जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या सर्व विभागांनी महसूल विभागाच्या समन्वयातून पूर्ण करावे, असे त्यांनी स्पष्ट केले. ‘मियावाकी घनवन’ ही जपानमधील वनस्पतीशास्त्रज्ञ अकिरा मियावाकी यांची संकल्पना आहे. स्थानिक प्रजातींद्वारे रोपांची घनदाट लागवड करतात. रोपे निवडताना दुर्मिळ प्रजातींना प्राधान्य असते. ज्या मातीची प्रत प्राधान्याने खराब असते, अशा चार स्तरांमध्ये एक ते बारा महिने वयाची रोपे लावतात. मृदा सर्वेक्षण, प्रजातींची निवड आणि वर्गीकरण, बायोमास सर्वेक्षण, वृक्षारोपण आणि देखभाल असे टप्पे मियावाकी पद्धतीत पार पाडावे लागतात.

# ‘व्हीआयए’ शिष्टमंडळाने घेतली मुख्यमंत्र्यांची भेट



नागपूर,दि. २९ प्रतिनिधी

व्हीआयए अर्थात विदर्भ इंडस्ट्रिज असोसिएशनच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नागपूर येथील त्यांच्या कार्यालयात भेट घेतली. यावेळी विदर्भातील औद्योगिक विकासासंदर्भात महत्त्वाचे मुद्दे सादर केले.

बैठकीत प्रलंबित अनुदाने आणि आयपीएस निधी लवकरात लवकर जारी करणे, विदर्भ-मराठवाडा (व्हीएम) ऊर्जा प्रोत्साहन योजनेत बदल करणे, उद्योगांसाठी वीज खर्च वाजवी राहावा याची खात्री करणे, सौर व्यवहार्यता मॉडेल, सुलभ जमीन वाटप, आजारी उद्योगांचे पुनरुज्जीवन, विदर्भाच्या औद्योगिकीकरणासाठी प्रोत्साहन धोरणे, जलद निवारण तक्रार निवारण कक्ष अशा मुद्द्यांवर चर्चा पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी औद्योगिक आत्मविश्वास वाढवणाऱ्या आणि प्रादेशिक विकासाला गती देणाऱ्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केल्याने ही बैठक अत्यंत सकारात्मक ठरली, असे मत शिष्टमंडळाने व्यक्त केले. दरम्यान, शिष्टमंडळाने मुख्यमंत्री फडणवीस यांचे त्यांच्या सक्रिय दृष्टिकोन आणि धोरणात्मक स्पष्टतेबद्दल आभार मानले.

# ‘डीआरजीजी’ समितीची सभा, नियोजनावर चर्चा

नागपूर, दि. २९ प्रतिनिधी



केंद्र शासनाच्या जनजातीय कार्य मंत्रालयाने दिलेल्या कार्यक्रम अंमलबजावणीच्या टप्पा दोन अंतर्गत जिल्हा स्तरावरील विविध कार्यालय व प्रशासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी जिल्हास्तरीय मार्गदर्शन कार्यशाळा, डिस्ट्रिक लेवल ओरिटेशन प्रोग्रॅम तसेच डिस्ट्रिक्ट रिस्पॉन्सिव्ह गव्हर्नन्स ग्रुपचे (डीआरजीजी) गठन करण्यात आले आहे. सदर समितीची सभा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडली. सदर बैठकीत जिल्हास्तरीय कार्यान्वित यंत्रणाचे पदाधिकारी तसेच तालुका स्तरावरील गटविकास अधिकारी आणि तहसीलदार उपस्थित होते.

प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाअंतर्गत केंद्र शासनाने १७ विभागा अंतर्गत २५ योजना राबविण्याचे उद्दिष्ट दिले आहे. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी (जनजातीय कार्य मंत्रालयाने ‘आदी-कर्मयोगी-उत्तरदायी शासन कार्यक्रम’) या कार्यक्रमाची राष्ट्रीय पातळीवर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे सदर कार्यक्रम धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान या योजनेच्या व्यापक आराखड्याशी जोडण्यात आलेला असून, त्याद्वारे आदिवासी भागांमध्ये बहुस्तरीय क्षमता विकासद्वारे (कॅस्केड) आदिवासी समुदायाच्या विकासासाठी उत्तरदायी शासन व्यवस्था उभारणे हा सदर कार्यक्रमाचा उद्देश आहे. सदर बैठकीत जिल्हा मास्टर ट्रेनर यांनी आदी कर्मयोगी अभियानासंबंधी विस्तृत माहिती देत पुढील नियोजनावर चर्चा करण्यात आली. सदर अभियानाचा उद्देश विकसित भारत २०४७ हा असून, शेवटच्या आदिवासी व्यक्तीपर्यंत पोहोचणे, विविध शासकीय योजनाचा लाभ देऊन २० लाख स्थानिक नेतृत्व घडवणे, गावदृष्टी कृती आराखडा पाच वर्षांसाठी तयार करून आदिवासी समाजाचा सर्वांगीण विकास करणे हा आहे.सदर ओरिएंटेशनमध्ये डिस्ट्रिक्ट मास्टर ट्रेनर सना हजारे आणि खुशाल राऊत यांनी सादरीकरण केले. नोडल अधिकारी राहुल काकडे, डिस्ट्रिक्ट मास्टर ट्रेनर महेंद्र वाघमारे, प्रसेनजित गायकवाड आणि कन्सल्टंट अनिल चांदेवार यांनी सहभाग घेतला.

# दोन कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकले!

## मनपाच्या नस्ती चोरांवर आयुक्तांची कारवाई

नागपूर, दि. २९ प्रतिनिधी

नागपूर महानगरपालिकेच्या लक्ष्मीनगर झोन कार्यालयातील उपअभियंता कार्यालयातून महानगरपालिकेच्या फाईल चोरण्याच्या आरोपावरून नागपूर महानगरपालिकेने दोन कंत्राटदारांवर कारवाई केली असून, त्यांचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करून त्यांना कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकले आहे. अनिकेत रंगारी व राजेश रंगारी अशी या दोन कंत्राटदारांची नावे आहेत.

मनपाच्या लक्ष्मीनगर झोनमधील उपअभियंता अभिजीत नेताम यांच्या कार्यालयातून २५ जुलै रोजी कंत्राटदार अनिकेत रंगारी व राजेश रंगारी यांनी कार्यालयीन नस्त्यांची चोरी केली. यासंदर्भात उपअभियंता अभिजीत नेताम यांनी बजाजनगर ठाण्यात तक्रार नोंदविली आहे. त्यानुसार त्यांच्यावर गुन्हे दाखल झालेले आहेत. अनिकेत रंगारी व राजेश रंगारी या दोन्ही कंत्राटदारांच्या कृतीची गांभीर्याने दाखल घेत आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या २१ ऑगस्ट २०२५ रोजी आदेशान्वये या दोन्ही कंत्राटदारांचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे नागपूर महानगरपालिकेच्या सर्व प्रकारच्या निविदा प्रक्रियेत सहभागी घेण्यापासून कायमस्वरुपी प्रतिबंधित करून त्यांना काळ्या यादीत टाकण्यात आल्याचे कार्यकारी अभियंता (प्रकल्प १) यांनी आदेशात म्हटले आहे.

विचार प्रबोधन सप्ताह... डॉ. श्यामराव कोरेटी यांचे प्रतिपादन, ‘महानुभाव विशारद पदविका अभ्यासक्रम’ सुरू करणार

# भारतीय धर्मसंस्कृतीत सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे मोठे योगदान

नागपूर, दि. २९ प्रतिनिधी

**भारतीय धर्मसंस्कृतीत सर्वज्ञ श्री चक्रधरस्वामींचे मोठे योगदान आहे सध्याच्या काळात त्यांच्या विचारांची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी केले.**





राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासनद्वारा सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिनाच्या निमित्ताने सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी विचार प्रबोधन सप्ताहाअंतर्गत विशेष व्याख्यान भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासनात पार पडले. यावेळी डॉ. कोरेटी संबोधित होते. कार्यकारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे-चवरे (भाप्रसे) यांच्या मार्गदर्शनाखाली मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी अध्यक्षस्थान भूषविले. प्रमुख व्याख्याते डॉ. कोमल ठाकरे, भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासन प्रमुख प्रा. भारतभूषण शास्त्री, महात्मा गांधी विचारधारा विभाग प्रमुख प्रा. प्रमोद वाटकर यांची उपस्थिती होती. डॉ. विशाखा कांबळे, डॉ. पद्मिनी घोसेकर, डॉ. बळवंत भोयर आदी उपस्थित होते. आधुनिक काळात बदलत चाललेल्या जीवनशैलीमुळे व अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे मानवी स्वभाव आळशी होत आहे. पुढील काळात सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींच्या मूल्यांची, विचारांची समाजाला नितांत गरज आहे, असे डॉ. कोरेटी यांनी सांगितले.

**समताधिष्ठित** समाजनिमीर्तीसाठी श्रीचक्रधर स्वामींच्या विचारांची गरज असल्याचे मत प्रमुख व्याख्याते डॉ. कोमल ठाकरे यांनी व्यक्त केले. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी बाराव्या शतकात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व हक्क आदी समाज मूल्यांचा विचार प्रत्यक्ष आचरणाद्वारे जनमाणसांत रुजविण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर परिभ्रमण केले. त्यांनी आपले तत्वज्ञान लोकभाषा असलेल्या मराठी भाषेत सांगून सर्वसामान्य लोकांना ज्ञानाची कवाडे खुली करून दिली. समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींचे विचार कृतीशील पद्धतीने अंगीकार करण्याची आज नितांत गरज असून, आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्याची क्षमता स्वामींच्या विचारात आहे. स्वामींनी तत्कालीन अनिष्ट परंपरा, कर्मकांड, व्रतवैकल्ये, सतीप्रथा, यांचा आपल्या तत्वज्ञानाच्या माध्यमातून समुळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सत्य, अहिंसा, भूतदया, सर्वधर्मसहिष्णूत आदी मानवी मूल्ये आपल्या तत्वज्ञानातून सांगितली आहे, असे डॉ. कोमल ठाकरे म्हणाले. याप्रसंगी अध्यासनाद्वारे वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था येथे काव्यवाचन स्पर्धा व धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर येथे घेण्यात आलेल्या लीळाचरित्र अभिवाचन स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. संचालन प्रा. स्मिता शहाणे यांनी केले तृषाल रामटेके यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभिलाष पंजाबी, राधा कनोजिया, दुष्यंत बारसागडे यांनी सहकार्य केले. विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, महानुभाव साहित्याचे अभ्यासक, संशोधक उपस्थित होते.

### अध्यासन आपल्या दारी

**भगवान श्रीचक्रधर स्वामींच्या विचारांचा प्रचार - प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा विचार प्रबोधन सप्ताह पुढील काळात वर्धा, चंद्रपूर, भंडारा जिल्ह्यातही संपन्न होणार आहे. ‘अध्यासन आपल्या दारी’ हा विशेष उपक्रम अध्यासनात राबवल्या जात आहे. चालू २०२५-२६ शैक्षणिक वर्षांपासून सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या विचारांवरती आधारित अध्यासनाद्वारे ‘महानुभाव विशारद पदविका’हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती अध्यासनाचे प्रमुख प्रा. भारतभूषण शास्त्री यांनी दिली.**

Mrs Sunita Jatal Madam's
SHREE G-SQUARE GUIDANCE
9767930223
11th/ 12th | 8th, 9th, 10th
NEET /JEE /MHT- CET STATE BOARD | STATE BOARD / CBSE FOUNDATION
• SBI बँकेच्या बाजूला भारत पेट्रोल पंप समोर, कौलखेड अकोला.
• चैतन्य कॉलनी, एकविरा ग्राउंड मागे, गौरक्षण रोड, अकोला

अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, शनिवार, दि. ३० ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com

OM COACHING CLASSES
COMPUTER SCIENCE
11th & 12th
Behind Tathod Mangal Karyalaya, Shastri Nagar, Akola,
Mrs. Anjali mam 9404845492

# जिल्ह्यातील १०४ गावातील ७ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान

## शहरासह जिल्ह्यात १०५ घरे क्षतिग्रस्त

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २९ :** गत दोन दिवसांपासून सुरू असलेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील १०४ गावातील ७ हजार ८७५ हेक्टर शेत जमिनीवरील तूर, सोयाबीन, कपाशी व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहे. या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने शहरासह जिल्ह्यात थैमान घातल्याने जिल्ह्यात १०५ घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचा तत्काळ पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.



शहरासह जिल्ह्यातील ग्रामीण भागत गुरुवारी (ता.२८) व शुक्रवार (ता.२९) रोजी वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने थैमान घातले. ढगफुटी सदृश्य पावसामुळे नदी, नाल्यांना पूर येत शेत जमिनीवरील पिकांसह नागरिकांच्या घरात पाणी घुसल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान होत जनजिवन विस्कळीत झाले आहे. जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे अकोला तालुक्यातील ५९ घरांचे अंशतः, एका घराचे पूर्णत, मुर्तिजापूर तालुक्यात तीन घरांचे अशंत अशा ६३ घरांचे नुकसान झाले आहे. तर अकोला शहरातील ४२ घरांचे अंशतः नुकसान झाल्याची नोंद आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे करण्यात आली आहे. शुक्रवारी मुर्तिजापूर तालुक्यातील कंझरा गावाजवळील नाल्याच्या रस्त्यावरून जात असतांना पुराच्या पाण्यात रेखा रमेश मते (वय ४०) ह्या वाहुन गेले असुन त्यांचे शोधकार्य सुरू असल्याची माहिती सुत्रांनी दिली.

**अनेकांचे संसार उघड्यावर**

वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस बरसल्याने शहरातील अनेक भागात नाल्या ओव्हर फ्लो होत पावसाचे पाणी नागरिकांच्या घरात घुसल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. हीच परिस्थिती ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात असल्याने या नुकसानीचा तातडीने सर्वे करून नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### चार मंडळात अतिवृष्टी

जिल्ह्यातील ५२ मंडळापैकी ४ मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये अकोला मंडळात ६५.८० मी.मी, पळसो ६६.३० मी. मी., शेलू ७४.५० मी. मी., लाखपुरी ६८.५० मी. मी. पावसाची नोंद करण्यात आली आहे.

महत्त्वाचे

## आयुष्मान भारतमध्ये जिल्हा सातवा

**अकोला :** आयुष्मान भारत, जनआरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा अधिकाधिक गरजूंना लाभ मिळवून देण्यासाठी गावे, वस्त्या, शाळा, महाविद्यालयांमध्ये जाऊन केवायसी सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्यात खासगी व शासकीय मिळून ४० रुग्णालयांत योजनेत सुविधा उपलब्ध असून, योजनेच्या अंमलबजावणीत अकोला जिल्हा राज्यात सातव्या क्रमांकावर आहे.

या योजनेतून लाभार्थ्यांना प्रति कुटुंब प्रति वर्ष पाच लाखापर्यंत मोफत उपचार व १ हजार ३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया सुविधा मिळणार आहेत. ई-केवायसी करून घेण्यासाठी आरोग्य प्रशासनाने पुढाकार घेतला असून, ७ लक्ष ६० हजार ३५० कार्ड तयार झाले आहेत. लाभार्थ्यांची एकूण संख्या १७ लक्ष ३३ हजार १६ असून, उर्वरित ई- केवायसी पूर्ण करून घेण्यासाठी मोहिम हाती घेण्यात आली आहे.

योजनेचा लाभ घेण्यास सर्व प्रकारचे शिधापत्रिकाधारक पात्र आहेत. मात्र, यासाठी आयुष्मान कार्ड तयार करून घेणे बंधनकारक आहे. लाभाथ स्वतःच्या मोबाईलवर देखील आयुष्मान ॲप डाऊनलोड करून इ केवायसी करू शकतात.

## लिपीकास लाच घेताना अटक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २९ :** महानगरपालिकेतील जन्ममृत्यू विभागात काम करणाऱ्या प्रभारी लिपीकास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला यांनी आज रंगेहात पकडले. तक्रारदाराच्या तिन मुलांच्या जन्म प्रमाणपत्रातील नावे, आधार कार्ड व पत्ता दुरुस्ती करून देण्यासाठी आरोपीकडून लाचेची मागणी करण्यात आली होती.

आरोपी चंद्रकांत माणिकराव अवधनकर (४४), जन्ममृत्यू विभाग, महानगरपालिका, अकोला यांनी तक्रारदाराकडे काम करून देण्यासाठी ३०० रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदारास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी २८ ऑगस्ट रोजी अकोला अँटी करप्शन ब्युरो कडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर पडताळणी कार्यवाही करण्यात आली असता, आरोपी अवधनकर यांनी तक्रारदाराकडे पंचासमक्ष ३०० कृपयाची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले. यानंतर आज दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी महानगरपालिका अकोला येथे रचण्यात आलेल्या यशस्वी सापळा कार्यवाहीत आरोपी अवधनकर यांनी तक्रारदाराकडून मागितलेली लाचरक्कम स्वीकारली. त्यानंतर त्यास पंचासमक्ष लाच रकमेसह ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई मारुती जगताप, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, तसेच सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र यांच्या मार्गदर्शनाखाली, मिलिंदकुमार बहाकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला यांच्या देखरेखीखाली करण्यात आली. सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक प्रविण वेरूळकर, पोलीस निरीक्षक अतुल इंगोले, तसेच पोलीस अंमलदार दिगांबर जाधव, अविनाश पाचपोर, गोपाल किरडे, संदिप ताले, असलम शहा, निलेश शेगोकार व चालक नफिस यांनी ही संपूर्ण कारवाई यशस्वीरीत्या पूर्ण केली.

## मनपा फायर विभाग व जीएमसी प्रशासनाचा निष्काळजीपणा चव्हाट्यावर

### रुग्ण सुरक्षेला गंभीर धोका!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २९ :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी) व सर्वोपचार रुग्णालयाच्या नव्या इमारतीसह शहरातील बहुतेक खाजगी रुग्णालयांचे फायर ऑडिट अद्याप झालेले नाही. नुकतेच सर्वोपचार रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागालगत असलेल्या इलेक्ट्रिक रूमला लागलेल्या आगीच्या घटनेतून हा निष्काळजीपणा उघडकीस आला. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली; मात्र फायर ऑडिट न केलेली इमारत कार्यान्वित कशी, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.

महापालिका अग्निशमन विभागाने जीएमसीला नोटीस बजावल्याचे सांगितले जात असले तरी महिनोनमहिने फायर ऑडिट न झालेली रुग्णालये डोळ्यांआड कशी गेली, ही शंका उपस्थित होत आहे. फायर एनओसी नसलेल्या या रुग्णालयांत दररोज शेकडो गरीब रुग्ण खेडोपाड्यांतून उपचारासाठी दाखल होतात. तरीदेखील फायर अलार्म, अग्निशामक यंत्रणा, आपत्कालीन मार्ग यांची खात्री न करता सेवा सुरू ठेवली जात आहे. हे म्हणजे रुग्ण, नातेवाईक व कर्मचारी यांच्या सुरक्षेला उघडपणे धोक्यात टाकणे होय. राज्यात मागील काही वर्षांत रुग्णालयांना लागलेल्या आगीत शेकडो निरपराधांचा बळी गेला. त्यानंतर शासनाने फायर ऑडिट अनिवार्य केले. मात्र अकोल्यात हे आदेश अक्षरशः पायदळी तुडवले जात आहेत. फायर एनओसी न घेता रुग्णालय सुरू ठेवलेच कसे? मनपा अग्निशमन विभागाने तपासणी का केली नाही? जीएमसी प्रशासनाने सुरक्षा उपाययोजना उशिरा का केल्या? असा सवाल आता उपस्थित होत आहे. मनपा फायर विभागाने केवळ नोटीस बजावण्याचे काम केले; मात्र प्रत्यक्ष तपासणी का केली नाही? तपासणी केली नाही तर मनपा अग्निशमन विभागाला नोटीस कोण देणार, अशी चर्चा नागरिकांकडून होत आहे. अखेर किती दिवस रुग्णांचे प्राण धोक्यात घालून असा निष्काळजीपणा सुरू राहणार? हा निष्काळजीपणा तातडीने थांबवला नाही, तर अकोल्यातही भीषण दुर्घटनेचे पडसाद उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## विकास कामांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता तत्काळ द्या!

### जिल्हाधिकारी यांचे निर्देश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २९ :** जिल्ह्यातील विकासकामांना चालना देण्यासाठी शासनाकडून ३० टक्के निधी प्राप्त झाला आहे. या विकास कामांना चालना देण्यासाठी सर्व विभागांनी प्रशासकीय व तांत्रिकमान्यतांची कार्यवाही तत्काळ पूर्ण करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी शुक्रवार (ता.२९) येथे दिले.

जिल्हा वार्षिक योजनेच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी नियोजन भवनात बैठकीद्वारे आढावा घेतला, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी मोहनकुमार व्यवहारे, जिल्हा समाजकल्याण सहायक आयुक्त डॉ. एम. जी. वाठ, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर यांच्यासह सर्व यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा मीना म्हणाल्या की, मान्यतांची कार्यवाही तात्काळ पूर्ण करून प्राप्त निधी नुसार कामांना चालना द्यावी. नियोजनानुसार जिल्ह्याला ३० टक्के निधी प्राप्त आहे.

## मित्राचा खून करणाऱ्यास जन्मठेपेची शिक्षा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २९ :** ऑगस्ट अकोला येथील एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या खून प्रकरणात वि. जिल्हा व सत्र न्यायाधीश-१ ए. डी. क्षीरसागर यांनी आज निकाल देत आरोपी सुनिल श्रीचंद पालवे (३१), रा. खकनार, जि. बुरहानपूर यास कलम ३०२ भा. द. वि. अंतर्गत जन्मठेपेची शिक्षा तसेच ५ हजार रुपये दंड ठोठावला आहे. दंड न भरल्यास आरोपीस अतिरिक्त सहा महिन्यांची कैद भोगावी लागेल.

दिनांक ०४ ऑगस्ट २००९ रोजी रात्री ९ वाजता एम.आय. डी.सी. परिसरातील सुरजदेव दालमिल येथे ही घटना घडली. आरोपी सुनिल पालवे हा त्याचे दोन मित्र प्रभु छोटेलाल गौतम व राजु शंकरलाल जांभेकर यांच्यासोबत मजुरीचे काम करीत होता. ते सर्वजण दालमिल परिसरात एका खोलीत एकत्र राहत असत. त्या दिवशी रात्री जेवणाच्या वेळी आरोपी सुनिल पालवे आणि राजु जांभेकर यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. वादातून रागाच्या भरात सुनिल पालवे याने जवळ पडलेला लाकडी पोळपाट डोक्यात मारून राजु याला गंभीर जखमी केले. त्यातून राजुचा मृत्यू झाला. या घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार प्रभु छोटेलाल गौतम असून त्यानेच एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. प्रकरणी तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्रीकृष्ण रामदास पाटील यांनी केला. सखोल तपास करून त्यांनी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सरकार पक्षातर्फे एकूण ९ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. उपलब्ध साक्षी आणि पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपी सुनिल पालवे याला दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या प्रकरणात सरकार पक्षाची बाजू सहाय्यक सरकारी वकील किरण खोत यांनी प्रभावीपणे मांडली. एम.आय. डी.सी. पोलीस ठाण्याचे पैरवी अधिकारी श्रीमती महल्ले यांनी तर ए.एस.आय. एफ. आर. काझी यांनी सक्रिय सहाय्य केले.

## दाखला मिळविण्यासाठी महापालिकेत रांगा

**अकोला :** महापालिकेकडून जन्म दाखला काढण्यासाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे. एकीकडे जन्म दाखला काढण्यासाठी लांबलचक रांगा दिसत आहेत, तर दुसरीकडे जन्म दाखल्यासाठी अर्ज करण्यासाठी तितकीच गर्दी दिसून येत आहे. महापालिकेच्या नियोजनाअभावी नागरिकांना रांगेत ताटकळत उभे राहावे लागत आहे. अर्ज करण्यासाठी व दाखले घेण्यासाठी खिडक्या वाढविण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

केवळ राज्य सरकारच्या योजनाच नव्हे तर शाळेसाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या जन्माची नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी पालकवर्ग अर्ज भरण्यात व्यस्त आहे. महानगरपालिका हद्दीत राहणाऱ्या नागरिकांना जन्म दाखला काढण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

## अष्टविनायक दर्शन



### श्री. वरदविनायक गणपती मंदिर, महाड

अष्टविनायक यात्रेदरम्यान अष्टविनायकांच्या यादीतील वरदविनायक महाड गणपती मंदिर हे सातवे गणेश मंदिर आहे. मंदिराला मठ असेही म्हणतात. मंदिराची रचना अतिशय साधी आहे. त्याला २५ फूट उंचीचा घुमट आणि साधे छत आहे. छताच्या वरच्या बाजूला एक सोनेरी कलश आहे. हे चौकोनी मंदिर आहे आणि आकार खूपच लहान आहे८ फूट रुंद आणि ८ फूट लांब. भाविकांना गर्भगृहात जाऊन पूजा करण्याची परवानगी आहे.

### श्री वरदविनायक गणपती मंदिर महाडचे महत्व

पहिली गोष्ट म्हणजे वरद विनायक मूर्ती स्वयंभू आहे. दुसरी गोष्ट म्हणजे गणेशाला वरद विनायक म्हटले जाते कारण, तो त्याच्या भक्तांच्या इच्छा पूर्ण करतो. मंदिर पूर्वेकडे तोंड करून आहे आणि शांत परिसर आणि शांत वातावरण भक्तांना आध्यात्मिक अनुभव देते. शास्त्रोक्त अष्टविनायक यात्रा ही एका विशिष्ट क्रमाने होणारी यात्रा आहे.

### श्री वरदविनायक गणपती मंदिराच्या आख्यायिका

मंदिराशी संबंधित आख्यायिकेनुसार, कौदिन्यपूरचा एक राजकुमार रुक्मगंड शिकारीला गेला होता. जंगलात, एका ऋषीची पत्नी असलेल्या एका महिलेने त्याला फसवण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याने ते नाकारले. तथापि, इंद्राने राजकुमाराचे रूप धारण केले आणि तिची इच्छा पूर्ण केली.

त्या महिलेने ग्रित्स्माद नावाच्या मुलाला जन्म दिला. तो खूप बुद्धिमान आणि विद्वान होता. त्याने एकदा इतर विद्वानांना वादविवादासाठी विचारले, परंतु त्यांनी नकार दिला, कारण तो ब्राह्मण नसल्याने ते त्याच्याशी धार्मिक बाबींवर चर्चा करू शकत नाहीत. ग्रित्स्मादने त्याच्या आईला त्याच्या जन्माचे रहस्य विचारले. जेव्हा त्याच्या आईने नकार दिला तेव्हा त्याने तिला शाप दिला. आईनेही त्याला शाप दिला. पण एका स्वर्गीय वाणीने त्याला सांगितले की तो इंद्राचा पुत्र आहे.

ग्रित्समद महाड येथे आले आणि भगवान गणेशाची प्रार्थना केली. ते प्रसन्न झाले आणि त्यांना वरदान दिले. ग्रित्समदांनी त्यांना ब्राह्मण म्हणून मान्यता देण्याची विनंती केली आणि भगवान गणेशाने त्यांची इच्छा पूर्ण केली. त्यांच्या भक्ताची इच्छा पूर्ण करून ते तिथेच राहिले असल्याने, भगवान गणेशाची येथे वरदविनायक म्हणून पूजा केली जाते.



गणेश उत्सवाच्या सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा

डॉ.रविंद्र रमेश टेके
वाडेगाव



दिलीप परनाटे
जिल्हाध्यक्ष शिवसंग्राम

संकलन- चंदन जंजाळ,
तालुका प्रतिनिधी बाळापुर, ९८६०२८९१६६

## जिल्हा परिषद निवडणुकीसाठी इच्छुकांकडून फिल्डींग लावणे सुरु

### आता लक्ष आरक्षणाकडे : जातीय समीकरणांची जुळवाजुळव

। श्रीकांत पाचकवडे ।

**अकोला, दि. २९:** अकोला जिल्हा परिषदेच्या ५२ मतदारसंघातील प्रभाग रचना अंतीम झाल्यानंतर आता या निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांकडून राजकीय व सामाजीक समीकरण जुळविण्यात येत आहेत. आपल्या सोयीनुसार कोणता मतदारसंघात कोणती गावे आहेत, हक्काचे मतदान किती आहेत, याअनुषंगाने गणित जुळवणे सुरु झाले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी राजकीय आरक्षणावरून जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका प्रलंबित होत्या. सर्वोच्च न्यायालयाने ६ मे रोजी ओबीसी आरक्षणाच्या याचिकेवर निर्णय दिल्यानंतर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला होता. त्यानंतर प्रभाग रचना जाहीर करण्यात आली. यावर आक्षेप, हरकती मागवण्यात आल्या. आक्षेप संबंधित तहसील कार्यालयात दाखल करण्यात आले. जिल्हा प्रशासनाकडून पुढील कार्यवाही




करीत विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव सादर केला होता. यावर आयुक्त कार्यालयात सुनावणीची प्रक्रिया पार पडली होती. यापूव हरकतींवर विभागीय आयुक्तांकडे सुनावणी पूर्ण झाली होती. ५२ सर्कलसाठी (गट किंवा मतदारसंघ) एकूण ३२ हरकती दाखल झाल्या होत्या. सुधारित तरतुदीनुसार आयुक्तांना अंतीम करण्याचे अधिकार बहाल करण्यात आले. त्यानुसार २२ ऑगस्ट रोजी प्रभाग रचना अंतीम करण्यात आली. आगामी निवडणुकांसाठी प्रभाग रचना जैसे थेच असून, काहींना राजकीय दिलासा तर काहींची धाकधूक वाढली आहे. आता या प्रभाग रचनेवर शिक्कामोर्तब झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या ५२ मतदारसंघातील इच्छुक उमेवादारांसह राजकीय पक्ष आणि ग्रामस्थांचे आरक्षण प्रक्रियेची उत्सुकता वाढली आहे. ही प्रक्रिया झाल्यानंतर खऱ्या अर्थाने इच्छुकांकडून राजकीय हालचालींना वेग येणार आहे.

**राजकीय पक्षांच्या बैठकांना जोर**

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत आपल्या पक्षाचे सर्वाधिक उमेदवार निवडून आणण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी व्यूहरचना आखत जिल्ह्याभरात बैठकांचा धुराडा उडवून दिला आहे. यात वंचित बहुजन आघाडी, भाजप, शिवसेना शिंदे गट, उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने सर्कल निहाय बैठकांचे सत्र सुरू केले आहे.

### दुसऱ्या सर्कलसाठी फिल्डींग

जिल्हा परिषदेच्या ५२ सर्कल मध्ये काही विद्यमान सदस्यांचे सामाजिक व राजकीय सोयीचे मतदारसंघ हातातून निसटून गेल्याने त्यांची धाकधूक वाढली आहे. त्यामुळे आपले गणित कोणत्या मतदारसंघात यशस्वी होऊन विजयाचा मार्ग सुकर होईल, याची चाचपणी काही विद्यमान सदस्यांसह इच्छुक उमेदवारांकडून करण्यात येत आहे.

## नवसाला पावणारा ‘लालबागचा राजा’

### माळीपुरा एकता गणेशोत्सव मंडळाचा ४२ वर्षांचा गौरवशाली प्रवास

। शरद शेगोकार।

**अकोला, दि. २९:** नवसाला पावणारा आणि भक्तांच्या हाकेला धावून येणारा ‘लालबागचा राजा’ आता अकोल्यातील भाविकांच्याही हृदयाचा राजा ठरला आहे. १९८३ साली स्थापन झालेल्या माळीपुरा एकता गणेशोत्सव मंडळाने यंदा ४२ वर्षांचा मानाचा प्रवास करीत ४३ व्या वर्षात पदार्पण केले आहे. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. मोतिसिंग मोहता, तसेच स्व. बाळास्वामी माडकू आणि स्व. कोरान्नी महाराज यांच्यासह इतर सहकाऱ्यांनी ‘एक गाव एक गणपती’ या संकल्पनेतून मंडळाची स्थापना केली. स्थापनेपासूनच मंडळाने सामाजिक जाणिवा जोपासत ‘झाडे लावा झाडे जगवा’ मोहिम, गरीब विद्यार्थ्यांना साहित्य वाटप, मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण असे उपक्रम राबवले.



२००७ साली अकोल्यातील मूर्तिकार शिवा मोकाळकर यांनी मुंबईतील लालबागच्या राजाची हुबेहूब मूत साकारली. मुंबईला न जाता येणाऱ्या भाविकांच्या विनंतीवरून मंडळाने हीच परंपरा अकोल्यात रुजवली. त्यानंतर दरवष ‘अकोल्याचा राजा, लालबागचा राजा’ अकोल्यात विराजमान होत असून हजारो भाविक अकोल्यातच दर्शनाचा लाभ घेत आहेत. आज या मूतवर लोकवर्गणीतून तब्बल आठ किलो चांदीचे दागिने चढवले गेले असून दरवष यात वाढ होत आहे. या उत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे सर्वधमयांचा उत्स्फूर्त सहभाग. विशेषतः मुस्लिम बांधव, महिला आणि लहान मुलांचा सहभाग उल्लेखनीय असतो. त्यामुळे मंडळाने नेहमीच बंधुभाव आणि सर्वधर्मसमभावाचे दर्शन घडवले आहे.

यंदाही मंडप आकर्षक सजला असून सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची सोय करण्यात आली आहे. २७ ऑगस्ट रोजी श्रींची स्थापना करण्यात आली. या उत्सवाच्या दिवसांत गजानन महाराज पारायण, सुंदरकांड, भजन संध्या, गणपती यज्ञ, माता का जगराता यांसह विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महाआरती ४ सप्टेंबर रोजी सायं. ७ वाजता होणार असून त्यानिमित्ताने १५१ किलो तुपाच्या बुंदीचा महाप्रसाद भाविकांना वाटला जाणार आहे.

माळीपुरा मंडळ हे फक्त गणेशोत्सवापुरते न राहता समाजसेवेचेही केंद्र बनले आहे. नवसाला पावणारा हा लालबागचा राजा भाविकांच्या आस्थेचा केंद्रबिंदू ठरला आहे. भक्तांच्या श्रद्धेमुळे ‘अकोल्याचा राजा लालबागचा राजा’ आज मानाचा गणपती बनला आहे. सर्वधमयांचा सहभाग हीच आमची खरी ताकद आहे.

**ॲड. मोतिसिंग मोहता,** संस्थापक अध्यक्ष

अजिंक्य भारत •
आपलं अकोला / वाशिम
अकोला, शनिवार, दि. ३० ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com


महत्त्वाचे

## दारू विक्री वर पोलिसांचा छापा



**बाळापूर :** अकोला जिल्हयामध्ये अवैध धंदे समूळ नष्ट करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहीम राबविण्यात येत आहे त्या अंतर्गत आज दि.२९/ऑगस्ट रोजी १२ वाचे दरम्यान उरळ पोलीस स्टेशन हददीत ग्राम निमकर्दा येथे गणपती बंदोबस्त निमीत्त ठाणेदार पंकज कांबळे,व त्यांचे सहकारी कर्मचारी गस्त करत असताना ग्राम निमकर्दा येथील युवराज इंगळे हा त्यांच्या सैराट पान टपरीच्या बाजूला असलेल्या झोपडीमध्ये अवैध देशी दारूची विक्री करीत असताना दोन पंचांना बोलावून त्यांना माहिती देऊन पंचांनी व पोलिसांनी मिळून युवराज गजानन इंगळे यांच्याजवळ असलेल्या थैलीमध्ये देशी दारू सखु संत्रा कंपनीचे १८० चे २८ क्वार्टर प्रत्येकी ९० रुपये प्रमाणे त्याची किंमत एकूण २५२० रुपये व देशी दारू सखु संत्रा हाऊ बस आलोच प्रीमियम कंपनीचे ९० चे ११ काऊंटर प्रत्येकी ५० रुपये किंमत ५५० रुपये असा एकूण ३०७० रुपयाचा मुद्देमाल आरोपीजवळून जप्त केला असून त्यांचेवर गुन्हा दाखलं करण्यात आला. ही कारवाई पोलीस स्टेशन उरळचे ठाणेदार एपीआय पंकज कांबळे,यांच्या मार्गदर्शन मध्ये केली आहे.

# अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान

## सर्व्हेक्षण करण्याची मागणी; शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**विवरा : दि. २९ :** यावर्षी पावसाने कहर केला आहे. आतापर्यंत पडलेला पाऊस हा मोठ्या नुकसानीचा पाऊस ठरला आहे. मात्र महसूल विभागाकडून फक्त नदी, नाल्या काठावरील शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसानीचे सर्वेक्षण केले आहेत. मात्र इतर शेतकऱ्यांच्या शेतातही पाणी घुसल्याने मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्यांच्या शेती पिकांचे नुकसानीचा सर्व्हे करावा व नुकसान भरपाई द्यावी या मागणीचे निवेदन पातूर तालूक्यातील शेतकऱ्यांनी तहसीलदार यांना केली आहे.

सन २०२४,२०२५ मधील खरीप हंगामातील तसेच फळबाग, तथा कांदा सीड प्लॉट आदींचे मोठे प्रमाणावर नुकसान झालेले असताना अनेक शेतकऱ्यांना शासकीय मदतीपासून वगळण्यात आले.ऑगस्ट २०२५ मध्ये तालुक्यामध्ये कुठे अतिवृष्टी तर कुठे ढगफुटी सदृश पाऊस यामुळे,नदी,नाले मर्यादा ओलांडून वाहल्याने शेकडो शेतकऱ्यांच्या शेतातील पिके पुरामुळे वाहून गेले. कृषी महसूल विभागाअंतर्गत फक्त नदी काठावरील नुकसान पिकांचे सर्व्हेक्षण सुरू आहे.

वास्तविक तालुक्यातील नाल्या काठावरील शेकडो शेतकऱ्यांची शेतपिके वाहून गेली तर अनेकांच्या शेत पिकांमध्ये पाणी साचून राहल्याने पिके सडत असताना संबंधित प्रशासनाकडून सर्व्हेक्षण झालेले नाही.नाल्या काठावरील शेतकऱ्यांच्या नुकसान पिकांचे सर्व्हेक्षण तात्काळ सुरू करून शेतकऱ्यांना आर्थिक मोबदला देण्यात यावा. तसेच यावर्षी अतिवृष्टी आणि ढगफूटी पावसामुळे,झालेल्या पिकांचे नुकसान लक्षात घेता, पिकविम्याच्या जाचक अटी रद्द करून पीक विमाधारक शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळावा. तसेच सन २०२४ २५ मधील रब्बी पिक पेरणीतील कांदा सीड प्लॉट, गहु, मूग,तीळ, भुईमुंग,आदी पिकांचे अवकाळी पावसाने अतोनात नुकसान केले होते.असे असताना सर्व्हेक्षण अधिकारी कर्मचाऱ्यांनी शेकडो शेतकऱ्यावर अन्याय करीत शासकीय आर्थिक लाभापासून वंचित ठेवले.तर अशा शेतकऱ्यांना शासनाकडून नुकसान भरपाई मिळावी. नुकसान पिकांचे सर्व्हेक्षण करून पंचनामे करणारे कर्मचारी शेतकऱ्यांसोबत मुजोरी करीत असतात अशा कर्मचाऱ्यांना समज देऊन शेतकऱ्यांसोबत सौजन्याने वागणूक देण्याचे सांगावे.या आशयाचे निवेदन शेतकरी रक्षण देशमुख, मंगेश केनेकर निलेश देशमुख आदीं सह शेकडो शेतकऱ्यांच्या उपस्थित पातूर तहसीलदार डॉ राहुल वानखडे यांना दिले.

> ज्या शेतकऱ्यांच्या शेतपिकात नाल्यांचे पाणी शिरून नुकसान झाले असेल अशा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे सर्व्हेक्षण करून पंचनामे करण्यात येतील.
>
> **-डॉ राहुल वानखडे**, पातूर तहसीलदार

## जि. प. निवडणूक संदर्भात वरुड जवळका सर्कलची बैठक



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**देवरी: दि. २९ :** अकोला जिल्ह्यामध्ये जी. प. निवडणूकसाठी प्रत्येक पक्ष हा कामाला लागला आहे. वंचित बहुजन आघाडी पक्षप्रमुख श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशान्वये जिल्ह्यामध्ये वं.ब.आघाडीच्या बैठकी सर्कल नीहाय चालू करण्यात आलेलया आहेत. काल पावसाने अकोट तालुक्यामध्ये जबरदस्त पर्जन्यवृष्टी केली त्यामुळे नदी नाले तुडुंब भरून वाहू लागले. एवढ्या मोठ्या पाण्यामधून वं. ब.आघाडीचे कार्यकर्ते नदीच्या पुराला न जुमनता बैठकीला पोहोचले. शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये मनोहर शेळके. शोभाताई शेळके यांनी पक्षाच्या आजपर्यंत झालेले चढ उतार आणि श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांनी अकोला जि प चा बालेकिल्ला साबूत कसा ठेवला? यासह अनेक विषयांवर चर्चा केली. अकोट तालुक्यातील वं.ब. आघाडीचे पूर्ण पदाधिकारी प्रामुख्याने हजर राहून प्रत्येकाने आपापले मत व्यक्त केले. तसेच व .ब. आघाडीच्या जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे यांनी शेकडो. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.तेव्हा कार्यकर्त्यांनी मोठ्या जोमाने पक्षाच्या पाठीशी खंबीर पुणे आम्ही उभे आहोत अशी ग्वाही दिली. या बैठकीला आम्रपाली खंडारे निखिल गावंडे तालुकाध्यक्ष चरण इंगळे तालुका महासचिव रोशन पुलकर तालुका संघटक सुरेंद्र ओईंबे पोस्ट गटनिता धिरज शिरसाट तालुका सचिव दिनेश सरकडे कपिल पोटे दादाराव गवई सुनील बांगर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ॲड. भूषण बहादूर यांनी केले.

# तारुण्यावस्थेतील मुलांसाठी समुपदेशन कार्यशाळा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**हिरपूर : दि. २९ :**तारूण्य वस्थेतील मुलांना येणारे तान तणाव याची चूकीची माहिती यातून बाहेर काढण्यासाठी हे माहितीकार्य आहे. मुलांना तान तनावासाठी विविध सोपे व्यायाम, आसने,एडस् आजाराची माहिती लक्षणे, कारणे, प्रतिबंध या विषयी माहितीअसणे गरजेचे आहे

तरुणावस्थेतील मुला मुलींना दिली. डॉ मनीषा यादव यांनी मुलांनी आपल्या शारीरिक बदला विषयी जागृत असावे अभ्यास,करियर, याचा तान न घेता आरोग्य टिप स्वीकाराव्या असे प्रतिपादन केले. डॉ. अनिल ठाकरे यांनी सोशल मिडिया वरील सर्व तारुण्यावस्थेतील रंजक माहिती प्रमाण मानू नये. ते एक मोहजाल आहे. त्यापासून सावध राहवे. असे आवाहन निनाद बुलबुले यांनी

श्री गाडगे महाराज महाविद्यालय मुर्तीजापुर येथे समाजशास्त्र विभागाच्या वतीने विभाग कार्यशाळेत बोलतांना व्यक्त केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून लक्ष्मीबाई रुग्णालय मूर्तिजापूरचे समुपदेशक निनाद बुलबुले, , प्रा. डॉ. मनिषा यादव डॉ.अनिल ठाकरे, प्रमुख प्रा. राजेन्द्र वाकडे यांची उपस्थिती होती.विद्याथ्यांनी त्यांचे स्वागत केले. प्रास्ताविक प्रा. राजेंद्र वाकडे यांनी केले. यावेळी महाविद्यालायातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते . प्रा.विजय बेलखेडे प्रा.एस. शामसुंदर प्रा. नरेश बनसोड , डॉ अर्चना गायकवाड, डॉ.कांचन मिसाळ, डॉ तायडे प्रा. भारती बाजड प्रा.सुप्रिया इंगोले प्रा.श्रीया ताबंडे तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचीही उपस्थिती होती संचालन डॉ. बनसोडे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार राधा गिरी या विद्यार्थिनीने मानले.

# अकोट ग्रामीण पोलिस स्टेशनच्या पुढाकाराने उत्कृष्ट गणेश मंडळ स्पर्धा आयोजित

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोट:दि. २९ :** गणेशोत्सवाचे औचित्य साधून अकोट ग्रामीण पोलिस स्टेशनच्यावतीने उत्कृष्ट गणेश मंडळ स्पर्धा २०२५ चे आयोजन केले आहे. ही स्पर्धा अकोट तालुक्यातील गावांमधील गणेश मंडळासाठी खुली आहे. लोकसहभागातून उत्सवात शिस्त,पर्यावरणपूरक उपक्रम आणि सामाजिक भान जोपासण्याचा संदेश देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

ही संकल्पना अकोला जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या प्रेरणेतून व संकल्पनेतून साकारली असून अकोट पोलिस उपविभागीय अधिकारी निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व अकोट ग्रामीण पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक किशोर जुनघरे यांच्या नेतृत्वात होत आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी पोलिस उपनिरीक्षक मीना काटोले,व सचिन कुलट,गोपनीय विभागाशी संपर्क साधावा. यास्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन अकोट ग्रामीण पोलिस स्टेशनकडून करण्यात आले आहे. यंदाचा गणेशोत्सव अनुशासनबद्ध व सामाजिक बांधिलकी जोपासणारा ठरेल असा विश्वासही व्यक्त करण्यात आला आहे.त्यामुळे .या स्पर्धेत उत्कृष्ट ठरणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळाला पारितोषिक दिले जाणार आहे.

## एम. आय. एम. च्या तालुकाध्यक्ष पदी अब्दुल आसिफ




**अडगाव बु:** अडगाव परीसरात कार्यरत युवा कार्यकर्ते अब्दुल आसिफ अ शहिद यांची एम आय एम चे तेल्हारा तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली..एम आय एम चे राष्ट्रीय अध्यक्ष असुद्दीन ओवैसी यांचे मार्गदर्शनात राज्याध्यक्ष इम्तियाज जलील यांचे आदेशानुसार संघटन मजबूतीच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्रभर एम आय एम ची संघटन बांधणी सुरु आहे यातील एक भाग म्हणून तेल्हारा तालुक्यातील संघटन बांधणी च्या निमित्ताने झालेल्या बैठकीत राज्यउपाध्यक्ष मो युसुफ सेठ पुंजानी यांनी सामाजिक क्षेत्रात नेहमी अग्रेसर असणारे अडगाव बु येथील अब्दुल आसिफ अब्दुल शहिद यांची नियुक्तीपत्राद्वारे तालुकाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे अब्दुल आसिफ यांच्या नियुक्तीने तेल्हारा तालुक्यात एम आय एम चे संघटन मजबूत होईल अशी आशा राज्य उपाध्यक्ष मो युसुफ सेठ पंजानी यांनी व्यक्त केली अब्दुल आसिफ यांच्या नियुक्तीमुळे त्यांच्या चाहत्यांनी आनंद व्यक्त केला.

# ऋषिपंचमी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

## संत गजानन महाराज सेवा समितीचा उपक्रम



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**बोरगाव मंजू दि. २९ :** स्थानिक लक्ष्मीनगर स्थित श्री संत गजानन महाराज मंदिरात गजानन महाराज यांच्या ११५ व्या पुण्यतिथी व ऋषीपंचमीचे औचित्य साधून विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. मंदिर परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण झाले होते टाळ मृदंगासह श्रीच्या जयघोषाने परिसर दूमदूमला होता. सूत्रसंचालन दयामराम ईंगळे यांनी केले

सकाळी श्री संत गजानन महाराज मूर्तीची तीर्थ स्थापना करून अभिषेक मनीष तिवारी, योगिता तिवारी यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली. व होमहवन पार पडले. त्यानंतर ह भ प विदर्भभूषण सोपान काळपांडे यांच्या मधूर वाणीतून काल्याचे किर्तन झाले. तसेच ह भ प सदांनद महाराज गांवडे यांचे आशीर्वाद लाभले .मृदुंगाचार्य चांगदेव महाराज तसेच गायनाचार्य राजू महाराज नानोटे, गोपाळ महाराज खंडारे; भाष्कर घोगरे ; यांनी मृदंग वादनाने व गायनाने भाविकांना मंत्रमुग्ध केले. श्री चे भक्त महाप्रसाददाते मनीष तिवारी यांनी श्री चरणी महाप्रसाद अर्पण करून अन्नदान सेवाप्रदान केली. यावेळी सेवा समितीच्या वतीने ह भ प सोपान काळबेंडे महाराज, मनीष तिवारी व योगिता तिवारी यांना सपत्नीक सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला प्रामूख्याने श्री भक्त आमदार हरिष पिंपळे; पोलीस निरीक्षक अनिल गोपाळ उपनिरीक्षक उघडे ; वारकरी साहीत्य परिषदेचे शिवशंकर पाटील; पंचक्रोशीतील भाविकांसह सेवाधारी मंडळ ग्रामस्थ भाविक भक्तांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. यशस्वीतेसाठी संत गजानन महाराज सेवा समिती सेवाधारी मंडळाने सहभाग घेतला.

# सेंट पॉल्स अकॅडमीच्या विद्यार्थिनींची सॉफ्ट बॉल स्पर्धेमध्ये जिल्हास्तरावर झेप

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अकोट:दि. २९ :** तालुकास्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धेचे आयोजन दिनांक २५ ऑगस्ट २०२५ ला तालुका क्रीडा संकुल ,अकोट येथे करण्यात आले होते त्यामध्ये सेंट पॉल्स अकॅडमीच्या विद्यार्थिनींचे तीन संघ विजयी झाले.

१४ वर्षे वयोगटातील संघामध्ये कृष्णाली नाथे ,ईश्वरी सिंगने, कादंबरी पर्वतकार ,सुरभी घुगे, तुलसी जेस्वानी ,श्रावणी पुंडकर ,परिधी चौधरी , मॉली मून धनश्री वानखडे ,नेहा रघुवंशी ,संस्कृती शेगोकार, समीक्षा राखुंडे, कृष्णाली पूंडकर, संजू बोडके, समीक्षा भारंबे, कनक वाडेकर या विद्यार्थिनींचा समावेश आहे . तर १७ वर्षे वयोगटातील संघामध्ये वेदिका जायले, समृद्धी हुतके ,विराई चोपडे, माही सोळंके, सृष्टी हुतके,अक्षरा चोटमल,अन्वेषा राजगुरू,आरुषी वालसिंगे ,सेजल शिंदे,आर्या वालके,समृद्धी डिक्कर,धनश्री घुगे ,काशी देठे ,तेजल विश्वकर्मा,अनुजा हरणे,सोनल फुलारी या विद्यार्थिनींचा समावेश आहे १९ वर्षे वयोगटांमध्ये दीपश्री महल्ले, ईश्वरी कुलट, हेतांसी इंगळे,माही चरेरे,तुष्मिरा वाघमारे,गौरी रहाटे,ओजस्वी देशमुख, राशी ठाकूर,चंचल अग्रवाल,श्रद्धा मेंढे,खुशी गुप्ता,अश्विनी मेंढे,भक्ति आष्टीकर,गायत्री गरकळ,गौरी मेटकर, आदित्य रेडे या विद्यार्थिनींचा समावेश होता.या तिन्ही संघांनी तालुकास्तरावर सॉफ्टबॉल स्पर्धेमध्ये दणदणीत विजय मिळविला.त्यांची जिल्हास्तरावर निवड करण्यात आली. त्यांच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.त्या आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे पदाधिकारी,मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना देतात तसेच क्रीडा प्रशिक्षक प्रणव देंडव यांना देतात.

## निधन वार्ता

### योगेश आग्रे



**अकोट :** ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांचे निष्ठावान कार्यकर्ते वंचित बहुजन आघाडीचे आसेगाव सर्कलचे अध्यक्ष योगेश आग्रे यांचे ह्रुदय विकाराने दिनांक २९ऑगस्ट २५ रोजी निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा आज दिनांक ३० ऑगस्ट २५ रोजी सकाळी ९ वाजता करवाडी येथील त्यांच्या राहत्या घरून निघेल.

भक्तिभाव | परिवाराचे परिसरात कौतुक

# वाढणकर परिवाराने साकारला 'ऑपरेशन सिंदूर' चा देखावा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**मंगरुळपीर दि. २९ :**विघ्नहर्ता गणरायाच्या ऊत्सवानिमित्य मंगरुळपीर येथील रुपेश वाढणकर आणी अर्चना वाढणकर यांनी पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारत सरकारने ऑपरेशन सिंदुर राबवले आणी शत्रुचा बदला घेतला.या मोठ्या संकटसमयीसुध्दा सरकारने आपल्या पाठीशी राहुन संकटहरणासाठी धैर्य दिले.या सर्व बाबीवरचा आकर्षक देखावा गणपती ऊत्सवानिमित्य वाढणकर परिवाराने साकारल्यामुळे त्यांचे परिसरात कौतुक होत आहे.

नुकत्याच झालेल्या २०२५ च्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २२ एप्रिल २०२५ रोजी २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर राष्ट्रीय तपास संस्थेने दहशतवाद्यांना मदत करणाऱ्यांवर कारवाई करत श्रीनगरमध्ये ६० हून अधिक ठिकाणी छापेमारी केली. पाकिस्तानमधील लष्कर-ए-तैयबा च्या दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या ओव्हर ग्राउंड वर्कर नेटवर्कचा शोध घेण्यात आला असून, या प्रकरणी दोन महिन्यांनंतर काही लोकांना अटक करण्यात आली आहे.हे मोठे संकट भारतावर ओढवले होते तरीही खचुन न जाता सरकारने ऑपरेशन सिंदुरच्या माध्यमातुन चोख प्रत्युत्तर दिले.

वाढणकर परिवाराने ऑपरेशन सिंदुरचा आकर्षक देखावा साकारत संकट टाळण्यासाठी गणपतीकडे साकडे घातले. गणेश चतुर्थीच्या निमित्ताने भक्त गणपतीला प्रार्थना करून संकटातून मुक्ती मागतात. गणेश पूजेने कष्ट दूर होतात आणि सौभाग्य वाढते असे मानले जाते असे मानतात. गणपती हा विघ्नहर्ता मानला जातो, जो आपल्या भक्तांचे संकट दूर करतो. म्हणूनच, कोणत्याही शुभ कार्याच्या सुरुवातीला गणपतीचे आवाहन केले जाते.भक्त गणपतीकडे मनोभावे प्रार्थना करून आपल्या अडचणी आणि संकटे दूर करण्याची मागणी करतात.अशीच मनोभावे प्रार्थना यामाध्यमातुन गणरायाकडे केली आहे.

# जिल्ह्यात ढगफुटीसदृश पाऊस, वीजपुरवठा खंडित

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा, दि. २९ :** गुरुवार, दि. २८ ऑगस्ट रोजी दुपारी ४ ते ५ वाजेच्या दरम्यान, अवघ्या तासाभरात ढगफुटीसदृश मुसळधार पावसाने कारंजा शहराला झोडपून काढले. या अचानक आलेल्या पावसामुळे शहरातील मुख्य रस्ते आणि गल्लीबोळ जलमय झाले. रस्त्यांवरून वाहणारे पाणी इतके होते की, अनेक रस्त्यांना नाल्यांचे स्वरूप आले होते. पाऊस



गुरुवारी दुपारी अचानक आलेल्या वादळी पावसामुळे कारंजातील के. एन. कॉलेज परिसरात एक मोठा वृक्ष थेट वीजवाहिन्यांवर कोसळला, परिणामी परिसराचा वीजपुरवठा पूर्णतः खंडित झाला. अचानक वीज गेल्याने नागरिक आणि व्यावसायिकांमध्ये मोठी अस्वस्थता निर्माण झाली. काही भागांत पावसाचे पाणी घरांमध्ये शिरल्याचीही माहिती असून, नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने मदतीची मागणी केली आहे. पावसाचा जोर एवढा होता की, वाहनधारकांना रस्त्याने मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागली. अनेक दुचाकी आणि चारचाकी वाहने पाण्यात बंद पडली. शहरासोबतच ग्रामीण भागातही या पावसाचा जोरदार फटका बसला आहे. शेतीतील उभ्या पिकांवर पाण्याचा मारा झाल्याने नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. दरम्यान, जोरदार पावसामुळे तालुक्यात काही ग्रामीण मार्गावरील वाहतूक ठप्प झाल्याने चालकांची तारांबळ उडाली होती पावसामुळे शहरात भीतीचे वातावरण पसरले होते. अशात खंडित झालेला वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रशासनाने तातडीने प्रयत्न सुरू केले. नागरिकांनी आवश्यकतेनुसार सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### नाल्याच्या पुरामुळे कारंजा मानोरा रोडवरील वाहतूक दोन तास ठप्प

**इंझोरी :** इंझोरी महसूल मंडळात १६ आगस्ट नंतर पुन्हा आज २९ ऑगस्ट रोजी ढगफुटी पाऊस आल्याने मंडळातील शेतकऱ्यांच्या उभ्या पिकासह बंधारे फुटल्याने शेकडो हेक्टर वरील शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. दरम्यान या ढग फुटी पाऊस आल्याने कारंजा मानोरा रोडवरील इंझोरी लगत असलेला नाल्याला मोठा पूर आल्याने सुमारे दोन तास वाहतूक बंद पडली पुराच्या पाण्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतामधील बांध फुटले असून शेकडो हेक्टर जमीन खरडून गेल्याचे निदर्शनास येत आहे मुसळधार पावसामुळे इंझोरी महसूल मंडळातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून या शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत मिळावी अशी मागणी शेतकरी करत आहे.

# उंबर्डा बाजार येथील कन्या शाळेला गळती



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**उंबर्डा बाजार, दि. २९ :** येथील जिल्हा परिषद कन्या शाळेला गळती लागल्याने शाळेतील शैक्षणिक साहित्य ही ओले झाले असून चार पैकी दोन वर्ग खोल्यांमध्ये सतत पाणी गळत होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययन करताना अडचणी निर्माण होत असून सदोष कामाचा फटका विद्यार्थ्यांनीसह शिक्षकांना बसत आहे.

जिल्हा परिषद कन्या शाळेला दरवर्षी गळती लागते. या शाळेत चार वर्गखोल्या असून नव्याने बांधकाम झालेल्या दोन वर्गखोल्या गळत असल्याने त्यामध्ये शिक्षकांसह विद्यार्थीनीना अडचण निर्माण झाली आहे. या शाळेत पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण घेर्णाया विद्यार्थीनी असून त्यांना अध्ययन करण्यात एक मुख्याध्यापकांसह दोन शिक्षक असल्याने शिक्षकांचीही अडचण आहे.इमारत गळतीमुळे शाळेतील ई-लर्निंगचे साहित्य, प्रोजेक्टर , एलसीडी व पंखे आदी साहित्य पावसाने भिजून गेले आहे. याबाबत कारंजा लाड गटशिक्षणाधिकारी यांना सुद्धा अवगत करण्यात आले होते पण दखल न घेतल्यामुळे ही वेळ आल्याचे समजते गेल्या काही दिवसापासून सतत च्या पावसामुळे सदर इमारतींच्या छताचे काही बरेवाईट झाल्यास यास सदर शिक्षण विभाग जबाबदार राहणार असल्याचे पालक मंडळी कडून समजते.

## महत्त्वाचे

### शासकीय वसतिगृहाची प्रवेश प्रक्रिया सुरू

**वाशीम :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत चालणाऱ्या मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, सवड (ता. रिसोड) येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, अपंग व अनाथ विद्यार्थी या प्रवेशासाठी पात्र आहेत. विशेषतः व्यावसायिक महाविद्यालयात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थी या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. प्रवेश अर्ज संकेतस्थळावर ऑनलाईन भरता येतील. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून संबंधित शासकीय वसतिगृह कार्यालयात ऑफलाईन सादर करणे आवश्यक आहे. शासनाकडून मिळणाऱ्या सोयी-सुविधांचा लाभ विद्यार्थ्यांना मिळावा, यासाठी विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ऋषिपंचमी निमित्त आ. डहाकेंची मंदिराला भेट



**मानोरा :** ऋषीपंचमी निमित्य दिनांक २८ ऑगस्ट रोजी धामणी (मानोरा) येथील श्री संत गजानन महाराज यांचे मंदिरास आमदार सई डहाके यांनी भेट देऊन दर्शन घेतले मंदिर व परिसराची पाहणी केली. यावेळी भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते महादेव ठाकरे, भाजपा तालुकाध्यक्ष अरविंद इंगोले, भाजपा पदाधिकारी राजेंद्र देशमुख, प्रवीण धोटे, कारंजा येथील बाबुरावजी देशमुख ,पत्रकार उपेंद्र पाटील ,गजानन पाटील,माजी सरपंच विश्वनाथ वैद्य व महिला मंडळी उपस्थित होत्या.

### नेत्रदानासाठी माळेगाव ग्रामपंचायतीचा सन्मान

**वाशिम :** नेत्रदानाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावल्याबद्दल माळेगाव (ता. वाशिम) ग्रामपंचायतीचा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. मागील दहा वर्षांत ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने तब्बल २४ नेत्रदाने पार पडली असून हा विक्रम जिल्ह्यात आदर्श ठरला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित सन्मान सोहळ्याला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. पराग राठोड आणि नेत्रचिकित्सा अधिकारी ज्ञानेश्वर पोटफोडे उपस्थित होते.

## लाचप्रकरणी महावितरणचा कर्मचारी जाळ्यात

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. २९ :** घराची वीजजोडणी करून देण्यासाठी चार हजार रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपावरून वाशिम शहर भाग १ महावितरण कार्यालयातील वरिष्ठ तंत्रज्ञ प्रवीण मुठाळ याच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली आहे. ही कारवाई २८ ऑगस्ट २०२५ रोजी करण्यात आली.

आरोपी लोकसेवक प्रवीण मुठाळ याने तक्रारदार, ग्राहक पांडुरंग दौलतराव लहाने, रा. सिव्हिल लाईन, वाशिम यांच्या घराची सिंगल फेज थ्री फेज विद्युतजोडणी करण्यासाठी तक्रारदाराकडे ८ ऑगस्ट २०२५ रोजी पंचांसमक्ष



पडताळणी दरम्यान चार हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. यावर लाचलुचपत विभागाने ९, २० व २५ ऑगस्ट दरम्यान सापळा रचला, मात्र मुठाळ यांना संशय आल्याने त्यांनी तक्रारदाराची भेट टाळली आणि लाच रक्कम स्वीकारली नाही. यावरून तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

## युवा प्रशिक्षणार्थी शिक्षक सहा महिन्यांपासून मानधनाविना

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २९ :** मागील सहा महिन्यांपासून थकलेले मानधन अद्याप मिळालेले नसल्याने मानोरा येथील शिक्षण विभागासाशी संबंधित युवा प्रशिक्षणार्थी शिक्षकांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून हे मानधन तात्काळ अदा करण्यात यावे, या मागणीसाठी आज (दि २६) युवा प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी गटशिक्षणाधिकारी यांना निवेदन सादर केले.

निवेदन सादर करते वेळी बहुसंख्येने युवा प्रशिक्षणार्थी शिक्षक उपस्थितीत होते. गेल्या अनेक महिन्यांपासून मानधन न मिळाल्यामुळे संबंधित युवा प्रशिक्षणार्थी शिक्षकांचे जीवन अडचणीत आले आहे. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह, घरभाडे, मुलांचे शैक्षणिक खर्च, कर्जाचे हप्ते, प्रवास खर्च आणि इतर दैनंदिन गरजा पूर्ण करण्यात मोठी अडचण निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत युवा प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी एकत्र येत आपली व्यथा निवेदनाच्या स्वरूपात गटशिक्षणाधिकारी यांच्यापर्यंत पोहोचवली. संबंधित युवा प्रशिक्षणार्थी शिक्षक मोठ्या संख्येने गटशिक्षणाधिकारी ह्यांच्या दालनात पोहचून आपल्या व्यथा त्यांच्या समोर मांडल्या . मानोरा गटशिक्षणाधिकारी अनिल पवार यांनी युवा प्रशिक्षणार्थी शिक्षकांचे म्हणणे ऐकून घेतले व विषय गांभीर्याने घेण्याचे आश्वासन दिले. निवेदन सादर करते वेळी वाशिम जिल्हा अध्यक्ष नितीन चगदळ, मानोरा तालुका अध्यक्ष धिरज ठाकरे, उपाध्यक्ष जयंत कडबे, सहसचिव संतोष थोरवे, अंकुश मनवर, तालुका सचिव अमोल साबळे ह्यांच्या सह वैभव नवरे, सुधीर इंगळे, संदिप कडबे, आकाश काटकर, हुजेफ खान, कांचन पवार, दीपाली गावंडे, दीपाली गाढवे, मेघा मेघे, रुपाली अस्वार, तेजस्विनी गावंडे, जनाबाई बोंबले, आदी युवा प्रशिक्षणार्थी शिक्षक निवेदन सादर करते वेळी उपस्थित होते.



> मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी शिक्षण विभाग पंचायत समिती बीआरसी केंद्र मानोरा येथे स्वातंत्र्य तांत्रिक सहाय्यक नसल्यामुळे सदर योजनेचा कार्यभार शा.पो.आ. तांत्रिक सहाय्यक ह्यांच्याकडे वर्ग केलेला आहे. दोन्ही विभागाची कार्यालयीन कामे सांभाळतांना आपले मानधन अदा करण्यास किंचित कलावधी लागला असेल आपल्या निवेदना नुसार संबंधित विभाग प्रमुख ह्यांची चौकशी करुन आपले रखडलेले मानधन त्वरित अदा करणे बाबत शासन स्तरावरून सूचना निर्गमित करू.
>
> **- अनिल पवार**
>
> गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती मानोरा

## शांतिसागरजी महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त कार्यक्रम

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा (लाड), दि. २९ :** कारंजा बघेरवाल मैत्री महिला मंडळाच्या वतीने दिनांक २५ ऑगस्ट सोमवार रोजी प.पू १०८ आचार्य श्री. शांतिसागरजी महाराज यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या धर्मसभेत पपू १०८ आचार्य श्री शांतीसागरजी महाराज यांचे प्रतिमेसमोर दीप प्रज्वलनानंतर बा.ब्र. भारतीदिदी यांचे आचार्य शांतीसागरजी महाराजांच्या जीवन चारित्र्यातील काही प्रसंगावर उद्बोधन झाले. महिला मंडळाच्या वतीने संयमाच्या मार्गावर अग्रेसर असणाऱ्या भारतीदींदीचा सन्मान करण्यात आला . तसेच श्री बालात्कार( गण) दिगंबर जैन मंदिरातील जिनवाणी संवर्धनाच्या कार्यात मोलाचे योगदान देणाऱ्या सर्वच कार्यकर्त्यांच्या वतीने प्रतिनिधिक स्वरूपात प्रफुलभाऊ आग्रेकर यांचा देखील सन्मान करण्यात आला. त्यानंतर मैत्री महिला मंडळाच्या वतीने व एकता भजनी मंडळ यांच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत बालकांचे नृत्य धार्मिक गीते व परम पूज्य १०८ श्री. शांतिसागरजी महाराजांच्या जीवन चरित्रावर पोवाडा सादर करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मैत्री महिला मंडळाच्या अध्यक्ष वैशाली खंडारे, प्रमुख अतिथी म्हणून बालब्रह्मचारी भारती दिदी, मंदिर समितीचे सचिव उज्वल रायबागकर कारंजा शाखेचे अध्यक्ष राजेंद्र खंडारे, स्पर्धेचे परीक्षक कवीश गहाणकरी व वाकडे सर उपस्थित होते. या सर्व मान्यवरांच्या हस्ते खालील यशस्वी स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले. रक्षाबंधन पर्वा निमित्त आयोजित शास्त्र सजावट स्पर्धा व शुभ लाभ हँगिंग स्पर्धा खुला गट शास्त्र सजावट विजयी स्पर्धक अवंती चवरे, सायली नांदगावकर, सरोज हरसुले प्रोत्साहनपर बक्षीस शास्त्र सजावट जयश्री जोहरापूरकर, शितल रुईवाले,खुला गट शुभ लाभ वॉल हैंगिंग, सायली नांदगावकर,अवंती चवरे,दीपल नांदगावकर,बालगट शास्त्र सजावट स्पर्धा आराध्या रुईवाले ,अनुदेश जोहरापूरकर बालगट वॉल हैंगिंग स्पर्धा इशा गहाणकरी,विराज चवरे. ७७ स्पर्धकांनी ग्रंथांची उत्तम सजावट केली होती त्याचप्रमाणे शुभ लाभ वॉल हैंगिंग ही आकर्षक व सुंदर होते.

## शेकडो युवकांचा भारतीय जनता पार्टीत प्रवेश

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. २९ :** वाशीम ग्रामीण भागातील विविध गावांमधील कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या कार्यपद्धतीवर व नेतृत्वावर दाखवलेला विश्वास व्यक्त करत मोठ्या संख्येने पक्षप्रवेश केला.




गोपाल गोटे (तोंडगाव), सतीश दुबे, रमेश पाचपिले, प्रल्हाद गावंडे, गणेश महादेव खलसे, गोपाल सुरेश चव्हाण, सोहन तोडकर, जयप्रकाश बिरले, कृष्णा तानाजी गवारे, सुनील महादेव गोटे, दत्ता रामकिसन गोटे, तेजस गुणवंत सरनाईक, दिलीप चंद्रकांत वाघमारे, किरण गजानन काकडे, मदन ज्ञानबा कव्हर, विठ्ठल ग्यानबा इंगोले, श्रीधरराव देशमुख, विठ्ठल गंभीरराव देशमुख, रामप्रसाद साहेबराव देशमुख, विजय सखाराम देशमुख, विठ्ठलराव दत्तराव देशमुख, सुधाकरराव श्रीपतराव देशमुख, भरतराव सोपान जाधव, संतोष ग्यानबा अरसोड, पवन कुमार उचितराव देशमुख, गजाननराव प्रभतराव देशमुख, गणेश नागेंद्र भारती, प्रवीण खांजोडे, राजेश भुसारे, राजेंद्र अशोकराव देशमुख, पवन पांडुरंग खंदारे, प्रशांत संतोष गोटे, गुरु प्रकाश भिसडे, महेश दत्ता भारती, प्रवीण संतोष गोटे, करण दत्ता जाधव, मुरलीधर एकनाथ गोटे, दत्ता खंदारे, निलेश वानखेडे, अजित बोराळकर, मनोज पाटणकर, अभिषेक सुनील भिसडे आदींनी या पक्षप्रवेश सोहळ्यात सहभागी होत भाजपचा झेंडा हातात घेतला. हा पक्षप्रवेश सोहळा वाशीम शहराध्यक्ष मनीष मंत्री यांच्या जनसेवा कार्यालयात, आमदार श्यामभाऊ खोडे यांच्या नेतृत्वाखाली, मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमास भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तमजी चितलांगे, तालुका अध्यक्ष एकनाथ कड पाटील, जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष प्रदीप देशमुख, शहर युवा मोर्चा अध्यक्ष स्वप्निल जाधव, प्रल्हाद गोरे मा तालुकाध्यक्ष, सुभाष नानवटे तसेच वाशीम ग्रामीणचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

भारतीय जनता पार्टी वरील वाढता विश्वास हा देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या कार्यपद्धतीवर दाखवलेल्या श्रद्धेचे द्योतक असल्याचे यावेळी वक्त्यांनी सांगितले.

**श्रद्धास्थान** | मराठवाडा आणि विदर्भाच्या सीमेवरील भक्तिसंगम

# अकराव्या शतकातील सिद्धिविनायक मंदिर

। सुरेश गिरी ।

**रिसोड, दि. २९ :** अकराव्या शतकात स्थापन करण्यात आलेले सिद्धिविनायकांचं गणपती मंदिर मराठवाडा आणी विदर्भाच्या सीमेवर असलेल्या वटवृक्षाच्या निसर्गरम्य परिसरात रिसोड तालुक्यातील व्याड येथे आहे. या ठिकाणी हेमाडपंथी मंदिरात दगडावर कोरलेली मनमोहक सिद्धिविनायकाची मुर्ती बघायला मिळते. हे गणेशाचं मंदिर भाविकाचे श्रद्धास्थान म्हणुन वाशिम जिल्ह्यात प्रसिद्ध आहे.

आकराव्या शेतकात महाराष्ट्रात मध्यवर्ती सत्ता आसलेल्या यादवांचा प्रधान असलेला हेमाद्री नावाचा एक अत्यंत हुशार तथा वास्तुकला विशारद आसा एक व्यक्ती होता. त्याने विकसीत



केलेली एक स्थापत्यशास्त्र त्यातून मंदिर निर्मिती करण्यात गेली. ती सर्व मंदिर ही हेमाडपंतथी मानली जातात. असे येथील वयवृध्द नागरिकांकडून बोलले जात आहे. रिसोड-वाशिम राज्य महामार्गावरील चिखली फाट्यावरून दक्षिणेस चार किलोमीटर अंतरावर व्याड नगरी हि बारा शिव व बारा मारुती म्हणून जिल्ह्यात प्रसिद्ध असून येथे असेच एक सिद्धिविनायक गणेशाचं जागृत देवस्थान आहे. येथे प्राचीन कालीन हेमाडपंतथी मंदिर आहे. ह्या मंदिराला कुठे ही सिमेंट किंवा चुना वापरण्यात आला नसुन खुप मोठ्या कोरलेल्या दगडी शिळा एकमेकांवर ठेवुन या मंदिराची निर्मिती केली गेली या मंदिरात चार फूट उंच श्रीं सिद्धिविनायक गणेशाची अखंड दगडावर कोरलेली मनमोहक शेदुरललांटीत सिद्धिविनायक गणेशाची मूर्ती असून जिल्ह्यातील एवढी मुर्ती कुठेही नसल्याचे भाविकांकडून बोलले जाते.

व्याड नगरीचे श्रद्धास्थान म्हणून जिल्ह्यात प्रसिद्ध असलेल्या सिद्धिविनायक गणेशाचं दर्शनासाठी मराठवाड्यातील हिंगोली, नादेड, परभणी आणी विदर्भातील वाशिम, आकोला,बुलढाणा सह ईतर ठिकाणाहून भाविक दर्शनासाठी येत असतात हा सिद्धिविनायक गणपती नवसाला पावतो जे काही भाविकाचं मनोरथ आहे भाविकाचं पुर्ण करतो त्यमुळे भाविक सिद्धिविनायकाच्या नतमस्तक होतात. सद्या या सिद्धिविनायक गणेश मंदिराचे व्यावस्थापन गावातील सर्व तरुण वर्ग पाहतात. या सिद्धिविनायक मंदिरात दर गुरुवार, मंगळवार दिवशी सकाळ सायंकाळ आरती करण्यात येत तर दर संकट चतुर्थी व गणेशोत्सवात दहा दिवस सांप्रदायिक भजन-कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. यावेळी भाविकांची नवस फेडण्यासाठी व दर्शनासाठी मोठी गर्दी असते.

> हा सिद्धिविनायक भाविक भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणारा गणपती आहे. या सिद्धिविनायकाच्या दर्शनासाठी भाविक विदर्भ आणि मराठवाड्यातुन दर मंगळवार, गुरुवार संकट चतुर्थ दिवशी दर्शनासाठी येतात. सिद्धिविनायक गणपती हा नवसाला पावनारा गणपती आहे. चतुर्थ आणी गुरुवार या मंगळवार या दिवसी नेहमी येथे भाविकांची दर्शन गर्दी असते.
>
> **- सुनिता गजानन सपकाळ**

> व्याड नगरीचे श्रद्धास्थान म्हणून सिद्धिविनायक मंदिराची महाराष्ट्रात ओळख आहे. या सिद्धिविनायकाच्या दर्शनासाठी भाविकांची नेहमीचं गर्दी आसते
>
> **- शोभा प्रभाकर डांगे**

## नुकसानापोटी शेतकऱ्यांना सव्वा कोटीची गरज

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. २९ :** जिल्ह्यात जुलै महिन्यात पिकाचे अतोनात नुकसान झाले. या पिकाचे पंचनामे प्रशासनाने पूर्ण केले आहेत. त्यानुसार बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाकडून १ कोटी ७३ लाख ६९ हजार ४३० रुपयांच्या निधीची गरज आहे. आता हा निधी मंजूर कधी होणार आणि खात्यावर जमा कधी होणार, असा प्रश्न बाधित शेतकऱ्यांना पडला आहे.जिल्ह्यात यंदाच्या पावसाळ्यात जून आणि जुलै अखेर अतिवृष्टीने हजारो हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले. या संकटातून शेतकरी सावरत नाहीत तोच ऑगस्ट महिन्यातही अतिवृष्टीने कहर केला. त्यामुळे पूर्वी झालेल्या नुकसानापोटी शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळणे अपेक्षित आहे. प्रत्यक्ष महिना उलटला तरी शेतकऱ्यांना जुलै महिन्यातील पीक नुकसानाची मदत अद्याप मिळालेली नाही. प्रशासनाने या नुकसानाचा अंतिम अहवाल तयार केला आहे. त्यानुसार जुलै महिन्यात २२ ते २४ तारखेदरम्यान मंगरूळपीर, रिसोड आणि मालेगाव या तीन तालुक्यांत अतिवृष्टीने एकूण २ हजार १५ हेक्टर क्षेत्रातील खरीप आणि फळपिकांचे नुकसान झाले, तर १२.८० हेक्टर जमीनही खरडून गेली आहे. यानुसार बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाकडून १ कोटी ७३ लाख ६९ हजार ४३० रुपयांच्या निधीची गरज आहे. ही मदत मिळणार केव्हा, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.जुलैच्या अखेर जिल्ह्यातील तीन तालुक्यांना अतिवृष्टीचा फटका बसल्यानंतर ७ ते ९ ऑगस्टदरम्यान मानोरा आणि रिसोड तालुक्याला पुन्हा अतिवृष्टी झाला.

अजिंक्य भारत •
आपलं अकोला / वाशिम
अकोला, शनिवार, दि.३० ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com


# कंझरा येथील महिला वाहून गेली

## नदीच्या पाण्याचा प्रवाह अचानक वाढला | मृतदेह शोध मोहिमेला सुरूवात

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मुर्तीजापुर, दि. २९ :** तालुक्यात झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे कमळगंगा नदीला पूर आला आहे. यामध्ये ३४ वर्षीय शेतमजूर महिला शेतातून घराकडे परत येताना नदीच्या पाण्याचा प्रवाह अचानक वाढला आणि या पाण्यात ती महिला वाहून गेल्याची घटना घडल्याने परिसरात खडबड उडाली आहे. या महिलेचा मृतदेह शोधण्यासाठी बचावं पथकाने शोध मोहिमेला सुरुवात केली आहे.

मुर्तीजापुर ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या कंझरा परिसरामध्ये आज सकाळपासून मुसळधार पाऊस झाला त्यामुळे कमळगंगा नदीला पूर आला आहे शेतात शेतमजुरी करण्यासाठी गेलेली रेखा रमेश मते ३४,मुलगी साक्षी मते हे



शेतातून शेतमजुरी करून परत येत असताना कमळगंगा नदीतून हे येत असताना

अचानक पाण्याचा प्रवाह वाढल्याने दोन्हीही मायलेकी वाहून गेल्या त्यामध्ये सुदैवाने मुलगी साक्षी हिने काटेरी झुडपाच्या सहारा घेत तिने आपले प्राण वाचवले मात्र आई रेखा ह्या पाण्याच्या प्रवाहामध्ये वाहून गेल्याची घटना ता.२९ रोजी दुपारी घडली आहे यासंदर्भात मुर्तीजापुरचे आमदार हरीश पिंपळे, तहसीलदार शिल्पा बोबडे, ठाणेदार श्रीधर गुट्टे, दीपक कानडे, ज्यांच्या माहितीवरून कुरणखेड येथील वीर भगतसिंग आपत्कालीन शोध व बचाव पथक विजय माल्टे, शाहबाज शहा,मोहन वाघमारे, उमेश माल्टे,अक्षय मोरे, शुभम दामोदर,शेख वसीम, दिनेश श्रीनाथ, जवान कमळगंगा नदीमध्ये वाहुन गेलेल्या महिलेचा शोध घेत आहेत यावेळी घटनास्थळी पोलिस पाटील जितेंद्र लांडे, उपस्थित आहेत.

## महत्त्वाचे

### तुकाराम महाराज मंदिर कार्यालयाच्या कामाला सुरुवात !



**वाडेगाव:** येथे संत तुकाराम महाराज विश्वस्त मंडळाच्यावतीने जगद्गुरु संत तुकाराम महाराज मंदिर व कार्यालयाचे दुसऱ्या मजल्याचे स्लॅबचे कामाला सुरुवात झाली ! यावेळी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.वासुदेवराव फाळके व मंडळाचे सर्व संचालक तसेच समाजातील सर्व उपस्थित होते.

मंदिर व कार्यालयाच्या बाबतीत संस्थापक अध्यक्ष यांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ! देह कष्टविती परोपकरा ! असे संत तुकाराम महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकून मार्गदर्शन केले व पुढील कार्यासाठी सर्व समाज बांधवांनी सहकार्य करावे असे आवाहन केले यावेळी समाजातील विविध क्षेत्रातील लोकं उपस्थित होते यामध्ये विशेष उपस्थिती म्हणून माजी जि.प. उपाध्यक्ष सुनील फाटकर, कोषाध्यक्ष नारायण सोनोने, सहसचिव डिंगांबर पाटीलखेडे, जेष्ठ समाज बांधव अरविंद महाले, ऍड. श्रीकांत ताले , अनंतराव फाटे ,पुरुषोत्तम ,राहणे , श्रीकृष्ण टाकळकर , दिलीप राहुडकार, मंगेश गोळे, श्रीकांत राऊत, अनिल बारबुदे, मंडळाचे सर्व विश्वस्त उपस्थित होते.

## गणेश दर्शन



विरशिवाजी गणेशोत्सव मंडळ छत्रपती संभाजी महाराज चौक अकोट



शिवकुलवंत गणेशोत्सव मंडळ बोर्डी

# इस्रायलमध्ये नोकरी करा; दीड लाखांचा पगार मिळवा!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम : दि. २९ :** महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नावीन्य विभागामार्फत वाशिम जिल्ह्यातील युवक-युवतींना परदेशात करिअर घडविण्याची एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. याअंतर्गत इस्रायलमध्ये जिल्ह्यातील सुशिक्षित युवक-युवतींना नोकरीची संधी मिळणार असून, दीड लाख रुपयांपर्यंत पगारही मिळणार आहे. राज्य शासनाच्या पुढाकारातून राज्यातील कुशल व नोकरीच्या शोधात असलेल्या युवक-युवतींसाठी इस्रायलमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील रोजगाराची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. भारत सरकार आणि इस्रायल सरकार यांच्यात झालेल्या कराराअंतर्गत होम बेस्ड केअरगिव्हर या क्षेत्रात काम करण्यासाठी पहिल्या टप्प्यात तब्बल ५ हजार पदांची भरती होणार आहे. हे सर्व रोजगार इस्रायलच्या नॉन वॉर झोन भागांमध्ये असतील. निवड झालेल्या उमेदवारांना १,५६,६८५ पर्यंत मासिक वेतन मिळू शकते. पात्र उमेदवारांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्तांनी केले.उमेदवाराचे वय २५ ते ४५ वर्षे असावे. त्याला इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असण्यासोबत त्यांच्याकडे काळजीवाहू-घरगुती सहायक सेवांसाठी निपुण, पारंगत, भारतातील नियामक प्राधिकरणाद्वारे मान्यताप्राप्त असलेले व किमान २९० तासांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र असावे. मिडवायफरीमधील प्रशिक्षण, संबंधित भारतीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली किंवा नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स असिस्टंटमधील प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे तसेच जीडीए, एएनएम, जीएनएम, बीएससी नर्सिंग, पोस्ट बीएससी नर्सिंगची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.अर्ज प्रक्रियेत अडचण आल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, वाशिम येथे थेट संपर्क साधता येईल.

# मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याची दवंडी देखावाच ठरली

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**तेल्हारा: दि. २९ :** शहरात मोठ्या प्रमाणावर मोकाट जनावरांचा मुक्तसंचार होत असल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे ही मोकाट जनावरे उघड्या घरांमध्ये प्रवेश करतात.त्यामुळे घरातील धान्य खाऊन पसार होतात तर हीच जनावरे रस्त्याच्या मधोमध ढिय्या मांडून बसतात.त्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा होतो. शाळकरी मुलांना सायकल घेऊन शाळेत जाताना मोठा त्रास होतो आहे.

ही जनावरे अचानकपणे उठून उभे होतात काही गुरे तर मुलांचा पाठलाग सुद्धा करतात त्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे तर काही ठिकाणी अपघातही झालेत त्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. ही बाब काही पत्रकार मंडळींनी हेरली आणि अनेक वृत्तपत्र, पोर्टलवर ह्या बाबतीत बातम्या झळकल्या त्यावर नगर परिषद प्रशासनाने तेल्हारा शहरात दवंडी पिटली की सर्व मोकाट जनावरांच्या मालकांनी आपल्या जनावरांचा दोन दिवसात बंदोबस्त करावा व आपली मोकाट जनावरे आपल्या घरी घेऊन जाण्याची सूचना देण्यात आली अन्यथा नगर परिषद योग्य ती कारवाई करेल अशी सूचना दवंडी द्वारे दिली होती. मात्र ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर बड्या लोकांचीच जनावरे असल्याने नगर परिषद प्रशासन कारवाई करेल काय? असा प्रश्न सुद्धा यावेळी उपस्थित करण्यात आला होता आणि शेवटी तेच झाले नगर परिषद प्रशासनाने मोकाट जनावरांवर किंवा त्या जनावरांच्या मालकांना कोणत्याही प्रकारची नोटीस बजावली नाही तर कोणतीच कारवाई केली नाही त्यामुळे नगर परिषद प्रशासन नागरिकांच्या आरोग्या बाबतीत किती सज्ज आहे? हे दिसून आले यामुळे नागरिकांमध्ये रोष व्यक्त करण्यात येत आहे.

### हिरपूर-सिरसो-साखरी मार्गावरील नाला धोकादायक



**हिरपूर (ता. मूर्तीजापूर) :**हिरपूर-सिरसो-साखरी मार्गे दर्यापूर व दुर्गवाडा येथे जाणारा मुख्य रस्ता मोठ्या नाल्यामुळे खचला असून, वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण झाला आहे. मुसळधार पावसाने नाल्यात प्रचंड पाणी वाहून गेल्याने रस्त्याच्या दोन्ही कडील कडे वाहून गेले आहेत. त्यामुळे वाहनधारकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असून, कधीही मोठा अपघात होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे.दररोज या मार्गावरून शालेय वाहने, दुचाकी, चारचाकी तसेच शेतमाल वाहून नेणारी वाहने जात असतात. परंतु रस्त्याच्या दोन्ही कडील भाग खचल्याने वाहतूक धोकादायक झाली आहे.

# सजल विहीर येथे ऋषिपंचमी निमित्त भक्तांचा जनसागर

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट: दि. २९ :** सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या अकोट ते पोपटखेड रोडवरील श्री संत गजानन महाराज सजल विहीर संस्थान शांतीवन अमृततीर्थ येथे गुरुवार भाद्रपद शुक्ल पंचमी रोजी संत गजानन महाराज समाधी सोहळा ऋषिपंचमी उत्सव मोठ्या भक्तीमय वातावरणात साजरा झाला.समाधी उत्सवानिमित्त श्रींच्या दर्शणार्थ सकाळपासून शांतीवन अमृततीर्थ परिसर येथे भक्तांच्या गर्दीने फुलून गेला होता. .संजीवन समाधी उत्सव सोहळ्यानिमित्त सकाळी सहा वाजता श्रींना अभिषेक,सकाळी सात वाजता आरती,सकाळी आठ वाजता श्रींच्या रजत मुखवट्याच्या पालखीची नगर परिक्रमा टाळ-मृदुंगाच्या व अभंगांच्या गजरात पार पडला. श्रींच्या दर्शनासाठी परीसरातिल हजारो भाविकांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली होती.त्यानंतर दहा वाजता विशाल महाराज बड यांचे हरी किर्तन पार पडले.सकाळी ११ वाजता श्रींची महाआरती संपन्न होऊन भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.दासगणु कथा मंडपात दुपारी चार वाजेपर्यंत महाप्रसाद वितरण अखंडरित्या सुरू होते.संत गजानन महाराज विहीर संस्थान येथील सजल विहीर व श्रींच्या रुपाचे दर्शन घेण्यासाठी सकाळपासून भक्तांच्या लांबचलांब रांगा लागल्या होत्या. श्रींच्या भक्तांनी यावेळी गण गण गणात बोतेअसा मंत्र जागर केल्याने विहीर परिसर चैतन्याने फुलून गेला होता.समाधी सोहळ्यासाठी मंदिर व विहीर परिसर आंब्याची पान,केळीचे खांब हार,फुले,पताका यांनी आकर्षकरित्या सजावट करण्यात आली होती.यावेळी विहिरीच्या दर्शनार्थ भाविक दूरवरून दाखल झाले होते.दुपारी चार वाजेपर्यंत अंदाजे २० हजाराच्यावर भाविकांनी श्रींचे दर्शन घेण्यासाठी हजेरी लावली असल्याची माहिती मंदिर समिती यांनी दिली आहे.

# कारंजा येथील खालच्या भागातील नागरिकांचा पावसाळ्यात कोंडमारा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**कारंजा : दि. २९ :** शहरातील माळीपुरा, डाफनीपुरा, बकरा कमेला, दिल्ली वेस, निजामपुरा, महात्मा फुले चौक, जुना सरकारी दवाखाना या खालच्या भागात राहणाऱ्या नागरिकांचा पावसाळा नेहमीप्रमाणेच यंदाही मोठ्या संकटाचे कारण ठरत आहे. फक्त १५ मिनिटांच्या पावसात स्वच्छतेचे नावापुरते काम केलेल्या नाल्या तुडुंब भरून वाहतात. नाल्यांमधील घाण रस्त्यावरून ओसंडून वाहते आणि परिसरात दुर्गंधी पसरते. त्यामुळे येथील नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो आहे.

या भागात ६ ते ७ शाळा असून, शाळेत जाणाऱ्या लहान मुलांनाही मोठा त्रास सहन करावा लागतो. रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे शाळेत जाण्या-येण्याचा मार्ग धोकादायक बनतो. पालकांमध्येही याबाबत चिंतेचे वातावरण आहे. शहरातील मॉनसूनपूर्व तयारी केवळ कागदावरच मर्यादित राहिली असून, घंटागाडीही ३-४ दिवसाआड येते, अशी नागरिकांची तक्रार आहे. दरम्यान, महात्मा फुले चौक ते दारव्हा नाका दरम्यानचा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून, हा मार्ग गुरु मंदिर, जैन मंदिर, जे. डी. चवरे, जे. सी. चवरे शाळांशी जोडलेला आहे. याच मार्गाने दरवर्षी १० ते ११ गणेश मंडळांची विसर्जन मिरवणूक निघते. मात्र नागरिकांनी वारंवार निवेदन दिले तरी नगरपरिषद प्रशासनाने अद्याप रस्ता दुरुस्त करण्यास दुर्लक्ष केले आहे. वर्षानुवर्षे सुरू असलेल्या या समस्यांमुळे हैराण झालेल्या नागरिकांनी नव्याने नियुक्त जिल्हाधिकारी आणि मुख्याधिकारी यांनी या प्रश्नांकडे लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## आराधना | चेहेल गावाची अखंड भक्तीधारा

# ६० वर्षांची परंपरा असलेला नवश्या गणपती

। फुलचंद भगत।

**मंगरूळपीर, दि. २९ :** गणेशोत्सव म्हणजे केवळ दहा दिवसांचा उत्सव नव्हे, तर अखंड श्रद्धेची आराधना आहे. हीच आराधना गेली साठ वर्षे अखंड प्रवाही ठेवली आहे मंगरुळपीर तालुक्यातील चेहेल गावाने.''एक गाव,एक गणपती'' या संकल्पनेचा दीप आजही या भूमीत तेजाने प्रज्वलित आहे.

सन १९६५. चौधरी घराण्यातील दोन तेजस्विनी स्व. साळुंकाबाई कळनाजी चौधरी (सासू) आणि श्रीमती द्वारकाबाई देवीदासजी चौधरी (सून) यांनी गणेशभक्तीची नवी ज्योत पेटवली.

घरातील लेकरू नंदाबाई पोलिओने अपंग झाली. वैद्यक शक्ती थकली, आशेचा किरण मंदावला. पण त्या मातृहृदयांनी श्रद्धेचा दीप पेटवला.त्यांनी नवस केला''आमच्या लेकराला चालता-बोलता येऊ दे, आम्ही गणपतीची मूर्ती





स्थापून तीन पाल्याच्या भंडारा करू.त्या नवसाला बाप्पाने कृपा दिली. लेकरू पायावर उभं राहिलं. आणि त्या क्षणापासून चेहेल गावात नवश्या गणपतीची अखंड परंपरा सुरू झाली.दरवर्षी गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवशी नवश्या गणपती बाप्पा पालखीतून वाजतगाजत गावात येतात. ढोल-ताशांचा गजर, टाळ-मृदंगांचा निनाद, दिंड्या पथकांचा उत्साह, आणि वारकऱ्यांच्या गजराने चेहेलचा प्रत्येक काना कोपरा दुमदुमतो.मूर्ती आसनावर विराजमान होताच गावकरी डोळे भरून दर्शन घेतात.मंदिरात श्रीमती द्वारकाबाई हात जोडून नतमस्तक होताना दिसतात. त्यांच्या मुखकमलावरचे समाधान हेच सांगते. श्रद्धेने सुरू केलेली परंपरा आज संपूर्ण गाव उजळवत आहे.

चेहेलमध्ये गणेशोत्सव दहा दिवसांनी मर्यादित नसतो.प्रत्येक संकष्ट चतुर्थीला भाविकांच्या रांगा लागतात.

गावाबाहेरूनही हजारो भाविक दर्शनासाठी येतात. महाप्रसादाच्या वेळी गाव भक्तांच्या महासागरात न्हाऊन निघते.एक गाव,एक गणपती हा लोकमान्यांचा विचार जिवंत लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव हा समाजाला एकत्र आणण्यासाठी सुरू केला.चेहेल गावाने हा विचार अक्षरशः जगवला आहे.आज अनेक गावांत गल्लोगल्ली गणपती बसतात, पण चेहेलने गेली साठ वर्षे एकच मंत्र पाळला.यामुळे गावात मतभेद नाहीत, गट-तट नाहीत. गावकरी ठामपणे म्हणतात.आपला बाप्पा एकच, आपली परंपरा एकच, आपली भक्ती एकच.

### नवश्या गणपतीची मूर्ती आजही शाडू मातीचीच

तीन पिढ्यांपासून एकाच मूर्तिकार घराण्याकडून ती आकारली जाते.ना वैभव, ना दिखावा. फक्त शुद्ध भक्ती, सेवा आणि परंपरेचं तेज.चेहेलच्या नवश्या गणपतीची परंपरा ही फक्त एका गावापुरती मर्यादित नाही.ही परंपरा सांगते की,ऊत्सव टिकवायचा असेल तर स्पर्धा नव्हे, तर एकता हवी.परंपरा जपायची असेल तर दिखावा नव्हे, तर श्रद्धा हवी.सासू-सुनेच्या नवसाने सुरू झालेला हा दीप आजही अखंड प्रज्वलित आहे.तो चेहेलला एकवटतो, समाजाला जोडतो आणि जगाला भक्ती व एकतेचा खरा मार्ग दाखवतो.

# केंद्रप्रमुख नामाभिधानास स्थगिती द्या : संघटनेची मागणी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम : दि. २९ :** शालेय शिक्षण विभागाकडून २१ ऑगस्ट रोजी पारित शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील केंद्रप्रमुखांचे नामाभिधान बदलून समूह साधन केंद्र समन्वयक असे करण्यात आले आहे. या बदलास केंद्रप्रमुखांनी तीव्र विरोध दर्शविला असून महाराष्ट्र राज्य केंद्रप्रमुख संघटनेने २८ ऑगस्ट रोजी शासनाकडे पत्रव्यवहार करून तात्काळ स्थगिती देण्याची मागणी केली आहे.संघटनेचे राज्याध्यक्ष अशोक महाले यांनी सांगितले की, संघटनेच्या अन्य पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत याबाबतचे निवेदन राज्य प्राथमिक शिक्षण संचालक, शालेय शिक्षण मंत्री तसेच प्रधान सचिवांकडे सादर करण्यात आले. नामाभिधानाचा निर्णय घेताना केंद्रप्रमुख संघटनेला विश्वासात न घेतल्याने नाराजी व्यक्त केली जात असून, केंद्रप्रमुखांना समन्वयक म्हणून डावलण्याचा प्रयत्न हा अन्यायकारक असल्याचे मत संघटनेकडून शासनाकडे मांडण्यात आले.१९९४ च्या शासन निर्णयानुसार १९९५ पासून केंद्रप्रमुख हे पद अस्तित्वात आले. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, साक्षरता आदी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्रप्रमुखांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### केंद्रप्रमुखांच्या इतर मागण्या

दरमहा प्रवास भत्ता लागू करणे, केंद्रप्रमुखांचा तांत्रिक सेवेत समावेश, वार्षिक अनुदानात वाढ, पदोन्नतीनुसार वेतनवाढ, दिवाळी व उन्हाळी सुट्टीतील कामासाठी मोबदल्यात अर्जित रजा रोखीकरण लागू करणे, आदी स्वरूपातील मागण्या करण्यात आल्यात.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

बुलडाणा, शनिवार, दि. ३० ऑगस्ट २०२५



**महत्त्वाचे**

## तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत देऊळगाव राजा हायस्कूलची चमु विजयी



**देऊळगाव राजा :** तालुकास्तरीय शालेय खो-खो क्रीडा स्पर्धेत १४ वर्षे वयोगटातून देऊळगाव राजा हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयातील मुलांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. शहरातील देऊळगाव राजा हायस्कूलमध्ये तालुकास्तरीय खो खो स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळांचे खेळाडू सहभागी झाले होते. १४ वर्षे वयोगटात खो-खो च्या अंतिम फेरीत देऊळगाव राजा हायस्कूलच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करत विरोधी संघाला पराभूत करत विजय संपादन केला. या विजयामुळे त्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या यशामुळे देऊळगावराजा हायस्कूल चा नावलौकिक उंचावला आहे. मुख्याध्यापक आर.बी.कोल्हे, उपमुख्याध्यापक बंड सर,पर्यवेक्षक जाधव सर व क्रीडा शिक्षक मुळे सर यांच्यावतीने विजेत्या खेळाडूंना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## मिशन परिवर्तन अंतर्गत रक्तदान शिबीर

**खामगाव :** बुलढाणा जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मिशन परिवर्तन ह्या अभिनव संकल्पनेतून शेगांव ग्रामीण पोलिस स्टेशन, पोलीस स्टेशन शेगाव शहर आणि पोलिस मित्र परिवार शेगांव तालुका यांच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. आओ लिखे मानवता की नई परिभाषा, रक्तदान कर दे जीवन को नई आशा या ओळीना अनुसरून शेगाव येथील पांडुरंग कृपा कुणबी समाज भवन येथे ३१ऑगस्ट रविवार रोजी सकाळी ९ वाजता अयोजित या रक्तदान शिबीरात नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करावे असे आवाहन शेगाव ग्रामीण पोलीस स्टेशन कडून करण्यात आले आहे. बुलढाणा जिल्हा पोलिस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मिशन परिवर्तन ह्या अभिनव संकल्पनेतून हा लोकोपयोगी उपक्रम संपूर्ण जिल्हाभरात राबविण्यात येत आहे

## हिंदी भाषा परीक्षेला प्रोत्साहनसाठी शाळांना पुरस्कार

**खामगाव :** खामगाव राष्ट्रभाषा पुस्तकालयाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे हिंदी भाषा दिवसानिमीत्य राष्ट्रभाषा प्रचार समिती वर्धा यांच्या माध्यमातुन हिंदी भाषा परिक्षा घेण्यात येते. या परिक्षेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग असणाऱ्या शाळांचा १४ सप्टेंबर २५ रोजी हिंदी भाषा दिनी सत्कार केला जातो. तरी शहर व तालुक्यातील शाळांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना हिंदी भाषा परिक्षेला बसवावे, असे आवाहन खामगाव राष्ट्रभाषा पुस्तकालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १५५१ - २२०० |
| गहू | २५५० - २६५० |
| तुर | ५७०० - ६५७५ |
| हरभरा | ३३०० - ६००० |
| सोयाबीन | ३६५० - ४६२५ |
| उडीद | ५१०० - ५१०० |
| मका | १९०० - १९०० |
| भुइमुग | ४५००-५१५० |
| बाजरी | १६०० -१८०० |
| तीळ | ८२५० - ८८०० |

# रासायनिक गुलालांची विक्री, साठणूक व वापरण्यास बंदी: जिल्हाधिकारी यांचे आदेश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२९ :** आगामी श्री गणेशोत्सव कालावधीत गुलालांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. रासायनिक गुलालाचा वापर केल्याने पर्यावरण व मानवी आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बुलडाणा जिल्ह्यात रासायनिक गुलालाचे उत्पादन, विक्री, साठवणूक व वापर करण्यास बंदी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे.

गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या रासायनिक गुलालामुळे पर्यावरण व मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. गुलालामध्ये लेड ऑक्साईड, कॉपर सल्फेट, क्रोमियम आयोडाईड, ॲल्युमिनियम ब्रोमाईट यांसारखी घातक रसायने वापरली जातात. यामुळे डोळ्यांना ॲलर्जी, किडनीचे आजार, अस्थायी अंधत्व, ब्रॉन्कीअल अस्थमा, कॅन्सर यांसारखे आजार होण्याचा धोका असून माती, पाणी व हवेत प्रदूषण वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर गणेशोत्सव शांततेत, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून तसेच पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा व्हावा यासाठी रासायनिक गुलालांची विक्री, साठवणुक व वापर करणाऱ्यांवर पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ नुसार आदेश जारी केले आहेत.




**आदेश याप्रमाणे :** बुलडाणा जिल्ह्यात रासायनिक गुलालाचे उत्पादन, विक्री, साठवणूक व वापर करणे कायमस्वरूपी बंदी, जिल्ह्यातील सर्व घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांना रासायनिक गुलालाची विक्री व साठवणूक करण्यास सक्त मनाई, पर्यावरणपूरक पर्याय म्हणून नैसर्गिक, हर्बल, जैविक गुलालाचा वापर करावा. बंदीचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापना, दुकाने वा व्यक्तींवर कारवाई करण्याचे अधिकार संबंधित पोलीस प्रशासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांना प्रदान करण्यात आले असून ते स्वतंत्र्यारित्या कारवाई करतील.

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ च्या कलम १५ नुसार कारवाई केली जाणार, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी आमदार सिद्धार्थ खरात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मेहकर दि.२९:** मेहकर चे आमदार सिद्धार्थ खरात यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती या विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०२० मधील नियम २८(१)(डब्लु) अन्वये दोन विधानसभा सदस्यांना सिनेटवर नियुक्त करण्याचा अधिकार विधानसभेचे अध्यक्ष यांना आहे. त्यानुसार विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकर यांनी आमदार सिद्धार्थ खरात यांची नियुक्ती संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती या विद्यापीठाच्या सिनेटवर केली आहे. विशेष म्हणजे आमदार सिद्धार्थ खरात हे मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण विभागात सहसचिव म्हणून कार्यरत असताना सन २०१५-१६ मध्ये पारीत झालेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या निर्मितीत त्यांचा महत्वाचा सहभाग राहिला आहे. या अधिनियमात विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत शिक्षण, उच्च शिक्षण, कौशल्य विकास शिक्षण, रोजगाराभिमुख शिक्षण इत्यादी संबंधी विस्तृत तरतुदी करण्यात आल्या आहेत. प्रत्यक्ष कायदा करणारा अधिकारी आमदार होऊन विद्यापीठ सिनेटवर आल्याने शिक्षण क्षेत्रात होणाऱ्या बदलाकडे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. आमदार सिद्धार्थ खरात यांच्या नियुक्तीमुळे त्यांचे विविध स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.

## अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट मदत द्या- तेजराव मुंडे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**देऊळगाव राजा दि.२९ :** तालुक्यात ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे सरसकट नुकसान झाले आहे.अशा शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत देण्याची मागणी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष तेजराव मुंडे यांनी केली आहे. अतिवृष्टीमुळे देऊळगावराजा तालुक्यात शेतात पाणी तुंबुन पिके पाण्याखाली गेली. ओढ्या नाल्यांना पूर येऊन जमिनी खरडून गेल्या त्यामुळे तालुक्यात सरसकट नुकसान झाले, पालकमंत्र्यांनी पंचनामे करण्याचे आदेश दिले. परंतु कुठेही पंचनामे झाले नाही आणि अजूनही पाऊस चालूच आहे त्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट अतिवृष्टी नुकसान भरपाई देण्यात यावी अशा आशयाचे निवेदन मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांच्यामार्फत शेतकरी संघटनेच्या वतीने तालुका अध्यक्ष तेजराव मुंडे यांनी पाठवले निवेदन देतेवेळी तेजराव मुंडे. रामराव शिंगणे, गणेश दराडे किसन गिरी. रामा वायाळ अशोक सपकाळ आदी शेतकरी उपस्थित होते

## श्री शिवाजी महाविद्यालयात मेजर ध्यानचंद जयंती साजरी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मोताळा दि.२९ :** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित स्थानिक श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथे दिनांक २९ ऑगस्ट रोजी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ गजानन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली , क्रीडा विभाग अंतर्गत मेजर ध्यानचंद जयंती साजरी करण्यात आली.

या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गजानन जाधव होते.



प्राचार्य यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात विविध प्रकारचे खेळाचे महत्व सांगितले. मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. यावेळी विद्यार्थ्यांसाठी बुद्धिबळ स्पर्धा, कॅरम, हॉलीबॉल इत्यादी विविध प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते व विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. बॅडमिंटन स्पर्धेत मुलीमध्ये प्रथम क्रमांक तनवी विनोद काकर तर मुलामध्ये प्रथम क्रमांक प्रसाद संतोष बावस्कर, बुद्धिबळ स्पर्धेत मुलीमध्ये प्रथम क्रमांक मुस्कान आरिफ शेख , मुलामध्ये प्रथम क्रमांक संदेश विजय इंगळे यांनी मिळवला. विजेत्या स्पर्धकांचे मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे आयोजन क्रीडा विभाग प्रमुख प्रा. निलेश रहाटे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

## शिंदी येथील रस्त्याची दुरवस्था, सरपंच साधना खरात यांची निधीची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि.२९ :** शिंदी येथे ९ आणि १५ ऑगस्ट रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे गावातील आणि साखरखेर्डा ते शिंदी रस्त्यांची दुरवस्था झाली असून त्या कामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी शिंदी येथील सरपंच सौ साधना अशोक खरात यांनी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे केली आहे .

२७ ऑगस्ट रोजी मेहकर येथील केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेऊन सरपंच सौ साधना अशोक खरात यांनी शिंदी परिसरात झालेल्या अतिवृष्टीची माहिती अवगत करून दिली . शिंदी ते साखरखेर्डा गावातील रोड १२०० मिटर लांबीचा



असून या रोडचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून कॉंक्रिट रस्ता आणि दोन्ही बाजूला नालीचे बांधकाम करण्यात यावे. जे ने करून पावसाळ्यात पडणाऱ्या पाण्याला वहीवाट मिळेल. आणि रस्ता खराब होणार नाही. गावातील अंतर्गत रस्ते पावसामुळे आणि वाहणाऱ्या पाण्याचा ओघ वाढला होता. त्यामुळे गावातील रस्त्याची दुरवस्था झाली आहे. गावातील मुख्य रस्ते कॉंक्रिट टाकून पुर्ण करण्यात यावे, शिंदी गाव शिवारातील १२ शेत रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. अतिवृष्टीमुळे गावातील २८ घरांची पडझड झाली आहे. त्या कुटुंबाला पुन्हा निवारा मिळावा यासाठी सानुग्रह अनुदान देण्यात यावे.

अशी मागणी एका निवेदनाद्वारे सरपंच सौ साधना अशोक खरात यांनी केली आहे. ही कामे तत्काळ मार्गी लावण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना आदेश केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिले. सदर कामाचे ईस्टीमेट तयार करून त्याचा पाठपुरावा केला पाहिजे असे आदेशही त्यांनी दिले .

## अवैध दारूविरोधात एल्गार; पोलिस स्टेशनला महिलांचा ठिय्या

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.२९:** शहरातील तीन पुतडा, दसरा नगर, गणेश नगर परीसरात अवैध दारूविरोधात महिलांनी दि. २८ ऑगष्ट रोजी शेगाव पोलीस स्टेशन गाठून पोलीस प्रशासना विरुद्ध एल्गार पुकारून नाराजी व्यक्त केली पोलिस स्टेशनला महिलांचा ठिय्या आंदोलन करून दारू बंद करण्यात यावी याबद्दल प्रशासनाला पाढे गुरवले. येथील तीन पुतडा, दसरा नगर, गणेश नगर परीसरात काही नागरिक अवैरित्याा देशी दारू तसेच गांज्याची विक्री करतात त्यांची अवैध दारू विक्री पूर्णतः बंद करण्यात यावी अन्यथा जण आंदोलन कारण्याचा इशारा महिलानी दिला आहे. यावेळी ठाणेदार नितीन पाटील यांनी महिलांची समजूत काढून अवैध धंदे करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याने मोर्चा शांत झाला.



## गो. से.महाविद्यालयामध्ये विद्यार्थी संवाद

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२९ :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा विद्यार्थी संवाद उपक्रम (महाराष्ट्र दौरा) अंतर्गत, मा. यशवंत शितोळे, अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांचा बुलढाणा जिल्ह्यात दौरा झाला.

या दौऱ्यात सकाळी आठ वाजता गो. से. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथे माननीय यशवंत शितोळे सरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी विविध उपक्रमांची माहिती देत युवकांना करिअरविषयक मार्गदर्शन केले. मोबाईलचा उपयोग कसा करावा, किती वेळ करावा आणि त्यापासून दूर कसे राहावे याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर सर यांनी पाहुण्यांचं पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यावेळी मंचावर बुलढाणा जिल्ह्याचे समन्वयक डॉ. विद्याधर आठवर, महाविद्यालयाचे समन्वयक व कॉमर्स विभागातून करिअर संसद प्रमुख प्रा. अक्षय सिडाम, कला विभागातून प्रा. संदीप शिंदे, सभासद जिल्हा करिअर कट्टा संसद स्नेहा पिवळटकर तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी संसद सदस्य मुख्यमंत्री कु. धनश्री राजेश मिश्रा, नियोजन मंत्री जयगणेश एस. कनुकोलानू, कायदा व शिस्तपालन मंत्री सुमित आर. गावंडे, सामान्य प्रशासन मंत्री ओम प्रमोद दाते, माहिती व प्रसारण मंत्री कु. दिशा पैघन, उद्योजकता विकास मंत्री नागेश एस. मुंडे, रोजगार व स्वयंरोजगार मंत्री कु. गायत्री विनोद लहुडकर, कौशल्य विकास मंत्री हेमांशू जी. राठी, संसदीय काम काज मंत्री कु. निकिता रामेश्वर इंगळे, महिला व बालकल्याण मंत्री कु. प्राची मोहन तावळकर आणि सदस्य विशाल सुरेश पवार उपस्थित होते. या कार्यक्रमात सोलार टेस्टच्या विजेत्यांना मा. यशवंत शितोळे सरांच्या हस्ते सर्टिफिकेट व बक्षिसे प्रदान करण्यात आली. विजेत्यांमध्ये शारदा इंगळे आणि पल्लवी गजानन दाने यांचा समावेश होता.कार्यक्रमास डॉ. डी. एन. व्यास, डॉ. एम. एस. गायकवाड, प्रा. फाटे व सर्व महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

# नाट्य परिषदेच्या एकांकिका स्पर्धेत नामदेव पायरी अंतिम फेरीत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२९ :** अ. भा. नाट्य परिषदेच्या एकांकिका स्पर्धेत अकोला केंद्रावर पार पडलेल्या प्राथमिक फेरीत येथील नामदेव पायरी एकांकिकेची अंतीम फेरीसाठी निवड झाली आहे. परीषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी हा निकाल जाहीर केला. येथील अक्षरदेह नाट्यकला संस्थेतर्फे नामदेव पायरी नाट्यसंघातील कलावंत व तंत्रज्ञांचा सत्कार करण्यात आला.

अकोला येथील आर एल टी सायन्स महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात २३ व २४ ऑगस्ट रोजी अ.भा. नाट्य परिषदेच्या एकांकिका स्पर्धेत प्राथमिक फेरीत १९ नाट्यसंघांनी सहभाग घेतला होता. नियमानुसार दोन एकांकिकांची अंतीम फेरीसाठी निवड करण्यात आली. यामध्ये बुलढाणा येथील वसंतलक्ष्मी बहुउद्देशीय संस्थेने सादर केलेल्या रवींद्र इंगळे चावरेकर लिखित व विजय सोनोने दिग्दर्शित नामदेव पायरी या एकांकिकेचा समावेश आहे. नाट्य परिषदेचे अध्यक्ष तथा सुप्रसिद्ध सिने व नाट्य अभिनेते प्रशांत दामले यांनी २५ ऑगस्ट रोजी संध्याकाळी हा निकाल जाहीर केला.

नामदेव पायरीमध्ये प्रसिद्ध अभिनेते गणेश देशमुख व प्रसाद दामले यांची प्रमुख भूमिका होती. यंदा जिल्ह्यातून सहा एकांकिका स्पर्धेत उतरल्या होत्या. मात्र नामदेव पायरीने बाजी मारली. या विजेत्या संघातील सर्व सहभागी सदस्यांचा सत्कार समारंभ अक्षरदेह नाट्यकला व बहुउद्देशीय संस्थेतर्फे २६ ऑगस्ट रोजी समर्थ एज्युकेशनच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. संस्थेचे अध्यक्ष शशिकांत इंगळे, सचिव संतोष पाटील, उपाध्यक्ष शैलेश वारे, सहसचिव विलास मानवतकर यांनी नाटकाचे दिग्दर्शक विजय सोनोने, कलावंत सिने व नाट्य अभिनेते गणेश देशमुख, प्रसाद दामले, नेपथ्यकार पराग काचकुरे यांचा शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. यावेळी अभिनव क्रीएटीव्ह गृपतर्फे जयंत दलाल व अर्चना जाधव यांनी पुष्पगुच्छ देऊन विजेत्याा संघाचा सत्कार केला. माणुसकी मल्टीपर्पज फाऊंडेशनतर्फे आनंद संचेती यांनीही विजेत्या संघाचा सत्कार केला. यावेळी जयंत दलाल, आनंद संचेती, संतोष पाटील, अर्चना जाधव व विजय सोनोने यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शशिकांत इंगळे यांनी केले तर विलास मानवतकर यांनी आभार मानले.

कार्यक्रमाला शहरातील नाट्यकर्मी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. दुर्गासिंग जाधव, नाट्यकर्मी गणेश राणे, सौ. रुचिरा पाटील, सौ. सुरेखा इंगळे, मृणाल सावळे, सृजन इंगळे यांनी परीश्रम घेतले.






महत्त्वाचे

## गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केली साफसफाई



**खामगाव :** स्थानिक सिव्हील लाईन भागातील नुकतेच सिमेंट रस्ता काम करण्यात आले आहे. परंतु मुरूमाचे ढिगारे अस्ताव्यस्त पडलेले आहे. मोठ्या विहीरीजवळील एकता नवयुवक दल गणेशोत्सव मंडळाच्या मंडपा भोवती मुरूमाचे ढिगारे पडुन आहेत. याबाबत मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधीत ठेकेदाराला वारंवार सांगुनही मुरूमाचे ढिगारे उचलण्यात आले नाही. यामुळे भाविकांची गैरसोय होत आहे. तसेच दुचाकी वाहने स्लिप होऊन अपघात होत आहेत. याकडे न.प.ने लक्ष द्यावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडुन करण्यात आली आहे. तर ढिगाऱ्यामुळे हापशीचे पाणी मंडपात जात आहे. त्यामुळे मंडपात पाणी साचले होते. एकता गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मंडपातील साचलेले पाणी काढून साफसफाई केली होती.

## अखेर शहराचा पाणीपुरवठा सुरू

**खामगाव :** खामगाव घाटपुरी नाका भागातील शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य पाईपलाईन नादुरूस्त झाली होती. त्यामुळे शहराचा पाणीपुरवठा मागील ७ दिवसांपासून बंद होता. त्यामुळे नागरिकांना पाण्यापासून वंचित राहावे लागत होते. शहराचा पाणीपुरवठा कधी सुरू होणार? याकडे नागरिकांचे लक्ष लागले होते. तर न.प. पाणीपुरवठा सुपरवायझर सुरजसिंह ठाकुर यांच्या मार्गदर्शनात पाईपलाईन दुरूस्तीचे काम सुरू होते. अखेर पाईपलाईन दुरुस्त होऊन आज २९ ऑगस्ट २५ रोजी पहाटेपासून पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. रोटेशन नुसार वामन नगर टाकीवरील बोबडे कॉलनी, शंकर नगर आदी भाग तर घाटपुरी टाकीवरून फरशी, भुसारा, सिव्हील लाईन, टापरे नगर आदी भागाचा पाणीपुरवठा आज पहाटे ५.३० वा. च्या सुमारास सुरू करण्यात आला आहे, अशी माहिती सुरजसिंह ठाकुर यांनी सांज दै. लोकोपचारशी बोलतांना दिली.

## नरेंद्रजी बोबडे पतसंस्थेची आमसभा संपन्न



**खामगाव :** बाबासाहेब उपाख्य नरेंद्रजी बोबडे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. (२.नं.८६२) खामगावची वार्षिक आमसभा २४ ऑगस्ट २५ रोजी सकाळी ११ वाजता संस्थेच्या कार्यालयात संपन्न झाली. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष रमेशचंद्र टिकमदासजी राठी तर प्राधिकृत अधिकारी म्हणुन सहा. निबंधक सहकारी संस्था कार्यालयाचे जी. आर. दहिमाते उपस्थित होते. यावेळी रमेशचंद्र राठी यांनी अहवाल वाचन केले. तसेच संस्थेच्या उपक्रमांबद्दल माहिती दिली. तसेच सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेण्यात आला व सभासदांना भेटवस्तु देण्यात आली. सभेला उपाध्यक्ष प्रशांत नरेंद्रजी बोबडे, ज्येष्ठ सदस्य अशोक झुनझुनवाला, सुभाष शंकरराव बोबडे, शैलेंद्र मोहता, प्रकाश तांबट, विजयकुमार गव्हाळे, अशोकभाऊ सोनोने, सौ. आशा महर्षी व सभासद उपस्थित होते. प्रास्ताविक विजयकुमार गव्हाळे तर आभार प्रदर्शन प्रशांत बोबडे यांनी केले. सभेच्या यशस्वीतेसाठी कर्मचारी व संग्राहक यांनी परिश्रम घेतले. चहापानाने सभेची सांगता झाली.

# मलकापूर रेल्वे स्थानकावर प्रवाशांचा उद्रेक

## आर.सी.सी. भिंतीमुळे नागरिक त्रस्त, तातडीने गेट व बुकिंग विंडोची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**आमदार चैनसुख संचेती यांना प्रवाशांच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले असून त्यांनी तातडीने मार्ग काढण्याचे आश्वासन दिले आहे. यामुळे नागरिकांना तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी लवकरच ठोस तोडगा न निघाल्यास प्रवाशांच्या वतीने मोठे आंदोलन उभे राहील आणि रेल रोको करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.**

**मलकापुर दि.२९ :** मलकापूर रेल्वे स्थानक परिसरात प्रवाशांच्या गैरसोयींवरून शनिवारी तीव्र आंदोलनाची चिन्हे दिसून आली. स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्र. २ च्या बाजूला उभारण्यात आलेल्या मोठ्या आर.सी.सी. भिंतीमुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.

पंतनगर, एकतानगर, हाश्मी नगर, कुंड खुर्द, भालेगाव, देवधाबा, धरणगाव, नरवेल, म्हैसवाडी, अनुरावाद, झोडगा, धुपेश्वर, दसरखेड, तालसवाडा, रुईखेड, तिघरा, शिवनी, रणगाव आदी गावांतील नागरिक रोजंदारीने मलकापूर स्थानकातून प्रवास करतात. परंतु आर.सी.सी. भिंतीमुळे या भागातील प्रवाशांना स्थानकात थेट प्रवेश न मिळता तब्बल दोन किलोमीटरचा फेरा मारावा लागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांपासून शेतकरी, महिला, कामगार सर्वसामान्य प्रवाशांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. या पार्श्वभूमीवर समतेचे निळे वादळ संस्थापक अध्यक्ष भाई अशांत वानखेडे यांच्या नेतृत्व मोठ्या संख्येने प्रवाशांनी एकत्र येत निवेदन सादर केले.

**प्रवाशांच्या दोन प्रमुख मागण्या :** १ प्लॅटफॉर्म क्र. २ वरील भिंतीत तातडीने मोठे गेट उभारावे, जेणेकरून नागरिकांना सोयीस्कर प्रवेश मिळेल. २ प्लॅटफॉर्म क्र. २ वर स्वतंत्र बुकिंग विंडो उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून प्रवाशांना अनावश्यक धावपळ टाळता येईल. या मागण्या तातडीने पूर्ण न झाल्यास लोकशाही मार्गाने मोठे आंदोलन उभारावे लागेल तसेच थेट रेल रोको करण्यात येईल, असा इशारा प्रवाशांनी दिला आहे. निवेदन मलकापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार चैनसुख संचेती यांच्यामार्फत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पाठविण्यात आले आहे. त्याची प्रत केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे व विभागीय रेल्वे व्यवस्थापक, भुसावळ यांनाही देण्यात आली आहे.

यावेळी निवेदन देण्यासाठी एन. के. हिवराळे, सतीश नाईक, किशोर रोडे, निखिल चीम, संजय रोडे, दीपक मेश्राम, समाधान सुरवाडे, शिवाजी भोसले, रोहीत माहूरे, पंकज पालवे, दीपक मोरे, मिलिंद हिवराडे, सिद्धार्थ भालशंकर, रोहन भालशंकर, सचिन तायडे, प्रवीण नाईक यांच्यासह शेकडो महिला-पुरुष प्रवासी या वेळी मोठ्या संख्येने हजर होते.

# हमीभाव दराने ज्वारी खरेदी तातडीने सुरू करा; शेतकऱ्यांची माजी आ. सानंदा यांच्याकडे मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगाव दि.२९ :** बुलडाणा जिल्ह्यातील बंद पडलेली शासकीय हमीभाव दराने ज्वारी खरेदी पुन्हा सुरू करावी, अशी मागणी खामगाव व शेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांचेकडे २८ ऑगस्ट रोजी निवेदनाद्वारे केली.

या निवेदनाची तात्काळ दखल घेत माजी आमदार सानंदा यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ तसेच उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री अजित पवार यांना शेतकऱ्यांच्या मागणीची माहिती दिली. शेतकऱ्यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, खामगाव व शेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी हमीभाव ज्वारी खरेदी योजनेत नाव नोंदवलेले असूनही शासनाने अचानकपणे खरेदी केंद्र बंद केल्यामुळे नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. बुलडाणा जिल्ह्यात ज्वारी खरेदी केंद्रे सुरू होण्यास तब्बल दीड महिना उशीर झाला होता. त्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी टेकाळे यांना २५ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ अटक झाल्याने संपूर्ण जिल्ह्यातील खरेदी प्रक्रिया १५ दिवसांसाठी बंद झाली. परिणामी अनेक शेतकरी हमीभाव दराचा लाभ घेऊ शकले नाहीत. सध्या खुल्या बाजारात ज्वारीला १७०० ते १८०० रुपये प्रति क्विंटल दर मिळत असताना शासनाचा हमीभाव दर ३३७१ रुपये प्रति क्विंटल आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे सुमारे १५०० रुपये प्रति क्विंटल नुकसान होत असल्याचे निवेदनात नमूद आहे. यामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी बंद पडलेली ज्वारी खरेदी किमान १५ दिवसांसाठी पुन्हा सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांनी ही मागणी राज्य सरकारदरबारी पोचवून शेतकऱ्यांना दिलासा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही या निवेदनात म्हटले आहे.

# सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पस शेगाव येथे 'राष्ट्रीय क्रीडा दिन' साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**खामगाव दि.२९:** सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पस, शेगाव येथे वसुंधरा बहुउद्देशीय सामाजिक संस्था, खामगाव संचालित महाविद्यालयात 'राष्ट्रीय क्रीडा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. भारताचे हॉकी सम्राट मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी हा दिन साजरा केला जातो. संस्थेचे अध्यक्ष सागर भाऊ फुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन झाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंत कुलकर्णी यांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. प्रा. ज्ञानेश्वर फुंडकर यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व, शिस्त, आत्मविश्वास आणि संघभावना याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर योगा, धावण्याच्या शर्यती, कबड्डी, खोखो, रस्सीखेच, लिंबू चमचा, लगोरी अशा विविध खेळ स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच 'फिट इंडिया' या तीन दिवसीय क्रीडा स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. या यशस्वी उपक्रमासाठी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाबद्दल उपाध्यक्ष तथा राज्याचे कामगार मंत्री नामदार आकाश फुंडकर यांनी अभिनंदन केले.

# 'व्हॉइस ऑफ देवेंद्र': राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि.२९:** ''विकसित महाराष्ट्र'' या विषयावर आधारित राज्यस्तरीय ''व्हॉइस ऑफ देवेंद्र'' वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त स्वारंभ फाउंडेशन, नाशिक प्रतिष्ठान आणि आय-फेलोज फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवला जात आहे.

घोषवाक्याशी सुसंगत, ही स्पर्धा केवळ बोलण्याची संधी नसून विचारांची स्पष्टता, आत्मविश्वास आणि नेतृत्व गुण प्रकट करण्यासाठी एक व्यासपीठ ठरणार आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक कोपऱ्यातील युवकांपर्यंत पोहोचून त्यांना सकारात्मक संवाद आणि कृतीशील नेतृत्वासाठी प्रेरित करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. स्पर्धेसाठी सहभागी होणाऱ्या युवकांनी २ ते ३ मिनिटांचा मराठी भाषणाचा व्हिडिओ संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच, हा व्हिडिओ वरील या हँडलला टॅग करून पोस्ट करणे अपेक्षित आहे. सहभाग पूर्णतः विनामूल्य असून, नोंदणीची अंतिम तारीख ९ ऑगस्ट २०२५ निश्चित करण्यात आली आहे. स्पर्धेचे मूल्यांकन भाषाशैली, आशयाची खोली, सकारात्मक दृष्टिकोन आणि नेतृत्वदृष्टी या निकषांवर केले जाणार आहे. विजेत्यांना मानाचा गौरव देऊन त्यांचे विचार व्यापक स्तरावर पोहोचवले जातील. या स्पर्धेमागे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे विचारप्रवण भाषण, प्रमोद महाजन यांची संवादकौशल्ये, अमित शाह यांची धोरणात्मक मांडणी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची थेट संवादशैली यांसारख्या आदर्शांचा प्रेरणास्त्रोत आहे. या उपक्रमाचे सहप्रायोजक म्हणून संदीप फाउंडेशन आणि सपकाळ नॉलेज हब यांचे सहकार्य लाभले आहे. स्पर्धेच्या आयोजनाची धुरा प्रशांत टोपे, सागर शेलार, सुयोग भवारे, विनायक राजगुरू, प्रथमेश नाईक, सिद्धेश्वर खैरनार आणि मिहीर महाजन यांनी सांभाळली आहे. राज्य समन्वयक मिहीर म हाजन यांनी आवाहन केले आहे की, ''महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयीन युवक-युवतींनी या स्पर्धेत सक्रिय सहभाग घ्यावा, आपले विचार निर्भयपणे मांडावेत आणि 'विकसित महाराष्ट्रा'च्या दिशेने योगदान द्यावे.''

# मुदतबाह्य मद्य विक्री करणाऱ्या दारूदुकानांवर कारवाई करा- संजय बगाडे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि.२९ :** दारू मुळे अनेकांचे घरे उध्वस्त झाली युवा पिडी बरबाद झाली इतकंच नाही तर काहींना दारू मुळे जीव ही गमवावा लागला अश्यात खामगाव येथील चौधरी दारू दुकान ला नियमाने आपल्या कडून दारू विक्री चा परवाना देण्यात आलेला आहे मात्र या ठिकाणी मुदत बाह्य दारू (बियर) विक्री होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आणि हा अतीशय गंभीर आहे जर मुदत बाह्य बियर (दारू) पिल्याने जर कुणाचे बरे वाईट झाले तर त्याची जबाबदारी कोण घेणार हा आमचा प्रश्न आहे त्यामुळे अश्या मुदत बाह्य बियर ची विक्री करणाऱ्या चौधरी दारू दुकानाचा परवाना रद्द करुन मालकावर कारवाई करण्यात यावी अशी आमची मागणी आहे मुदत बाह्य बियर विकणाऱ्या दुकानाचा परवाना रद्द झाला तर अनेकांचे आयुष्य बरबाद होण्यापासून वाचतील अश्या प्रकारचे निवेदन राष्ट्रवादी पक्षाकडून दारू बंदी विभाग खामगाव ला देण्यात आले असून जर मुदत बाह्य बियर ची विक्री करणाऱ्या चौधरी वाइन बार वर कारवाई झाली नाही तर आपल्या दारूबंदी कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी चे तालुकाअध्यक्ष संजय बगाडे यांनी दिला आहे यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. संतोष तायडे,गजानन धदरे, डॉ ज्ञानेश्वर रावणकर, आशिष ठाकरे, आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# विनयभंग प्रकरण मागे घेण्यासाठी दबाव

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**संग्रामपूर दि.२९ :** तालुक्यातील निवाणा गावात गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरवणारी धक्कादायक घटना घडली आहे. पोलीस स्टेशन तामगांव येथे दाखल तक्रारीनुसार, १२ आरोपींनी एकत्रित येत प्रज्वल सुभाष मोहे यांच्या नातेवाईकांच्या घरात घुसून त्याांना मारहाण केली व त्यांचा भाऊ ऋषीकेश सुभाष मोहे (वय २७) याची हत्याराने निर्घृण हत्या केली.

फिर्यादी प्रज्वल मोहे (वय २५, व्यवसाय शेती, रा. निवाणा, जि. बुलढाणा) यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी सोपान दिगंबर सोळंके याच्यावर असलेली विनयभंगाची केस मागे घेण्यासाठी दबाव टाकला. यावेळी आरोपींनी हातात हत्यारे घेऊन घरात शिरत ''ही केस मागे घ्या'' असा दम दिला. विरोध केल्याने त्यांनी मृतक ऋषिकेश मोहे याच्यावर प्राणघातक हल्ला करून ठार मारले. तसेच फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना देखील जीवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. या प्रकरणी तामगांव पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. २९२/२०२५ अंतर्गत कलम १८९(२), १८९(४), १९१(२), १९१(३), १९०, १०३(१), ११८(१), ३३३, ३५१(३) भा. दं. सं. २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गंभीर प्रकरणाचा तपास सपोनि राजेंद्र पवार यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. या घटनेमुळे निवाणा परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# खामगाव विसर्जन मिरवणुकीसाठी लकी ड्रॉ नुसार मंडळांचे क्रम निश्चित

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि.२९ :** गणेशोत्सवानिमित्त खामगाव शहरात मिरवणुकीची उत्साहवर्धक तयारी पूर्ण झाली आहे. यंदाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी लकी ड्रॉच्या माध्यमातून विविध गणेश मंडळांचे क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत. सदर लकी ड्रॉ पारदर्शकपणे काढण्यात आला.

मिरवणुकीची सुरुवात फारशी मेन रोडपासून होणार असून, पुढे भुसावल चौकातून मिरवणूक मार्गस्थ होईल. मिरवणुकीत विविध मंडळांनी आकर्षक देखावे, सजावट आणि भक्तिगीतांचा जल्लोष सादर करण्याची तयारी केली आहे. लकी ड्रॉ नुसार ठरलेले मंडळांचे क्रम पुढीलप्रमाणे आहेत : १. मानाचा लाकडी गणपति २. तानाजी गणेश मंडळ ३. हनुमान गणेश मंडळ ४. राणा गणेश मंडळ ५. वंदे मातर मंडळ ६. एकता गणेश मंडळ ७. मृत्युंजय गणेश मंडळ ८. जगदंबा गणेश (अशोक) ९. जय गजानन सुटालपूरा १०. जय संतोषी माँ ११. तेलगुराज गणेश मंडळ १२. चंदनशेष मंडळ १३. रामदल मंडळ १४. अमरलक्ष्मी मंडळ १५. दत्तगुरु गणेश मंडळ १६. श्रीकृष्ण मंडळ १७. स्वामी गणेश मंडळ १८. आदर्श मंडळ १९. जय बजरंग दल मंडळ २०. नेताजी गणेश मंडळ २१. वीर हनुमान गणेश मंडळ २२. जगदंबा गणेश मंडळ (सोनोने) २३. माँ आत्मशक्ती मंडळ २४. क्रांती गणेश मंडळ२५. त्रिशूल गणेश मंडळ २६. सिंधी गणेश मंडळ २७. जय भवानी मंडळ २८. राष्ट्रीय गणेश मंडळ

या मिरवणुकीत शहरातील नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असणार असून, वातावरणात भक्तिभाव, टाळ-ढोल-झांज आणि गुलालाचा जल्लोष अनुभवायला मिळणार आहे.

# आंदोलनाला यश : शिवसेनेच्या पुढाकाराने टोल कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि.२९:** शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बघे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनाला अखेर यश मिळाले असून टोल व हायवे मेंटेनन्स कर्मचाऱ्यांच्या सर्व मागण्या लेखी स्वरूपात मान्य करण्यात आल्या.

दि. १८ ऑगस्ट रोजी कर्मचाऱ्यांनी आपले मागणीपत्र सादर करून कामबंद आंदोलन छेडले होते. यानंतर सात दिवसांच्या मुदतीत मागण्या मान्य न झाल्याने आंदोलन सुरूच ठेवण्यात आले. अखेर २७ ऑगस्ट रोजी कंपनीने कर्मचाऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य करत लेखी स्वरूपात मागणी पूर्तता पत्र दिले. कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या व मान्यता : १. पगारात १,००० रुपयांची वाढ २. १२ तासांच्या ऐवजी १० तासांची ड्युटी ३. पगार दर महिन्याच्या १० ते २० तारखेपर्यंत नियमित देय ४. पीएफ व इन्शुरन्सची सुविधा लागू ५. सुरक्षा किट उपलब्ध ६. पगार पावती (स्लिप) देण्यात येणार ७. दर महिन्याला चार सुट्ट्या उपलब्ध पायलॉन कन्स्ट्रक्शन कंपनीकडून -५३ (अमागाई) टोल नाका तरोडा कसबा येथे कार्यरत कर्मचाऱ्यांना पूर्वी कोणत्याही सुविधा उपलब्ध नव्हत्या. कमी पगार, उशिरा मिळणारे वेतन, सुट्ट्यांचा अभाव, पीएफ-इन्शुरन्सचा अभाव, सुरक्षा किट नसणे अशा अनेक समस्यांमुळे कर्मचाऱ्यांनी आवाज उठवला होता. आंदोलनानंतर कंपनीला हे लक्षात घेऊन सर्व मागण्या मान्य कराव्या लागल्या. यावेळी तरोडा कसबा टोल नाका मॅनेजर वाघमारे, मेंटेनन्स मॅनेजर पाटील यांच्यासह शिवसेना शहरप्रमुख चेतन ठोंबरे, उपशहरप्रमुख भाऊबीडकर, तालुका व विभाग पदाधिकारी, तसेच कर्मचारी, डॉक्टर, सुपरवायझर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, शनिवार दि. ३० ऑगस्ट २०२५

## थोडक्यात

### शिरजगाव कसबा हद्दीत बालविवाह उघड

**शिरजगाव कसबा :** एका अल्पवयीन मुलीसोबत बालविवाह करून तिचे लैंगिक शोषण केल्याने ती गर्भवती राहिली. याप्रकरणी सरपंच यांच्या तक्रारीवरून एका युवकाविरूध्द शिरजगाव कसबा पोलीस ठाण्यात गुन्हा विविध कलमासह पोक्सो व बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला. विजय ब्रिजलाल कासदेकर वय २० असे गुन्हा दाखल झालेल्या युवकाचे नाव आहे. आठ ते नऊ महिन्यापूर्वी त्याने एका अल्पवयीन मुलीसोबत विवाह केला. शारीरिक संबंधानंतर मुलगी गर्भवती राहिली. तिला रूग्णालयात दाखल केल्याची माहिती आरोग्य विभागाला मिळाली होती. चौकशी केल्यानंतर बालविवाहातून हा प्रकार घडल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी पुढील तपास पोलीस करीत आहे.

### पत्नीचा विनयभंग करून पतीला धमकी

**चांदूरबाजार :** घरात शिरून विवाहित महिलेची छेडखानी करीत पतीला शिवीगाळ करून धमकी दिल्याची घटना स्थानिक पोलीस हद्दीत घडली. याप्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून शैलेश टेकाडे व प्रल्हाद टेकाडे यांच्याविरूध्द विविध कलमासह विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

### दानपेटी फोडून रोकड लंपास

**पथ्रोट :** येथील महादेव मंदिरातील दानपेटी एका संशयित युवकाने फोडून त्यातील अंदाजे २५ हजार रूपयांची रोकड चोरून नेल्याची घटना २६ ऑगस्ट रोजी मध्यरात्री दरम्यान घडली. याप्रकरणी राहूल दिनकर कडू वय ४३, रा. देवमाळी, परतवाडा यांच्या तक्रारीवरून गोलू दांडगे वय २२, रा. पथ्रोट या संशयित युवकाविरूध्द पथ्रोट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

### अडत दुकानातील लाखोचा ऐवज लंपास

**लोणी :** येथील संयोग ट्रेडर्स कार्यालयाचे कुलूप तोडून त्यातील १.१९ लाखांची रोकडसह संगणक साहित्य मिळून २.१९ लाखांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २६ ते २७ ऑगस्ट दरम्यान घडली. याप्रकरणी पुर्वेश देवडा रा. शेगाव नाका, अमरावती यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

### ट्रक क्लिनरचा मोबाईल लंपास

**माहुली जहांगिर :** रतन इंडियातून राख वाहतूक ट्रकवर क्लिनगर म्हणून कार्यरत जय गजानन जोंधळे याचा रेडमी कंपनीचा मोबाईल एकाने चोरून नेल्याची घटना २७ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी माहुली जहांगिर पोलीस ठाण्यात तक्रारीवरून संशयित सुरज भोसले याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास माहुली जहागिर पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली माहुली जहागीर पोलीस करीत आहे.

### कडप्प्याने मारून जखमी केले

**कुऱ्हा :** डोक्यात दगडी कडप्पा मारून एकाला गंभीर जखमी केल्याची घटना येथील चमननगरात २७ ऑगस्ट रोजी घडली. गजानन कमलाकर जडे वय ३४, रा. चमनगर असे जखमीचे नाव आहे. याप्रकरणी कुऱ्हा पोलीस ठाण्यात तक्रारीवरून अक्षय भोपळे, पंकज दारोकार व एक महिला यांच्याविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# कोट्यवधी खर्चूनही महामार्गाला भेगाचभेगा!

## राष्ट्रीय महामार्ग विभाग व खासदार, आमदार कुंभकर्णी झोपेत!





दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २९ :** अमरावती जिल्ह्यातील नांदगावपेठ मोर्शी वरूड पांढुर्णा पर्यंत नव्याने निर्माण करण्यात आलेल्या ९६ किलोमीटरच्या सिमेंट रस्त्याच्या राष्ट्रीय महामार्गाला अवघ्या चार ते पाच वर्षामध्येच अनेक ठिकाणी खड्डे व भेगा पडल्यामुळे नांदगावपेठ – पांढुर्णा राष्ट्रीय महामार्गाच्या कामातील दर्जावर प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहे.

> राष्ट्रीय महामार्ग विभाग व संबंधित कंत्राटदार यांना अनेक वेळा माहिती देऊन सुद्धा रस्ता दुरुस्तीचे काम करण्यास तयार नसून या गंभीर विषयावर जिल्ह्यातील एकही खासदार आमदार लोकप्रतीनिधी बोलायला तयार नाही ही शोकांतिका आहे त्यामुळे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या गंभीर प्रकाराची दखल घेऊन राष्ट्रीय महामार्ग विभाग व संबंधित कंत्राटदारावर कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.
>
> **रुपेश वाळके**
> **अध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस मोर्शी तालुका.**

नवीन राष्ट्रीय महामार्गावरील शेकडो पॅनलला खड्डे व भेगा पडल्या असल्यामुळे महामार्गावरील रोड खराब झाला आहे. नांदगाव ते पांढुर्णा महामार्गावरील खराब झालेला हा संपूर्ण रस्ता पुन्हा खोदून नव्याने रास्ता तयार करून या



महामार्गावरील मोर्शी येथील नळा नदीवरील अपूर्ण पुलाच्या कामामुळे व दापोरी येथील नदीवरील पुलाच्या अपूर्ण कामामुळे अनेक वाहनांचा अपघात होऊन मोठ्या प्रमाणात जीवित हानी होत असून नांदगाव मोर्शी वरूड पांढूर्णा



महामार्गावरील अर्धवट अपूर्ण असलेल्या धोकादायक पुलांची कामे तत्काळ पूर्ण करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

# बबलू देशमुखांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन व नागरी सत्कार सोहळा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अचलपूर, दि. २९ :** जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अचलपूर तालुक्यातील लोकप्रिय नेते मा. श्री. अनिरुद्ध ऊर्फ बबलूभाऊ देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य अभिष्टचिंतन व नागरी सत्कार सोहळा शुक्रवार, दि. 29 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 11 वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती, अचलपूर येथे आयोजित करण्यात आला होता

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार मा. बळवंतरावजी वानखेडे, प्रमुख अतिथी म्हणून हरिभाऊ मोहोड, राम चव्हाण, बाजार समिती सभापती प्रतिभाताई प्रशांत ठाकरे, उपसभापती अमोल चिमोटे, वासंतीताई मंगरोळे, डॉ. प्रताप किटूकले, लल्लू महाराज दीक्षित, विलास काशीकर, राजाभाऊ टवलारकर, प्रदीप सोनार, अश्विनीताई पेटकर, दयाराम काळे, प्रमोद दाळू, किशोर देशमुख, रावसाहेब लंगोटे,




पल्लवीताई वाटाणे,, अश्विनीताई मसने, बाजार समिती अचलपूर संचालक रवी पाटील, अमोल इंगोले, पोपट घोडेराव, भैया पाटील लहाने, सुधीर रहाटे, बाबुराव गावंडे, जिल्हा परिषद माजी सभापती बाळासाहेब हिंगणीकर, राहुल येवले, ज्ञानदेव पाटील, मुकदर पठाण, विलास पवार, वनमालाताई खडके,साईद मौलाना, मो. शाकीर हुसेन, अजीज खान, जिएम खान यांच्यासह काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी बबलूभाऊ देशमुख यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या

सकाळी 9 वाजता भव्य रक्तदान शिबिर, उपजिल्हा रुग्णालयासाठी उपकरण वाटप, वृक्षारोपण आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन अचलपूर तालुका काँग्रेस कमिटी ग्रामीण व शहर तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती अचलपूर याच्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नामदेवराव तनपुरे, श्रीकांत झोडपे,राहुल गाठे, सचिदानंद बेलसरे, दिनेश वानखडे, विशाल खानझोडे,प्रवीण हूड, अंकुश ठाकरे, नरेंद्र हागवणे, निकेश दाभाडे, रावसाहेब छापणे, प्रमोद कांबळे आदी काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

# फायरिंग प्रकरणी तीन आरोपी अटक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २९ :** शहरात गुन्हेगारीचे प्रमाण झपाट्याने वाढत असून विशेषत: अल्पवयीन मुलांचा गंभीर गुन्ह्यांमध्ये वाढता सहभाग ही चिंतेची बाब ठरत आहे. खून, खुनाचा प्रयत्न, दरोडे, फायरींगसारख्या घटनांमध्ये लहान वयातील मुलं अडकताना दिसत असल्याने येत्या काळात अमरावती ही बाल गुन्हेगारीत राज्यात अव्वल ठरेल, अशी धोक्याची घंटा वाजू लागली आहे. समाज आणि कायदा–सुव्यवस्थेसमोर उभ्या राहिलेल्या या गंभीर आव्हानावर उपाय शोधण्याची जबाबदारी केवळ पोलीस यंत्रणेवर येऊन ठेपली आहे.

शहरात काल झालेल्या फायरींग करून प्राणघातक हल्ला करणाऱ्या तिघा आरोपींना शहर गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. या आरोपींमध्ये दोन युवक आणि एक विधीसंघर्षित बालकाचा समावेश असून, त्यांच्यावर यापूर्वीही खुन व



खुनाच्या प्रयत्नासारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे उघड झाले आहे.

२८ ऑगस्ट रोजी फेजरपुरा येथे फिर्यादी अयान शेख वडिलांसोबत दुकानासमोर उभे असताना आरोपी सयद अबूजर उर्फ मस्तान (१९, रा. हबीब नगर नं. २), मोहम्मद रेहान (२०, रा. सुफीयान नगर नं. २) आणि एक विधीसंघर्षित बालक हे बाईकवर आले. त्यांनी फिर्यादी व त्यांचे वडील यांना शिवीगाळ करून जीव घेण्याच्या धमक्या दिल्या. त्यानंतर आरोपींनी बंदूक व तलवारीच्या सहाय्याने जिवघेणा हल्ला केला. या घटनेवरून फेजरपुरा पोलीस ठाण्यात अप.क. ७११/२०२५ कलम १०९ (१), ३५१(२), ३५२, ३(५) भा.न्या.स. सहकलम ३/२५, ४/२५ भा.न्या.सं. सह आर्म्स ॲक्टन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी या गुन्ह्याची दखल घेऊन पथक तयार केले. सपोनि मनीष वाकोडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने गुप्त बातमीदाराच्या मदतीने आरोपींचा शोध घेतला. आरोपी धरमकाटा परिसरात लपल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने छापा टाकून तिघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांना पुढील तपासासाठी फेजरपुरा पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले.

# गांजा विक्रेत्यास तीन वर्षाची शिक्षा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २९ :** आरोपी हा स्वताच्या घरातच अवैध रित्या गांजा विक्री करीत होता. ही माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून त्याला गांजासह अटक करून दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले. न्यायालयाने दोष सिद्ध झाल्याने आरोपीला तीन वर्षाची शिक्षा ठोठावली आहे. आरोपी गजानन भिमराव उमेकर (६५) रा. रेवसा वलगाव हा घरातच अवैधरित्या गांजाची विक्री करीत होता. ही माहिती वलगाव पोलिसांना मिळताच त्याला गांजासह ताब्या घेतले व दोषारोप पत्र न्यायालयात सादर केले. पोलिस निरीक्षक विनोद चव्हाण यांनी गुन्ह्याचा तपास केले असून जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक १ यांनी आरोपीवर दोष सिद्ध झाल्याने व सबळ पुरावे असल्याने तीन वर्षाचा सश्रम कारावास व २५ हजार रूपये दंड ठोठावला आहे. दंड न भरल्यास सहा महिन्याची अतिरिक्त शिक्षा सुनावली आहे. पैरवी अधिकारी म्हणून सहायक पोलिस निरीक्षक प्रविण म्हाला, संजय यादव यांनी न्यायलयीन कामकाज पाहिले.

# चाकू घेवून दहशत पसरविणाऱ्यांना अटक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २९ :** दोन इसम दुचाकीवर जावून हाता मध्ये चाकू घेवून फिरत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होती. आरोपी हे बाबा चौक कडून इर्विन चौकाकडे येत असताना पोलिसांनी त्यांची दुचाकी थांबून त्यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून चाकू व दुचाकी जप्त केली आहे.

शहरात सध्यास्थितीत गणपती उत्सव असल्याने पोलिसांची गुन्हेगारावर पाळत सुरू आहे. अश्यातच आरोपी आकाश उर्फ गंगु दिलीप मोरे (३०) रा.



केडिया नगर, भारत दिगांबर राठोड (२६) हे दोघे दुचाकी क्रमांक एमएच–२७ बीएक्स–४३९६ वर हातात चाकू घेवून फिरत होते व येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना चाकूची भिती दाखूवन दहशत निर्माण करीत होते. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेवून कारवाई केली आहे. ही कार्रवाई गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक महेश इंगोले, गजानन रेवले, दीपक सुंदरकर, आस्तिक देशमुख, जहीर शेख, अतुल संबे, राहुल ढेंगेकर यांनी केली आहे.

# जिल्ह्यात जास्त दराने स्टॅम्पपेपरची विक्री

## महसूल मंत्र्यांच्या जिल्ह्यातच नागरिकांची लूट

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २९ :** जिल्हाधिकारी कार्यालयासह जिल्ह्यातील प्रत्येक तहसील कार्यालय, न्यायाल्याच्या आवारात स्टॅम्प विक्री करणाऱ्या परवानाधारक विक्रेते स्टॅम्पपेपरवर अतिरिक्त शुल्क वसूल करीत आहे. १०० रुपयांच्या स्टॅम्पवर १० रुपये तर ५०० रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर ३० रुपये अतिरिक्त वसूल करून नागरिकांची सर्रास लूट करीत आहे. यासंदर्भात अनेकवेळा जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी करण्यात आल्या, मात्र प्रशासनाकडून




कोणतीही कार्यवाही न झाल्याने जिल्हाधिकाऱ्यांची या प्रकाराला मुकसंमती आहे काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

राज्य शासनाने आपले महसुली उत्पन्न वाढविण्यासाठी १०० रुपयाचा स्टॅम्पपेपर हा ५०० रुपयाचा केला आहे. त्यामुळे एखाद्या शासकीय लाभ घेण्यासाठी गोळा कराव्या लागणाऱ्या दस्तऐवजांचा खर्च हा पाचपटीने वाढला आहे. त्यात जिल्हाधिकारी, तहसील तसेच न्यायालयाच्या आवारात बसून स्टॅम्पपेपर विक्री करणारे सर्वसामान्य नागरिकांची सर्रास लूट करीत आहे. १०० रुपयांचा स्टॅम्पपेपर हा ११० तर ५०० रुपयाचा स्टॅम्पपेपर हा ५३० रुपयाला विकल्या जात आहे. एखाद्या व्यक्तीने अतिरिक्त पैसे देण्यास नकार दिला तर स्टॅम्पपेपर देण्यास हे विक्रेते नकार देऊन त्याची अडवणूक करतात. गेल्या अनेक वर्षापासून दिवसाढवळ्या नागरिकांना लुटण्याचा हा प्रकार सुरू असून यासंदर्भात अनेकदा जिल्हा प्रशासनाकडे तक्रारीसुद्धा केल्या, मात्र त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांची अशा प्रकाराला मुकसंमिती आहे काय? असा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. त्यामुळे शासकीय कार्यालयाच्या आवारात बसून नागरिकांची लूट करणाऱ्या या परवानाधारक स्टॅम्प विक्रेत्यांचे परवाने रद्द करावे अशी मागणी केल्या जात आहे.

### महसूलमंत्र्याच्या जिल्ह्यातच अंधार

अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री पद हे राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे आहे. त्यांच्याच जिल्हयातअशाप्रकारे स्टॅम्प विक्रीत नागरिकांची खुलेआम लूट केल्या जात असेल तर राज्यातील इतर जिल्ह्यांचे काय? असा प्रश्न उपस्थित होतो. पारदर्शक गतिमान व स्वच्छ प्रशासन चालविण्याचे प्रयत्न ज्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडून होणे आवश्यक आहे, त्याच कार्यालयाच्या आवारात अशाप्रकारची लूट होत असेल तर सर्वसामान्य नागरिकांनी स्वच्छ कारभाराची अपेक्षा तरी कोणाकडून करावी असा प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे या गंभीर प्रकाराकडे पालकमंत्री महोदय आपले लक्ष वेधतील काय हे बघणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## थोडक्यात

### युवकाची गळफास लावून आत्महत्या

**अमरावती :** जुन्या बायपास मार्गावरील ऑक्सिजन पार्क परिसरात झाडाला गळफास लावून एका युवकाने आत्महत्या केल्याची घटना २६ ऑगस्ट रोजी उघडकीस आली. स्वप्नील तुळशीराम इंगोले वय ३३ रा. राहूलनगर, बिच्छू टेकडी असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे. याप्रकरणी मृतकाचा भाऊ उमेश इंगोले यांनी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी मर्ग दाखल केला. सदर युवकाने आत्महत्या का केली याचे कारण स्पष्ट होवू शकले नाही. पोलीस पुढील तपास करीत आहे.

### आष्टीत घरासमोरून मोटारसायकल लंपास

**अमरावती :** नजिकच्या आष्टी येथे घरासमोर उभी करून ठेवलेली हिरो स्प्लेंडर कंपनीची एमएच २७ बीपी ६७४० क्रमांकाची मोटारसायकल किंमत अंदाजे २५ हजार अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २६ ऑगस्ट रात्री दरम्यान घडली. याप्रकरणी संतोष तुळशीराम डोंगरे वय ४८, रा. आष्टी यांच्या तक्रारीवरून वलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ७ ते ८ ऑगस्ट दरम्यान घडली. याप्रकरणी सागर सुनील भोकरे वय ३५, रा. आष्टी यांच्या तक्रारीवरून वलगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### संशयितरित्या फिरणारा युवक ताब्यात

**अमरावती :** गुन्हा करण्याच्या उद्देशाने तोंडाला रूमाल बांधून अंधारात संशयितरित्या फिरणाऱ्या युवकाला गाडगेनगर पोलिसांनी गस्तीदरम्यान ताब्यात घेतले. विकास नंदकिशोर चढार वय २७, रा. महेंद्र कॉलनी असे ताब्यात घेतलेल्या युवकाचे नाव आहे. गाडगेनगर पोलीस ठाण्यात कलम १२२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

### आजारी इसमाचा मृत्यू

**अमरावती** = एका आजारी इसमाचा मृत्यू झाल्याची घटना २७ ऑगस्ट रोजी घडली. रवींद्र पंढरीनाथ बळे वय ५०, रा. जळू ता. नांदगाव खंडेश्वर असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी आतेभाऊ दिलीप गोलाईत यांनी पोलीसात फिर्याद दाखल केली. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली.

### मोबाईल लंपास

मोर्शी. पेट्रोलपंपावरून मोबाइल चोरी गेल्याची घटना घडली. जय गजानन जोंधळे रा. खानापूर (ता. मोर्शी) असे फिर्यादीचे नाव आहे. ट्रक क्लीनर म्हणून कार्यरत जय हा विश्रांती घेत असताना अज्ञाताने मोबाइल चोरला. याप्रकरणी दाखल केला. पोलिसांनी गुन्हा

### अंगणात उभी असलेली दुचाकी पळविली

**अमरावती** – अंगणात उभी केलेली दुचाकी लंपास केली. ही घटना आष्टी येथे घडली. संतोष तुलसीराम डोंगरे (४८) असे फिर्यादीचे नाव असून एमएच–२७/बीपी–६७४० क्रमांकाची दुचाकी त्यांनी अंगणात उभी करून ठेवली होती. दरम्यान रात्रीच्या सुमारास चोरट्याने ती पळवून नेली. याबाबत वलगाव पोलिसांत दाखल तक्रारीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### दानपेटी फोडून २५ हजार रुपये चोरी

**अमरावती :** पथ्रोट येथील महादेव मंदिर संस्थानची दानपेटी फोडून २५ हजार रुपयांची रोकड चोरल्याची घटना उघडकीस आली. गोलू प्रभाकर दांडगे (२२, रा. पथ्रोट) याने ही चोरी केल्याचे समोर आले आहे. मंदिर व्यवस्थापक राहुल दिनकर कडू (४३) यांच्या तक्रारीवरून पथ्रोट पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.

# आता... जिल्ह्यात माती तपासणीच्या १५ प्रयोगशाळा गावातच

## कृषी योजनेअंतर्गत जिल्ह्यात उपलब्धी, उत्पादन वाढीसाठी होईल फायदा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २९ :** ग्रामीण कृषी विकास योजनेंतर्गत आता गावांमध्येच माती परीक्षण प्रयोगशाळा सुरू होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतातील माती तपासणीसाठी शहरात जावे लागणार नाही. यामध्ये वेळ व पैसा या दोहोंची बचत व शेताची सुपीकता वाढविण्यासोबतच उत्पादकता वाढ होईल.

मातीचे परीक्षण म्हणजे मातीचे विश्लेषण करून तिच्या गुणवत्तेचा पोषण तत्त्वाचा आणि पीएचस्तराची माहिती घेतली जाते.




यामध्ये नत्र, फॉस्फरस, पोटॅशियमसह सूक्ष्म पोषणतत्त्वेचे तपासली जातात. जिल्हा स्तरीय प्रयोगशाळेडरा यंदा ४२ हजार मृद नमुने तपासणीचे लक्ष्यांक जिल्ह्यास प्राप्त आहे. मात्र, मशीनची क्षमता, उपलब्ध मनुष्यबळ यासह अन्य कारणांमुळे किमान ३२ ते ३५ हजार नमुने तपासणी होण्याची शक्यता आहे. वलक्ष्यांकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हास्तरीय निवड समितीडरे लाभार्थीची अंतिम निवड केली जाणार आहे. यामध्ये लाभार्थ्यांसाठी सोडत काढण्यात येणार आहे. प्रयागशाळा उभारण्यासाठी आर्थिक सहाय व्यक्ती, शेतकरी सहकारी संस्था, निविष्ठा किरकोळ विक्रेते आणि शाळा, कॉलेज युवक, युवती, स्वयंसहायता गट शेतकरी उत्पादक संस्था, विविध कार्यकारी सहकारी संस्था हे अर्ज करू शकतात. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांन्वये सदर प्रयोगशाळा उभारण्यासाठी आर्थिक सहाय व्यक्ती, शेतकरी सहकारी संस्था, निविष्ठा किरकोळ विक्रेते, कॉलेज युवक, युवती यांना द्यावयाच्या आहेत. यासाठी अर्ज मागविले आहेत.

> शेतकऱ्यांना आपल्या शेतातील जमिनीत कोणते घटक कमी आहेत व हे जाणून घेऊन जमिनीची सुपीकता व उत्पादकता वाढ करण्यासाठी या ग्रामस्तरीय प्रयोगशाळा उपलब्धी ठरतील.
>
> **राहुल सातपुते**
> **जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

### प्रयोगशाळेसाठी दीड लाख अनुदान

प्रयोगशाळेसाठी अर्थसहाय रक्कम दीड लाख रुपये आहे. जिल्ह्याकरिता १५ ग्रामस्तरीय मृद चाचणी प्रयोगशाळेचे लक्ष्यांक प्राप्त असून इच्छुकांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाने केले आहे.

### अर्जासाठी पात्रता, निकष, अर्जाची मुदत

लाभार्थी युवक/युवती १८ ते २७ वयोगटातील असावा. लाभार्थ्यांची शैक्षणिक अर्हता किमान १० वी उत्तीर्ण (विज्ञान व संगणक विषयाची माहिती) असावी. अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेसोबत आधार कार्ड व पॅन कार्ड जोडणे आवश्यक आहे. अर्जदार / गटाची स्वत:ची इमारत किंवा किमान ४ वर्षाचा भाडेकरार असलेली इमारत असणे आवश्यक आहे.

# श्री चक्रधर स्वामी अवतार दिन विविध उपक्रमांनी साजरा

## शहरातून निघाली प्रतिमेची भव्य शोभायात्रा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. २९ :** श्रीकृष्ण मंदिर दर्यापूर साईनगर तर्फे दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा श्रीकृष्ण जन्माष्टमी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी महाराज अवतार दिन हा विविध उपक्रमाने साजरा केला जातो त्याच प्रमाणे यावर्षी सुद्धा हा अधिक उत्साहात हा दिन साजरा करण्यात आला सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिनानिमित्त सकाळी नऊ वाजता श्रीकृष्ण मंदिर येथून चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेची भव्य शोभा यात्रा निघाली होती या शोभायात्रेमध्ये पालखी डीजे ढोलाच्या दिंड्या सर्व मानभाव पंथीय सहभागी झाले होते शोभायात्रीची सुरुवात श्रीकृष्ण मंदिर येथून आचार्य प्रवर श्री दिगंबर मुनी बाबा अंकुर नेरकर यांच्या हस्ते विधिवत पूजा होऊन बाबा खुल्या जीपमध्ये बसून शोभायात्रेमध्ये सहभागी झाले होते ही शोभायात्रा अमरावती रोड वरून डॉक्टर डालके यांच्या हॉस्पिटल समोर आली असता खासदार बळवंत वानखडे यांनी पूजन करून पुष्पहार अर्पण केले त्याप्रसंगी संस्थेतर्फे त्यांचा शाल पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला त्यानंतर खासदार यांनी दिगंबर मुनी बाबा अंकुर नेरकर यांचा सत्कार केला व



आशीर्वाद घेतले त्याप्रसंगी त्यावेळेस बाळासाहेब अलोने संचालक अमरावती जिल्हा सहकारी बँक अमरावती उपस्थित होते डेपो चौक मार्गे जात असताना सुनील पाटील डिके यांच्या वतीने तिथे सुनील पाटील यांनी पालखीचे पूजन करून उपस्थित सर्वांना चहापान देण्यात आला तसेच डेपो चौकात दर्यापूर भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्ष सौ मेगा भारती यांनी सुद्धा पालखीचे पूजन करून आशीर्वाद घेतले त्यानंतर पालखी म्हणजे शोभायात्रा महात्मा गांधी पुतळा चौक येथे गेली असता तिथून पुन्हा रेल्वे गेट शिवाजी चौक दर्यापूर नगर परिषद नवीन बिल्डिंग या ठिकाणी शोभायात्रा आली असता त्या परिसराचे कार्यकर्ते श्री रवी भाऊ राजपूत यांनी सह पत्नी पालखीचे पूजन केले व दर्शन घेतले त्याप्रसंगी रवींद्र ढोकणे मदन पाटील बायस कार आधी भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते त्यानंतर शोभायात्रा पुन्हा अमरावती रोडला येऊन तिचा श्रीकृष्ण मंदिर साईनगर दर्यापूर या ठिकाणी समारोप करण्यात आला त्यानंतर धर्मसभा सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतार दिनानिमित्त आचार्य प्रवर श्री दिगंबर मुनी बाबा अंकुशनेरकर यांनी मार्गदर्शन केले त्यानंतर महाप्रसाद प्रसाद वाटप करण्यात आले.

# सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान

## तालुका काँग्रेस कमिटीचे तहसीलदारांना निवेदन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि. २९ :** धामणगाव तालुक्यात सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, याबाबत तालुका काँग्रेस कमिटी व शेतकऱ्यांच्या वतीने दि. २९ ऑगस्ट रोजी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

सततच्या पावसामुळे सोयाबीन, तुर, कपाशी, संत्रा, मोसंबी आदी पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. नाले व बंधारे फुटून शेतकऱ्यांचे बांधे वाहून गेले, विहिरी खचल्या, तर अनेक ठिकाणी जमीन खरडून गेल्याने शेतकऱ्यांचे अपरिमित नुकसान झाले आहे. याची भरपाई होणे कठीण असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

संत्रा व मोसंबी फळबागांमधील फळे पिवळी पडून गळत असल्याने या फळबागांची पंचनामे करून हेक्टरी किमान 1 लाख रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच विरुळ–रोंघे शिवार ते अंजनसिंगी शिवारापर्यंत विदर्भ नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करावे,




जेणेकरून पुरामुळे होणारे वारंवार नुकसान थांबवता येईल, अशीही मागणी या निवेदनातून करण्यात आली.

या निवेदनावेळी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पंकज वानखडे म्हणाले की, सततच्या पावसामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचे बांधे वाहून गेले, फळबागा उद्ध्वस्त झाल्या, तर अनेक ठिकाणी जमीन खरडून गेली आहे. अशा गंभीर परिस्थितीत शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अन्यथा काँग्रेस पक्ष व शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यास भाग पडतील.

या प्रसंगी उपाध्यक्ष विठ्ठलराव सपाटे, खरेदी विक्री संस्थेचे संचालक मुकेश राठी, राजा भोगे, संजय शेंडे, शहर युवा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आशिष शिंदे, समीर पाटील, नंदू चौधरी, प्रकाश मते, ओमप्रकाश हरवानी, अमोल कडू, बंडू सपाटे, अनिल राजनकर, घनश्याम शेलोकार, पंकज ठाकरे, अक्षय दुर्गे, विजय थोटे, दिवाकर ठाकरे, योगेश सोनवणे, दादारावजी तुपट, प्रकाश गुल्हाने यांच्यासह तालुक्यातील असंख्य शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विश्व हिंदू परिषद स्थापना दिवस साजरा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २९ :** मातृशक्ति अमरावती महानगर द्वारा आयोजित श्रीकृष्ण जन्माष्टमी तसेच विश्व हिंदू परिषद स्थापना दिवस सोहळा गुरुवार, २८ ऑगस्ट रोजी एकवीरा माता मंदिर अमरावती. येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात भारत मातेच्या फोटोचे पूजन व माल्यार्पण करून, दीपप्रज्वलन, ओंकार, विजयी महामंत्र व एकात्मता मंत्राने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या सन्माननीय सौ. सुभधाताई पोतदार यांनी मार्गदर्शक भाषण दिले. त्यानंतर विभाग प्रमुख माननीय श्री. विजयजी शर्मा यांनी स्थापना दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना हिंदूंचे ऐक्य, लव्ह जिहाद, धर्मांतरण आदी ज्वलंत विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात मातृशक्ति विभाग संयोजिका लीना शर्मा यांनी मातृशक्ति व दुर्गा वाहिनी या आयामाचे कार्य समजावून सांगितले. महानगर संयोजिका प्राध्यापिका. योगिता कळंबे यांनी हिंदुत्वाच्या रक्षणासाठी स्त्रीशक्तीचे महत्त्व पटवून दिले. आणि विश्व हिंदु परिषद चे पुढील लक्ष्य समोर ठेवले. सामाजिक समरसता प्रमुख मयूर जयस्वाल ने कार्यक्रमाचे सूत्रसंचालनाल केले. तसेच माननीय सौ. अर्चना डाके यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला सौ. मीनाताई ठाकूर प्रखंड सहसंयोजीका, मातृशक्ती मनिषाताई लांजेवार, विश्व हिंदू परिषदचे पदाधिकारी शरदजी अग्रवाल उपस्थित होते.

# न.प.च्या वतीने पर्यावरण पूरक सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि. २९ :** अंजनगाव नगर परिषद च्या वतीने स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत अंजनगाव शहरातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळासाठी पर्यावरण पूरक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ सन २०२५ चे आयोजन करण्यात आले असून स्पर्धकांकरिता लाखो रुपयांच्या बक्षीस ठेवण्यात आली आहे.

या स्पर्धेमध्ये प्रस्तावित उपक्रमाची परीक्षा व गुणांकन याचा तपशील पर्यावरण पूरक गणेश मूर्तीची प्रतिस्थापना व आरास (प्लास्टिक थर्मोकॉलचा वापर न करता, फटाके न वापरता) २ गुण, टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ १) प्रतिकृती/ वस्तू तयार करणे २० गुण, वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणे (२० वृक्ष लागवड) २० गुण, इलेक्ट्रिक वाहनाचा वापराबाबत जनजागृती करणे व सौर ऊर्जेचा वापर करणे यासाठी सायकल रॅलीचे आयोजन १५ गुण, हरित शपथ सदस्य व नागरिकांनी शासनाकडे (वेबसाईटवर टाकून ५०० E pledga घेऊन त्याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे) ३० गुण, स्वच्छ भारत अंतर्गत प्लास्टिक वापराचे दुष्परिणाम यावर नागरिकांचा संदेश देणारा देखावा, कचरा विलीनीकरणाबाबत जनजागृती संदेश देणारा देखावा, वातावरण बदल जनजागृती बाबत देखावा इत्यादी कोणतेही एक. ३० गुण, जनजागृती उपक्रम अ) स्वच्छ भारत विषयक पथनाट्य करणे ब) चित्रकला व रांगोळी स्पर्धा (विषय –पर्यावरण व स्वच्छता) ३० गुण, गणेश उत्सव मंडळाने २०० seed ball बीज गोळे तयार करणे व जमिनीत करणे ऐवजी मोकळ्या जागेमध्ये फेकणे . किंवा भारतीय जातीच्या किमान 15 वृक्षाचे बीज संकलन करणे. ३० गुण असे नियम व अटी असून स्पर्धेतील बक्षीस याप्रमाणे प्रथम क्रमांक ५१ हजार रू. व ट्रॉफी, द्वितीय क्रमांक ३१ हजार रु व ट्रॉफी, तृतीय क्रमांक २१ हजार रू व ट्रॉफी ठेवण्यात आले असून प्रवेश शुल्क स्पर्धकांकरिता मोफत असून या स्पर्धेत जास्तीत जास्त गणेशोत्सव स्पर्धकांनी भाग घेण्याचे तसेच स्पर्धकांनी नगरपरिषद मधील कर्मचारी मिलिंद वानखडे (७७९८२५९९९३),सुरज हातेकर ( ९७६७२९७९६९, स्वप्निल श्रीवास्तव (९०२८२१८२१९ ) संपर्क साधण्याचे आवाहन दादारावजी डोलारकर मुख्याधिकारी नगरपरिषद अंजनगाव सुर्जी यांनी केले आहे.

## अंजनगाव न. प. ने स्थापन केली पर्यावरण पूरक गणपतीची स्थापना

दरवर्षी प्रमाणे ह्याही वर्षी अंजनगाव नगर परिषदेच्या वतीने ह्याही वर्षी पर्यावरण पूरक अश्या सजावटीने केलेल्या सजावटी मध्ये लाडक्या गणरायाची स्थापना करण्यात आली असून ह्यामध्ये पळसाच्या पाना पासून बनवऱ्यात आलेले द्रोण, पत्रावळी ह्यापासून संपूर्ण सजावट, डेकोरेशन करण्यात आले असून अश्या ह्या देखण्या सजावटीमुळे आजच्या काळात आवश्यक असलेल्या पर्यावरण पूरक अश्या गोष्टीला चालना मिळणार असून, पूर्वीच्या काळातील होत असलेल्या देखाव्याला चालना मिळणार आहे, सदरच्या देखाव्यामुळे आजच्या घडीला पर्यावरणाला खरी साथ मिळणार हे निश्चित



# शहरातील वाहतूक कोंडीवर उपाययोजना करणार

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे आश्वासन | नवीन पूल बांधण्याच्या शक्यता पडताळणार | पूल बांधणी संदर्भात रेल्वेशीही चर्चा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २९ :** अमरावती बडनेरा रेल्वे मार्गावरील वाहतुकीसाठी असलेला पूल क्षतीग्रस्त झाल्याने वाहतुकीसाठी बंद करण्यात आलेला आहे. यामुळे शहरात वाहतुकीची कोंडी निर्माण झाली असून याबाबत सर्व शक्यता पडताळून पाहण्यास जात आहे. लवकरच वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात येतील, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात शहरातील वाहतूक व्यवस्थेबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रतीक गिरी, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉक्टर मेघा वासनकर आदी उपस्थित होते.

आमदार संजय खोडके यांनी शहरातील वाहतूक व्यवस्था नियंत्रित करण्यासाठी पर्यायी रस्त्याबाबत गुगल मॅपद्वारे सूचना करण्यात येत आहे. त्याचे प्रात्यक्षिक यावेळी करण्यात आले. तसेच गर्दी टाळण्याकरिता नेहरू



मैदान येथे तात्पुरती व्यवस्था करण्यात यावी. नेहरू मैदान या पर्यायी रस्त्यामुळे बरीचशी वाहतूक नियंत्रित करण्यास मदत होईल, असे सांगितले.

आमदार सुलभा खोडके यांनी रेल्वेने सदर पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे आवश्यक होते. सण उत्सवाच्या काळात अचानक रस्ता बंद केल्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली आहे. यासह मुख्य बाजारपेठेतील चौकात असलेल्या पारधी समाजामुळे वाहतुकीवर परिणाम होत असल्याने याबाबत ठोस निर्णय घेणे आवश्यक असल्याचे सांगितले.

रेल्वे मार्गावरील उडाणपूल क्षतीग्रस्त झाल्यामुळे वाहतूक नियंत्रणाची समस्या निर्माण झाली आहे. नागरिकांना समस्या निर्माण होऊ नये यासाठी वाहतूक शाखा कार्य करीत आहे. उडाणपुलाच्या कामाबाबत रेल्वेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली आहे. तसेच शासनाच्या निर्देशानुसार उडाणपूल बांधावयाचे झाल्यास यासाठी लागणारे अंदाजपत्रक तयार करावे लागेल. तसेच पर्यायी रस्त्याची जागा कुणाला दिली असल्यास याचीही पाहणी करावी लागणार आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महापालिकेने खातरजमा करावी. पर्यायी रस्त्याची जागा डीपी रस्त्यावर असल्याबाबत बघण्याचे महापालिकेला सूचना केल्या. सध्या शहरात गणेशोत्सव असल्यामुळे वाहतुकीची सद्य:स्थिती जिल्हाधिकारी यांनी जाणून घेतली.

## वणी-मुकूटबन मार्गावर नागरिकांचा जीवघेणा प्रवास, दोन वर्षांतच रस्त्याची चाळणी

# ५८.७५ कोटी रूपये खड्ड्यात

वणी, दि. २९ प्रतिनिधी



'सुमारे ५८.७५ कोटी रुपये खर्चून तयार करण्यात आलेल्या वणी-मुकूटबन राज्यमार्गाची, दोन वर्षांतच अक्षरशः चाळणी झाली आहे.' या रस्त्यावर पडलेल्या जीवघेण्या खड्ड्यांमुळे रोज अपघात होत असून, वाहनांचेही मोठे नुकसान होत आहे. 'या रस्त्यावरून जायचे तरी कसे?' असा संतप्त सवाल प्रवासी आणि नागरिक, लोकप्रतिनिधींसह प्रशासनाला विचारत आहेत.

वणी-कायर-पुरड हा २३.५० किलोमीटर लांबीचा राज्यमार्ग, भारत सरकारच्या केंद्रीय सडक निधीतून २०१८-१९ मध्ये सुरू होऊन, दोन-तीन वर्षांपूर्वीच पूर्ण झाला. मात्र, कामाच्या निकृष्ट दर्जाबाबत सुरुवातीपासूनच प्रश्न उपस्थित केले जात होते. आज, शासनाने सुमारे ५८.७५ कोटी रुपये खर्चून तयार केलेल्या या मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. या मार्गावरील खड्डे भरण्यासाठी स्थानिकांनी गेल्या दोन वर्षांत अनेकदा निवेदने दिली आणि खड्ड्यांमध्ये झाडे लावून आंदोलनही केले. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाने अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही. काही दिवसांपूर्वीच, मानकी शिवारातील वाघदोडा पुलाजवळ खड्ड्यात तीनचाकी ऑटो पलटी होऊन एक तरुण गंभीर जखमी झाला होता. असे अपघात या मार्गावर नित्याचेच झाले आहेत.

### ५८.७५ कोटी गेले कुठे?

■ 'वणी-मुकूटबन या २३.५० किलोमीटरच्या रस्त्यासाठी, केंद्र शासनाने तब्बल ५८७५.०० लक्ष, म्हणजेच ५८ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी दिला होता.' एवढा मोठा खर्च करूनही, दोन वर्षांतच रस्त्याची दुर्दशा झाल्याने, कामाच्या दर्जावर आणि झालेल्या भ्रष्टाचारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 'करोडो रुपये खड्ड्यात गेले असून, याला जबाबदार कोण?' असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

### 'आता जनआंदोलन अटळ'

■ 'सार्वजनिक बांधकाम विभाग अजून किती अपघातांची वाट पाहणार आहे?' असा सवाल सामाजिक कार्यकर्ते गुरुदेव चिडे यांनी केला आहे. 'वणी-कायर मार्गावर मानकी गावापर्यंत, चार किलोमीटर अंतरावर जागोजागी खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे मोठी जीवितहानी होण्याआधी, रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करावी. अन्यथा, आता जनआंदोलनाशिवाय पर्याय नाही,' असा निर्वाणीचा इशारा त्यांनी दिला आहे.

## विहिरीत महिलेचा मृतदेह आढळला

**वणी, दि. २९ :** येथील शिरपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कुरई येथे, पतीसोबत शेतात काम करण्यासाठी गेलेल्या एका ३३ वर्षीय विवाहितेचा शेतातील विहिरीत पडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना बुधवारी (दि. २७) दुपारी उघडकीस आली आहे. अविता विजय परसुटकार असे मृत विवाहितेचे नाव आहे. त्या पती विजय यांच्यासोबत सकाळी शेतात गेल्या होत्या, मात्र दुपारी त्यांचा मृतदेह विहिरीत तरंगताना आढळून आला. ही घटना अपघात आहे की घातपात, याचे कारण अद्याप अस्पष्ट असून, मृत्यूचे गूढ वाढले आहे. माहिती मिळताच शिरपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांच्या पश्चात सासू, पती आणि तीन मुली असा परिवार असून, या घटनेमुळे संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## महत्वाचे



## सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचे 'पथसंचलन'

**पांढरकवडा :** आगामी गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद सणांच्या पार्श्वभूमीवर, पांढरकवडा शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी 'पथसंचलन' (रूट मार्च) काढले. या माध्यमातून शांतता भंग करणाऱ्यांना कडक इशारा देण्यात आला असून, नागरिकांना निर्भयपणे सण साजरे करण्याचे आवाहन केले आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता आणि उपविभागीय पोलिस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस निरीक्षक दिनेश झांबरे यांच्या नेतृत्वात मंगळवारी, २६ ऑगस्ट रोजी हे पथसंचलन झाले. शहरातील गणेश मंडळांच्या मार्गांवरून आणि मिश्र वस्तीतून हा रूट मार्च काढण्यात आला. यात पोलिस अधिकारी, अंमलदार आणि होमगार्ड मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी, सण-उत्सवाच्या काळात आवश्यक असलेल्या शस्त्र, दारूगोळा, हेल्मेट आणि इतर साहित्याची पाहणी करून त्यांची खात्री करण्यात आली. पोलिस दलाच्या या शक्ती प्रदर्शनाने शहरवासियांचे लक्ष वेधून घेतले होते. सण-उत्सवाच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस दल सज्ज असल्याचे यातून दिसून आले. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. नागरिकांनी शांतता राखत प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.



## मंगरूळ येथे 'बैल पोळा' साजरा

**मंगरुळ :** शेतकऱ्याचा जिव्हाळ्याचा आणि सर्जाराजाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा 'बैल पोळा' सण, मंगरूळ गावात मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक थाटात साजरा झाला. पोलिस पाटील अनिता आलोणे यांनी तोरण बांधून पूजेचा मान मिळवला. या उत्सवात शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. भारत हा कृषिप्रधान देश असल्याने, शेतकऱ्याच्या जीवनात बैलाचे स्थान अनमोल आहे. याच भावनेतून मंगरूळ गावात २२ ऑगस्ट रोजी पोळा सण साजरा झाला. दरवर्षीप्रमाणे, गावातील हनुमान मंदिराजवळ पोलिस पाटील अनिता आलोणे यांनी तोरण बांधून उत्सवाची सुरुवात केली. सजवलेल्या बैलजोड्यांची रांग लागली होती, जिथे पोलिस पाटलांनी त्यांचे पूजन करून घाट वाटप केले. बैलांच्या खांद्याला रानगौरीचा धूर दाखवून त्यांच्या श्रमांप्रति आदर व्यक्त करण्यात आला. हा सण म्हणजे शेतकऱ्याच्या जिव्हाळ्याचा आणि जबाबदारीचा उत्सव आहे, जिथे वर्षभर शेतात राबणाऱ्या मुक्या मित्राचे आभार मानले जातात. गावातील सर्व शेतकरी, महिला आणि नागरिक हा सोहळा पाहण्यासाठी एकत्र जमले होते, ज्यामुळे गावात भक्तिमय आणि उत्साही वातावरण निर्माण झाले होते. या परंपरेमुळे सामाजिक एकोपा अधिक दृढ झाल्याचे दिसून आले. या कार्यक्रमाला गावातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

## अपक्ष संचालक रजनीकांत बोरेले यांची 'खोबरा लाडू' तुला



**पांढरकवडा :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत एकमेव अपक्ष उमेदवार म्हणून ऐतिहासिक विजय मिळविणारे संचालक रजनीकांत डालूरामजी बोरेले यांचा, येत्या ३ सप्टेंबर रोजी 'खोबरा लाडू'ने तुला करून सत्कार करण्यात येणार आहे. येथील मुख्य चौकात सायंकाळी ६ वाजता हा सोहळा होईल. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार संजय देशमुख असतील, तर प्रमुख अतिथी म्हणून आमदार संजय देरकर, शंकर बडे, माजी सभापती जान मोहम्मद जिवाणी, तालुकाप्रमुख तिरुपती कंदकुरीवार उपस्थित राहणार आहेत. हा सत्कार सोहळा राय परिवार आणि श्याम बाबा मित्र परिवारातर्फे आयोजित करण्यात आला आहे. बोरेले यांच्या विजयामुळे त्यांचे चाहते जागो-जागी वजनतुला करून त्यांचे अभिनंदन करत आहेत. या कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## ग्रंथालयांसाठी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय' पुरस्कार जाहीर

**यवतमाळ :** ग्रंथालय संचालनालयाच्या वतीने दिला जाणारा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय' आणि 'डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता' पुरस्कार जाहीर झाला आहे. वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी दिल्या जाणाऱ्या या पुरस्कारांसाठी २५ सप्टेंबरपर्यंत अर्ज मागवण्यात आले आहेत. उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत, राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, या उद्देशाने हे पुरस्कार दिले जातात. शहरी व ग्रामीण भागातील 'अ' ते 'ड' वर्गातील उत्कृष्ट ग्रंथालयांना अनुक्रमे १ लाख ते २५ हजार रुपयांपर्यंतचे रोख बक्षीस, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र दिले जाते. तसेच, राज्यातील उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता आणि सेवक यांना राज्यस्तरावर प्रत्येकी ५० हजार, तर महसूल विभाग स्तरावर प्रत्येकी २५ हजार रुपयांचे पारितोषिक दिले जाते. सन २०२४-२५ या वर्षासाठी इच्छुक ग्रंथालये, कार्यकर्ते आणि सेवकांनी आपले अर्ज विहित नमुन्यात, आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात तीन प्रतींमध्ये सादर करावेत, असे आवाहन प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे. या पुरस्कारामुळे ग्रंथालय चळवळीला मोठी प्रेरणा मिळत आहे.

## कापसाला दहा हजारांचा भाव देण्याची मागणी

**यवतमाळ, दि. २९ प्रतिनिधी**



'अबकी बार सोयाबीन सहा हजार पार, कापसाला दहा हजार भाव मिळालाच पाहिजे,' अशा घोषणा देत, यवतमाळात गणेशोत्सवादरम्यान अनोखे आंदोलन झाले. मोरया गणेशोत्सव मंडळ आणि शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी समता मैदानावर पोस्टर निदर्शने करत शासनाचे लक्ष वेधले.

शेतकरी कर्जमुक्त झाला पाहिजे आणि अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळावी, या मागण्याही यावेळी करण्यात आल्या. गणेशोत्सवाचे औचित्य साधून, कार्यकर्त्यांनी गणरायाला प्रार्थना केली. 'हे गणराया, शेतकऱ्यांवरील संकट दूर कर, त्यांच्या मालाला योग्य भाव मिळू दे आणि बेरोजगारांना रोजगार मिळू दे,' अशा भावना व्यक्त करण्यात आल्या. या आंदोलनात मोरया गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष तथा शेतकरी कार्यकर्ते कॉम्रेड सचिन मनवर, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अभिलाष खंडारे, मोनू कैथवास, आदेश रोडे, हरीश कांबळे, कृष्णा पुसनाके, प्रतीक खाडे, तेजस पाटील, अभिषेक शेटे, नरेश दुमोरे, गजानन गावंडे, गणेश सोळंके, अक्षय गाडेकर, गुणवंत वाभिटकर, ऋषिकेश पाटील, शुभम शेटे, विद्या परचाके आणि प्रा. पंढरी पाठे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व गणेशभक्त सहभागी झाले होते. या अभिनव आंदोलनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

## नेताजी मंडळाला रुग्णवाहिका भेट

### सामाजिक उपक्रम: अजय बोरेले यांच्या मातोश्रींच्या हस्ते हस्तांतरण

**पांढरकवडा, दि.२९ प्रतिनिधी**



सामाजिक कार्यकर्ते अजय बोरेले यांनी 'जन्मभूमी'चे ऋण फेडण्यासाठी पांढरकवडा येथील नेताजी गणेश मंडळाला रुग्णवाहिका भेट दिली. त्यांच्या आई सुलोचना बोरेले यांच्या हस्ते गुरुवारी रुग्णवाहिकेचे हस्तांतरण झाले. ही सेवा गरजू रुग्णांसाठी 'नफा नाही, तोटा नाही' तत्त्वावर चालवली जाणार आहे.

पांढरकवडा शहरातील रुग्णवाहिकेची कमतरता लक्षात घेता, नेताजी गणेश मंडळाने गरजू रुग्णांना निःशुल्क सेवा देण्याच्या उद्देशाने रुग्णवाहिका चालविण्याची इच्छा व्यक्त केली होती. या सामाजिक कार्याला प्रतिसाद देत, अजय बोरेले यांनी तातडीने रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली. गुरुवारी, २८ ऑगस्ट रोजी झालेल्या या कार्यक्रमात त्यांच्या आई सुलोचना बोरेले यांच्या हस्ते मंडळाचे अध्यक्ष संदीप कुंबरे आणि मनीष रामगिरवार यांनी रुग्णवाहिकेच्या चाव्या स्वीकारल्या. माझ्या परिवाराच्या माध्यमातून होणारी ही रुग्णसेवा माझ्यासाठी सौभाग्याची गोष्ट आहे,' असे अजय बोरेले म्हणाले. कार्यक्रमाला जगदंबा संस्थानचे अध्यक्ष शंकर बडे, ज्येष्ठ पत्रकार दामोदर बाजोरिया, समाजसेवक रजनीकांत बोरेले, राजीव बोरेले उपस्थित होते. यावेळी पार्थ बोरले, लक्ष्मीकांत बोरेले आणि शिवम बोरेले, शुभम बोरेले, रामू पेगारलावार अजय कुंबरे, रूपेश चौधरी, अक्षय पिपलवा, आदी समस्त नेताजी मंडळाचे सदस्य उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होते आहे.

## ग्रंथवाचनाने वैचारिक दृष्टिकोन विकसित होतो

### डॉ. पी.एस. बनसोड : नेहरू महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शनीचे उद्घाटन

**नेर (परसोपंत), दि. २९**



'ग्रंथांच्या सहवासाने शब्दसंपत्ती, आकलनशक्ती आणि वैचारिक दृष्टिकोन विकसित होतो,' असे प्रतिपादन नेहरू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एस. बनसोड यांनी केले. भारताचे ग्रंथालय व माहितीशास्त्राचे जनक, पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त, महाविद्यालयात आयोजित तीन दिवसीय ग्रंथप्रदर्शनीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

नेहरू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष परमानंद अग्रवाल आणि कार्यकारी अध्यक्ष रवी अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली, ग्रंथालय विभागातर्फे या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रा. डॉ. एम. डी. वडते यांच्याहस्ते झाले. यावेळी उपप्राचार्य डॉ. एस. व्ही. अडसोड आणि ग्रंथपाल प्रा. एस. के. इंगळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उद्घाटक प्रा. डॉ. वडते यांनी, 'आजच्या समाज माध्यमांच्या युगात विद्यार्थ्यांनी पुस्तकांची कास धरावी,' असे आवाहन केले. तर, उपप्राचार्य डॉ. अडसोड यांनी 'वाचाल तर वाचाल' या उक्तीचे स्मरण करून देत, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रमाणे पुस्तकांवर प्रेम करण्याचे आवाहन केले. ग्रंथपाल प्रा. इंगळे यांनी प्रास्ताविकातून डॉ. रंगनाथन यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे संचालन बी. आर. देवतारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आर. पी. ढगे यांनी केले. या कार्यक्रमाला प्रा. डॉ. एस. व्ही. गावंडे, प्रा. एच. एच. शेख, प्रा. व्ही. पी. कुटे, प्रा. एफ. पी. सहाळा, प्रा. डॉ. व्ही. ए. खोडस्कर, प्रा. डॉ. व्ही. डी. बोके, प्रा. डॉ. डी. जे. भगत, प्रा. डॉ. एस. ए. काटोले, प्रा. प्रसाद निळे, प्रा. प्रज्ञा इंगोले, एल. पी. पालीवाल, एस. पी. नवरंगे, डी. एस. तलवारे, एस. आर. बांबोर्डे, जे. एम. शेंबाडे, आय. आय. खान, ए. डी. देशमुख, ए. बी. अघम आणि एन. के. सिरसाट यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बांधकाम साईटवर चोरट्यांनी मारला डल्ला

**आर्णी, दि. २९ प्रतिनिधी**



येथील नरेंद्र नगर परिसरात एका नवीन घराच्या बांधकामाच्या ठिकाणाहून अनोळखी चोरट्यांनी अंदाजित २० हजार रुपये किमतीची इलेक्ट्रिक वायर कापून चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी आर्णी पोलिसांनी अनोळखी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

श्रीकांत रमेश गीते (वय ४०) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, महालक्ष्मी लॉनजवळ त्यांच्या घराचे बांधकाम सुरू आहे. २५ ऑगस्टच्या रात्री चोरट्यांनी घरात प्रवेश करून, नुकतीच बसवलेली वायरिंग कापून नेली. सकाळी ७ वाजता चौकीदार गजानन रावते यांनी घटनेची माहिती दिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून अनोळखी चोरट्यांचा शोध सुरू केला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. तालुक्यात चोरीच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. बंद घरे, तसेच बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणावर चोरट्यांची नजर असल्याचे दिसून येत आहे.

# पुसद शहर बनले अपघातांचे माहेरघर

### अनियंत्रित वाहतुकीला कोण घालणार लगाम; प्रशासकीय उदासीनतेमुळे नागरिक त्रस्त

**प्रा. महादेव गावंडे**

**पुसद, दि.२९ : पुसद शहरात अनियंत्रित वाहतुकीने कहर केला असून, हेशहर 'अपघातांचे माहेरघर'बनले आहे.' अतिक्रमण, बेशिस्त वाहनचालक आणि प्रशासकीय उदासीनता यामुळे, रस्त्यावरून चालणेही जीवघेणे ठरत आहे. या गंभीर समस्येवर प्रशासनाचा कोणताही अंकुश नसल्याने, याला जबाबदार कोण?, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.**




पुसद शहरात कोणाच्या पायाचा पत्ता कोणाच्या पायात नाही, अशी वाहतुकीची स्थिती झाली आहे. सुसाट वेगाने धावणारी वाहने कधी कोणाचा बळी घेतील, याचा नेम नाही. वाढते अतिक्रमण आणि नियमबाह्य बांधकामांमुळे रस्ते अरुंद झाले आहेत. त्यातच, अल्पवयीन मुलांसह बेशिस्त वाहनचालक वेगमर्यादा पाळत नाहीत. अपघात झाल्यानंतर, वाहतूक पोलिस थातुरमातूर चौकशी करून, राजकीय दबावाखाली वाहनचालकाला सोडून देतात, असा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे. यामुळे, जणू काही माणसांना मारण्याचा परवानाच मिळाल्यासारखे वाहनचालक वागत आहेत. सामान्य नागरिक जीव मुठीत घेऊन चालत असून, या अनियंत्रित वाहतुकीवर नियंत्रण कोण घालणार, अशी चर्चा शहरात सुरू आहे. कर्तव्यदक्ष ठाणेदार गौतम यांच्यानंतर, सुसाट सुटलेल्या या वाहनचालकांवर कोणाचाही अंकुश राहिलेला नाही, अशी खंत नागरिक व्यक्त करत आहेत.

### शिव छत्रपती चौक अपघातांचा चौक

■ पुसद शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक हा अपघातांचे केंद्रबिंदू बनला आहे. एकीकडे वाढलेले अतिक्रमण आणि अरुंद रस्ते, तर दुसरीकडे टाऊन प्लॅनिंगचे नियम धाब्यावर बसवून बांधलेली व्यावसायिक संकुले. या संकुलांना पार्किंगची सोय नसल्याने, रस्त्यावरच वाहने उभी केली जातात. यातच, सुसाट वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे, या चौकात दररोज निरपराध नागरिकांचा बळी जात आहे.

### राजकीय दबावाखाली पोलिस यंत्रणा

■ अपघात झाल्यानंतर, वाहतूक पोलिस थातुरमातूर चौकशी करतात आणि राजकीय दबावाखाली वाहनचालकाला सोडून देतात, असा गंभीर आरोप होत आहे. यामुळे, जणू काही माणसांना मारण्याचा परवानाच मिळाल्यासारखे वाहनचालक वागत आहेत. बेशिस्त चालक पोलिसांनाही दमदाटी करत असल्याने, जर रक्षकच असुरक्षित असतील, तर सामान्य जनतेचे काय?, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

## तरुणावर चाकूहल्ला

**कळंब, दि. २९ :** 'तू हिंगणघाट येथे राहायला का येत नाही,' या क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादातून दोघांनी संगनमत करून एका तरुणावर चाकूने हल्ला करून त्याला गंभीर जखमी केले. ही धक्कादायक घटना मंगळवारी (दि. २६) येथे घडली असून, याप्रकरणी कळंब पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. नितेश अशोक चाटगे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी मारोती रामाजी आंबटकर आणि शिवम मारोती आंबटकर यांनी त्यांच्यासोबत वाद घातला. आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत, हातातील चाकूने त्यांच्या पोटावर आणि मानेवर वार करून त्यांना गंभीर जखमी केले. तसेच, 'तुला जिवंत सोडणार नाही,' अशी धमकीही दिली. या जीवघेण्या हल्ल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, पोलीस दोन्ही आरोपींचा शोध घेत आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली.

**शाळा-महाविद्यालयांना सुट्टी जाहीर** **पंधरा दिवसांत दुसऱ्यांदा महापुराचा फटका**

# उमरखेड तालुक्यात पुन्हा जलप्रलय

## ढगफुटीसदृश्य पावसाने जनजीवन विस्कळित; शहरातील रस्ते पाण्याखाली, वाहतूक ठप्प

**उमरखेड, दि.२९ प्रतिनिधी**

'उमरखेड तालुक्याला शुक्रवारी (दि. २९) पहाटे पुन्हा एकदा ढगफुटीसदृश्य पावसाने झोडपून काढले. चार तासांहून अधिक काळ कोसळलेल्या या पावसामुळे, शहरातील रस्त्यांना नदीचे स्वरूप आले, तर उर्वरित पिकांचेही मोठे नुकसान झाले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन, प्रशासनाने शाळा-महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली.



१५ ते २० ऑगस्ट दरम्यान झालेल्या अतिवृष्टीच्या महापुरातून सावरत असतानाच, शुक्रवारी पहाटेच्या सुमारास झालेल्या ढगफुटीसदृश पावसाने उमरखेड तालुक्यात पुन्हा एकदा जलप्रलय सदृश परिस्थिती निर्माण केली. सलग चार तासांपेक्षा जास्त वेळ झालेल्या पावसामुळे, पैनगंगेच्या पुरामुळे वाचलेली हाता-तोंडाशी आलेली पिकेही पाण्याखाली गेल्याने, शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. उमरखेड-ढाणकी आणि विडूळ-देवसरी या प्रमुख मार्गावरील वाहतूकही काही काळ ठप्प झाली होती. पावसाचा जोर पाहता, विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी उमरखेडचे उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांनी, उपविभागातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी घोषित केली. या पंधरा दिवसांतील दुसऱ्या मोठ्या 'अस्मानी संकटा'मुळे, शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला आहे.

### शहरातील रस्त्यांना आले नदीचे स्वरूप

चार तासांपेक्षा जास्त वेळ झालेल्या मुसळधार पावसामुळे, उमरखेड शहरातील रस्त्यांवर गुडघ्यापेक्षा जास्त पाणी साचले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौक, महागाव रोड आणि नांदेड रोड या प्रमुख मार्गांना नद्यांचे स्वरूप आले होते. यावेळी पाण्यातून मार्ग काढताना, वाहनचालक आणि पादचाऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. अनेक भागांतील वाहतूक काही काळासाठी पूर्णपणे ठप्प झाली होती.

### घरावर वीज कोसळली, नागरिक भयभीत

शहरातील छत्रपती संभाजी नगर येथील रहिवासी विवेक टोकळवार यांच्या घरावर सकाळी आठ वाजताच्या सुमारास वीज कोसळली. सुदैवाने, यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनेमुळे आणि सततच्या पावसामुळे, नागरिकांमध्ये भीतीचे आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आता आकाशात काळे ढग दाटून येताच, नागरिक धांदल करत घराची वाट धरत आहेत.

गणेशोत्सव-२०२५



अवधूत गणेश मंडळ तिवारी चौक यवतमाळ,
अध्यक्ष : आमदार बाळासाहेब मांगुळकर, सचिव : कुलभूषण तिवारी

: 8766996624
MD
मयूर्स दिल्ली दरबार
फॅमीली रेस्टॉरंट ॲण्ड बार
* व्हेज
* नॉनव्हेज
* तंदूर
* चायनीज
* बिर्याणी

## महत्वाचे

### एकास मारहाण

**यवतमाळ :** यवतमाळच्या शारदा चौक परिसरात दारूच्या नशेत झालेल्या वादातून एका व्यक्तीला गंभीर मारहाण करण्यात आली आहे. २७ ऑगस्टच्या रात्री ९ वाजण्याच्या सुमारास सचिन कवडुजी रुईकर (वय ३२) यांच्यासोबत डोमा कोडापे (वय ३०) याने दारूच्या नशेत वाद घातला. डोमाने शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच हातातील स्टीलच्या कड्याने सचिन यांच्या कपाळावर आणि नाकावर मारून त्याला जखमी केले.

## निधन

### मधुकर ओंकार



**यवतमाळ :** जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे ज्येष्ठ नेते आणि कर्मचाऱ्यांच्या हक्कांसाठी लढणारा आवाज म्हणून ओळखले जाणारे मधुकर वामनराव ओंकार ऊर्फ म.वा. (वय ९५) यांचे गुरुवारी (दि. २८) रात्री नागपूर येथे वृद्धापकाळाने निधन झाले. मूळचे राळेगाव येथील असलेले ओंकार, राज्य कर्मचारी महासंघाचे नेते र. ग. कर्णिक यांचे निकटवर्तीय सहकारी होते. या दोन्ही नेत्यांनी अनेकदा राज्यव्यापी संपाचे यशस्वी नेतृत्व करून शासनाला कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करण्यास भाग पाडले होते. त्यांच्या निधनाने कर्मचारी चळवळीची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे. त्यांच्या पार्थिवावर नागपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

# सेवेत कायम करण्याच्या मागणीसाठी एनएचएम कर्मचा-यांचे आंदोलन

**यवतमाळ, दि.२९ प्रतिनिधी**



शासकीय सेवेत कायम करण्याच्या मागणीसाठी, राष्ट्रीय आरोग्य अभियानातील (एनएचएम) शेकडो कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आज (दि. 29) यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढला. दीड वर्षांपूर्वी शासनाने दिलेले आश्वासन न पाळल्याने, संतप्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी 'मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरूच राहील,' असा निर्धार व्यक्त केला.

गेल्या 15 ते 20 वर्षांपासून कंत्राटी पद्धतीने सेवा देणाऱ्या या कर्मचाऱ्यांना, 14 मार्च 2024 रोजीच्या शासन निर्णयानुसार सेवेत नियमित करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, दीड वर्ष उलटूनही त्याची अंमलबजावणी न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. याच मागणीसाठी, 19 ऑगस्टपासून राज्यभरातील एनएचएम कर्मचारी बेमुदत संपावर आहेत. यवतमाळमध्येही जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयासमोर हे आंदोलन सुरू असून, प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. आजच्या मोर्चात, 'आम्हाला कायम करा,' अशा घोषणा देत कर्मचाऱ्यांनी सरकारचे लक्ष वेधले. या आंदोलनाचे नेतृत्व समितीचे अध्यक्ष नितीन ठाकूर, कार्याध्यक्ष सुधीर उजवणे, सचिव डॉ. अतिश गजभिये आणि समुदाय आरोग्य अधिकारी संघटनेचे अध्यक्ष डॉ. श्रीनाथ कांगणे यांनी केले.

# प्रतिबंधित गुटखा जप्त

**दारव्हा, दि. २९ प्रतिनिधी**

दारव्हा शहरात अन्न व औषध प्रशासन विभागाने केलेल्या कारवाईत एका दुकानातून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. २८ ऑगस्ट रोजी न्यु सोळंकी कन्फ्रक्शनरी दुकानात केलेल्या तपासणीत अमित कुमार अशोक कुमार उपलप या अधिकाऱ्याला वसीम अली मोहम्मद सोळंकी आणि अल्ताफ अली अहमद सोळंकी यांनी अवैधरित्या साठवलेला १९,६९० रुपयांचा मुद्देमाल आढळला. यामध्ये विमल, पान मसाला आणि सुगंधी तंबाखूच्या पाकिटांचा समावेश आहे.

# पांढरकवड्यात घरात घुसून दरोड्याचा प्रयत्न

पांढरकवडा, ता. २९, शहरातील चालबर्डी रोडवरील जुन्या नाक्यानजीक असलेल्या मनीष सिंघानिया यांच्या घरात रात्री आठचे दरम्यान हातात धारदार शस्त्र घेऊन चोरीच्या उद्देशाने घुसल्याने शहरात एकच खळबळ माजली.

याबाबत पोलिस सूत्रानुसार शहरातील जिड्डेवार भवन परिसरात स्टेशनरीचे दुकान असलेले मनीष केदारनाथ सिंघानिया हेचालबर्डी रोडवरील जुन्या नाका परिसरात वास्तव्यास असतात काल (ता.२८) रात्री आठ वाजताचे दरम्यान तोंडावर रुमाल बांधलेला अज्ञात इसम हातात धारदार शस्त्रे घेऊन घरात घुसला. मनीषा यांचा मुलगा समोरच्या हालमध्ये होता, त्याला पाहताच घरात असलेली रोख रक्कम व दागिने आणून दे असे म्हणताच अमितने त्याचे आजी-आजोबाला हाक मारली तेव्हा ते आले असता त्यांनाही या अज्ञात इसमाने या घरात जे काही आहे ते आणून द्या असे धमकावू लागला. आजी-आजोबा जोरजोराने ओरडू लागल्याने शेजारीपाजारी येताच अज्ञात चोरट्याने तिथून पळ काढला. याप्रकरणी पांढरकवडा पोलिसांनी गुन्हा नोंदविला असून पुढील तपास पोलिस करीत आहे.

# आर्णीत गोवंश कत्तलीचा पर्दाफाश

## एकाला अटक, दुसरा फरार

**आर्णी, दि.२९ प्रतिनिधी**

आर्णी शहरात गोवंश कत्तल करून मांस विक्री करणाऱ्यांवर पोलिसांनी आज धाड टाकली. बजरंग दलाने दिलेल्या माहितीवरून झालेल्या या कारवाईत, पोलिसांनी ३० किलो गोमांस जप्त केले असून, दोन गोवंशांना जीवदान दिले असून एका आरोपीला अटक केली आहे.

आज सकाळी बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी शहरातील एका भागात गोवंश कत्तल होत असल्याची माहिती ठाणेदार नीलेश सुरडकर यांना दिली. त्यांनी तत्काळ आपल्या पथकाला कारवाईचे निर्देश दिले. पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकला असता, आरोपी जुम्मा खा उस्मान खा (वय ६७) आणि साबीर खा जुम्मा खा (वय ४०) हे मांस विक्रीसाठी तुकडे करत असल्याचे आढळले. पोलिसांना पाहताच साबीर खा फरार झाला, तर जुम्मा खा याला ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळावरून ६ हजार रुपये किमतीचे ३० किलो गोमांस आणि वजन काटा, सुऱ्या असे साहित्य जप्त केले आहे. तसेच, कत्तलीसाठी आणलेल्या दोन गोवंशांची सुटका केली. पोलिस कर्मचारी नितीन वास्टर यांच्या फिर्यादीवरून दोघांविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेदार नीलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनात जमादार प्रदीप खडके करत आहेत.

# मुख्यमंत्री महाजनआरोग्य शिबिरातून रुग्णांना दिलासा मिळणार

## आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी घेतला तयारीचा आढावा

**यवतमाळ, दि. २९ प्रतिनिधी**

जिल्ह्यातील गोरगरीब आणि गरजू रुग्णांना दिलासा देण्यासाठी, 21 सप्टेंबर रोजी भव्य जिल्हास्तरीय 'मुख्यमंत्री महाजनआरोग्य शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे या शिबिरातून रुग्णांना दिलासा मिळणार असल्याचे मंत्री प्रा.डॉ. अशोक उईके म्हणाले. या शिबिराच्या उद्घाटनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार असून, याच्या नियोजनाचा आढावा यावेळी घेण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या आढावा बैठकीत, मंत्री डॉ. उईके यांनी जिल्ह्यातील जास्तीत जास्त रुग्णांना शिबिराचा लाभ मिळावा, यासाठी सर्व यंत्रणांना आतापासूनच कामाला लागण्याचे निर्देश दिले. या शिबिराची माहिती गावागावांत पोहोचविण्यासाठी, 30, 31 ऑगस्ट आणि 1 सप्टेंबर रोजी विशेष प्रचार मोहीम राबवली जाणार आहे. त्यानंतर, 1 ते 5 सप्टेंबर दरम्यान आशा आणि अंगणवाडी सेविकांमार्फत घरोघरी जाऊन सर्वेक्षण आणि चाचण्या केल्या जातील. 5 ते 10 सप्टेंबर दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामीण रुग्णालयांमध्ये रुग्णांची तपासणी होईल, तर 10 ते 20 सप्टेंबर या काळात आवश्यक उपचार आणि शस्त्रक्रिया केल्या जातील. 21 सप्टेंबर रोजी मुख्य शिबिरात, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत रुग्णांना विविध वैद्यकीय उपकरणांचे वाटप आणि पुढील उपचारांसाठी मार्गदर्शन केले जाईल. ज्या रुग्णांवर नागपूर किंवा इतर ठिकाणी शस्त्रक्रिया करण्याची गरज आहे, त्यांचीही सोय केली जाणार असल्याचे डॉ. उईके यांनी सांगितले. या बैठकीला आमदार किसन वानखेडे, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, अधीक्षक अभियंता सुषमा बोंदरे, अधीक्षक अभियंता दरोळी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुखदेव राठोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक उपस्थित होते.

# मोकाट डुकरांचा चिमुकल्यांवर हल्ला; एकाची प्रकृती गंभीर

## भटक्या जनावरांचा बंदोबस्त करण्याची मागणी

**नेर (परसोपंत), दि.२९/ प्रतिनिधी**

शहरातील मोकाट जनावरांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, मित्रांसोबत खेळत असलेल्या दोन लहान मुलांवर मोकाट डुकराने (वराह) हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात साडेचार वर्षांचा मुलगा गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

मुन्ना अतुल खरटकर (वय: ४.६वर्षे) आणि राजू राघव खरटकर (वय : २.६वर्षे) हे दोघे मित्र घराबाहेर खेळत असताना, अचानक एका मोकाट डुकराने त्यांच्यावर हल्ला केला. डुकराने दोघांनाही चावा घेतला, ज्यात मुन्ना गंभीर जखमी झाला, तर राजू किरकोळजखमी झाला आहे. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे लहान मुले प्रचंड घाबरली आहेत. या घटनेमुळे, शहरातील मोकाट जनावरांच्या वाढत्या उपद्रवाचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन, भटक्या जनावरांचा तत्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी संतप्त नागरिक करत आहेत. लहान मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याने, पालकांमध्येही चिंतेचे वातावरण आहे. याप्रकरणी प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास, यापेक्षा मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीती व्यक्त होत आहे.

# मोरारीबापूंच्या रामकथा पर्वाने यवतमाळ होणार भक्तिमय

## जिल्हा प्रशासनासह आयोजकांकडून जय्यत तयारी; ६ ते १४ सप्टेंबर दरम्यान 'रामकथे'चा जागर

**यवतमाळ, दि.२९ प्रतिनिधी**

**राष्ट्रसंत मोरारीबापू यांच्या अमृतवाणीतून 'रामकथा' श्रवण करण्याच्या अविस्मरणीय पर्वासाठी यवतमाळ नगरी सज्ज झाली आहे. ६ ते १४ सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या या भव्य सोहळ्यासाठी, आयोजन समितीसह जिल्हा प्रशासनही जय्यत तयारी करत असून, हा कार्यक्रम अविस्मरणीय ठरणार आहे.**



दारव्हा मार्गावरील चिंतामणी खासगी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात, दिनांक ६ ते १४ सप्टेंबर या कालावधीत राष्ट्रसंत मोरारीबापू यांच्या रामकथा पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. विजय दर्डा, राजेंद्र दर्डा आणि दर्डा परिवार यजमान असलेल्या या सोहळ्यासाठी, विविध समित्या अहोरात्र परिश्रम घेत आहेत. आयोजन समितीचे कार्यकारी अध्यक्ष कीर्ती गांधी, सचिव किशोर दर्डा आणि उपाध्यक्ष अरुणभाई पोबारू यांच्या नेतृत्वाखाली जय्यत तयारी सुरू आहे. जिल्हाधिकारी विकास मीना आणि पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रशासनही या सोहळ्यासाठी मोलाचे सहकार्य करत आहे. कथा समिती आणि प्रशासनात समन्वयाची भूमिका पराग पिंगळे आणि बाळासाहेब दौलतकर बजावत आहेत. हा महाकथा पर्व सोहळा ऐतिहासिक आणि अविस्मरणीय व्हावा, यासाठी शहरातील विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संस्था, तसेच महिला संघटनाही परिश्रम घेत आहेत.

### भाविकांसाठी विशेष सोयीसुविधा

कथास्थळी ये-जा करण्यासाठी, राज्य परिवहन महामंडळातर्फे विशेष बसगाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, शहराच्या विविध भागांतून नाममात्र शुल्कात ऑटोची व्यवस्थाही राहणार आहे, ज्याचे नियोजन राजू पडगिलवार करत आहेत. भाविकांच्या भोजन व्यवस्थेची जबाबदारी अजय मुंधडा यांच्या समितीकडे, तर निवास व्यवस्थेची जबाबदारी जगजितसिंह ओबेरॉय आणि संतोष बोरेले यांच्याकडे आहे. आरोग्य आणि मेडिकल कॅम्पची जबाबदारी डॉ. ललित निमोदिया सांभाळणार आहेत.

### असा असेल रामकथा सोहळा

शनिवार, ६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ ते ७:३० या वेळेत रामकथेला सुरुवात होईल. त्यानंतर, रविवार, ७ ते १४ सप्टेंबर या कालावधीत दररोज सकाळी ९:३० ते दुपारी १:३० या वेळेत हा रामकथा सोहळा पार पडेल. रामकथेची पोथी, शोभायात्रेद्वारे कथा वाचन मंचापर्यंत नेण्यात येणार असून, याची तयारी किसन सिंघानिया आणि सीमा दर्डा करत आहेत. या सोहळ्योच प्रसिद्धिप्रमुख म्हणून विजय बुंदेला काम पाहत आहेत.

# डेहणी शेतशिवारात वीज पडून शेतक-याचा मृत्यू

## शवविच्छेदन अहवालानंतर कारण झाले स्पष्ट

**दिग्रस, दि.२९ प्रतिनिधी**



दिग्रस तालुक्यातील डेहणी येथे, शेतात गेलेल्या एका ५८ वर्षीय शेतकऱ्याचा मृतदेह आज (दि. २९) आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. रमेश सोना चव्हाण (५८, रा. डेहणी) असे मृत शेतकऱ्याचे नाव असून, मुसळधार पावसात वीज पडून त्यांचा मृत्यू झाला, असे शवविच्छेदन अहवालातून स्पष्ट झाले आहे.

रमेश चव्हाण हे गुरुवारी (दि. २८) शेताकडे जातो, असे सांगून घरातून निघाले होते. गुरुवारी दुपारपासूनच परिसरात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने हजेरी लावली होती. रात्रभर ते घरी न परतल्याने, नातेवाईकांनी शोधाशोध सुरू केली, मात्र ते सापडले नाहीत. आज सकाळी, त्यांच्या शेताजवळच असलेल्या मारोती रघू खरोडे यांच्या शेतातील इरल्याजवळ त्यांचा मृतदेह आढळून आला. रमेश चव्हाण यांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ असल्याने, त्यांच्या आकस्मिक आणि दुर्दैवी मृत्यूमुळे गावावर शोककळा पसरली आहे. या घटनेची माहिती मिळताच, आर्णी पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून, नीलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनात अशोक टेकाळे, अमोल कान्हेकर आणि विशाल जाधव पुढील तपास करत आहेत. मृताच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, दोन मुली आणि नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.